नोव्हेंबर / November
मंगळवार / Tuesday
दि.०३ / Dt: 03
२०२६ / 2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Pages 6

३ किंमत रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com

● मा.संपादक : कृष्णा कडबाने 7030908787 ● निवासी संपादक : मकरंद जहागीरदार 9422216061, 9371591760 ● कार्यकारी संपादक : शेख बिलाल 9422404740

www.jagmitra.com


● बीड/Beed ● वर्ष १७ वे/Year 17 ● अंक १५/Issue 15 ● आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

बीड जिल्हाधिकाऱ्यांना न्यायालयाची चपराक!

हायकोर्टाच्या आदेशालाच विलंब; मग सामान्यांच्या तक्रारींचे काय? बीड प्रशासनाला जनतेचा सवाल!

आरटीआयला केराची टोपली, तक्रारींचे ढीग; बीड प्रशासनाचा तू तू-मैं मैं खेळ उघडा!

राजकीय दबावापुढे प्रशासन नतमस्तक; हायकोर्टाकडून बीडच्या कारभाऱ्यांचे कान उपटले!



CNR No : HCBM030406472026

922.2026CF

1

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
BENCH AT AURANGABAD

929 CONTEMPT PETITION NO. 922 OF 2026
IN PIL/27/2025

SHAIKH MOBIN HAMID
VERSUS
MR MILIND MHAISKAR SECRETARY REVENUE AND FOREST DEPARTMENT

...

Advocate for the Petitioner : Mr. N.L. Jadhav
AGP for Respondent/State : Mr. N.B. Patil

CORAM : SANDIPKUMAR C. MORE & VAISHALI PATIL-JADHAV,JJ.

DATE : 30.10.2026

P.C. :

1. Heard.
2. Issue simple notice to respondent no.4, returnable on 11.12.2026.

[VAISHALI PATIL-JADHAV] JUDGE [SANDIPKUMAR C.MORE] JUDGE





आकांच्या दबावात कोर्टाचा अवमान; बीड जिल्हाधिकाऱ्यांना औरंगाबाद खंडपीठाची चपराक!

न्यायालयाला जुमानत नाहीत, तिथे गरिबांचे काय? जनतेचा संतप्त सवाल

ज्या जिल्ह्यात खुद्द सर्वोच्च न्यायव्यवस्थेच्या आदेशांची पायमल्ली करण्याचे धाडस वरिष्ठ अधिकारी दाखवतात, तिथे सामान्य, शेतकरी आणि गोरगरीब जनतेच्या तक्रारींचे काय होत असेल? असा जळजळीत सवाल आता उपस्थित होत आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील, जिल्हा परिषद, पंचायत समिती ते अगदी नगरपरिषदेपर्यंत भ्रष्टाचाराची पाळेमुळे घट्ट रुजली आहेत. तक्रारींचे ढीग साचले आहेत, मात्र कारवाईचा आकडा शून्य आहे. सामान्य नागरिकाने अन्यायाविरुद्ध दाद मागितल्यास त्याला साधे चार ओळींचे लेखी उत्तर देण्याची सौजन्यशीलताही प्रशासनाकडे उरलेली नाही. शासकीय तिजोरीवर डल्ला मारणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांची माहिती मागितल्यास माहिती अधिकारांतर्गत ५ ते ६ महिने टोलवाटोलवी केली जाते. आज देतो, उद्या देतो करत पुरावे दडपले जातात, जेणेकरून महाघोटाळे उघडकीस येऊ नयेत.प्रशासनाच्या याच पाठीराख्या भूमिकेमुळे आणि निष्काळजीपणामुळे भ्रष्ट अधिकारी आणि भूमाफियांचे मनोबल गगनाला भिडले आहे. आता थेट उच्च न्यायालयानेच बीड जिल्हाधिकाऱ्यांना नोटीस काढून कान टोचल्याने, बीडच्या मुजोर कारभाऱ्यांना चपराक बसणार की पुन्हा राजकीय दबावाचा खेळ सुरू राहणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

न्यायालयाच्या आदेशालाच विलंब; मग सामान्य नागरिकांच्या तक्रारींचे काय?

या प्रकरणाने बीड जिल्ह्यातील प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत व्यापक प्रश्न निर्माण केले आहेत. सामान्य नागरिक, शेतकरी आणि गोरगरीब जनतेच्या तक्रारींवर वेळेत निर्णय होत नसल्याच्या तक्रारी वारंवार पुढे येतात. अर्ज, निवेदने आणि माहिती अधिकारातील मागण्यांवर महिनोनमहिने प्रतीक्षा करावी लागत असल्याचा नागरिकांचा अनुभव आहे. जर न्यायालयीन आदेशाच्या अंमलबजावणीबाबतच प्रश्न निर्माण होत असतील, तर सामान्य नागरिकांच्या तक्रारींना प्रशासन किती गांभीर्याने घेत असेल? नागरिकांना न्यायासाठी वारंवार कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागणार का? तक्रारींचा निपटारा करण्यासाठी जबाबदार अधिकारी नेमके काय करतात? असे संतप्त सवाल उपस्थित होत आहेत.

बीड/जगमित्र न्यूज

सामान्य जनतेच्या तक्रारींना कचऱ्याची टोपली दाखवणाऱ्या आणि भ्रष्टाचाराच्या विळख्यात गुरफटलेल्या बीड जिल्हा प्रशासनाला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने जोरदार दणका दिला आहे. पाटोदा येथील कोट्यवधी रुपयांच्या शासकीय गायरान जमिनीवरील अतिक्रमण न हटवून थेट उच्च न्यायालयाच्या आदेशाची उघड पायमल्ली केल्याप्रकरणी बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना खंडपीठाने न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी अधिकृत नोटीस बजावली आहे. या कारवाईमुळे जिल्हा प्रशासनात प्रचंड खळबळ उडाली असून लाचार कारभाराचा बुरखा टराटरा फाटला आहे. पाटोदा शहरातील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या शासकीय गायरान जमिनीवर भूमाफियांनी अतिक्रमण केले होते. याविरोधात वारंवार दाद मागूनही सुस्त प्रशासनाने डोळेझाक केली. अखेर हे प्रकरण उच्च न्यायालयात गेले असता न्यायालयाने अतिक्रमण हटवण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. मात्र, तथाकथित राजकीय आकांचा दबाव आणि भ्रष्ट साटलोट्यामुळे बीड प्रशासनाने या आदेशाला वाटाण्याच्या अक्षता लावल्या.

जिल्हाधिकाऱ्यांनी जनतेसमोर वस्तुस्थिती स्पष्ट करावी!

पाटोदा येथील गायरान जमिनीच्या प्रकरणात प्रशासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली, न्यायालयीन आदेशाच्या अंमलबजावणीसाठी कोणती पावले उचलली आणि अतिक्रमण हटविण्यात विलंब झाला असल्यास त्याची कारणे काय, याबाबत जिल्हा प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडणे आवश्यक आहे.शासकीय जमीन ही जनतेची मालमत्ता आहे. तिचे संरक्षण करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी ही कोणत्याही राजकीय दबावापेक्षा किंवा प्रशासकीय सोयीपेक्षा महत्त्वाची असली पाहिजे.

याचिकाकर्त्यांनी ॲड. नरसिंह जाधव यांच्यामार्फत ऑक्टोबर २०२६ रोजी न्यायमूर्ती संदीपकुमार मोरे व न्यायमूर्ती वैशाली पाटील जाधव यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. उच्च न्यायालयाच्या आदेशाला हरताळ फासणाऱ्या प्रशासनाच्या मनमानी कारभारावर खंडपीठाने तीव्र संताप व्यक्त केला. बीड जिल्हाधिकाऱ्यांना थेट अवमान नोटीस बजावत न्यायालयाने पुढील सुनावणी ११ डिसेंबर २०२६ रोजी ठेवली आहे. या प्रकरणात याचिकाकर्त्यांतर्फे ॲड. नरसिंह एल. जाधव व ॲड. गौरव खांडे यांनी आक्रमक युक्तिवाद करत प्रशासनाचा खोटेपणा उघडा पाडला, तर शासनाची बाजू ॲड. एन. बी. पाटील यांनी मांडली.

परळीत बेकायदेशीर सावकारांविरुद्ध सहकार विभागाची धडाकेबाज कारवाई!

परवाना नसताना सावकारी व्यवसाय करणाऱ्याविरुद्ध थेट गुन्हा दाखल; एस. के. चव्हाण यांची निर्भीड भूमिका चर्चेत

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी तालुक्यात बेकायदेशीर सावकारी व्यवसाय करणाऱ्यांविरुद्ध सहकार विभागाने आता कठोर भूमिका घेतली असून, परवाना नसताना सावकारी व्यवसाय केल्याच्या आरोपावरून तेलगाव येथील श्री. विठ्ठल गणपती पुंडे यांच्याविरुद्ध परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम ३९ अन्वये ही कारवाई करण्यात आली आहे.

सहकार विभागाचे सहकार अधिकारी श्रेणी-२, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका अंबाजोगाई येथील श्री. एस. के. चव्हाण यांनी या प्रकरणात पुढाकार घेत उपलब्ध कागदपत्रे, तक्रारी, चौकशी अहवाल आणि वरिष्ठ कार्यालयाच्या निर्देशांच्या आधारे कायदेशीर कार्यवाही पुढे नेली. त्यांच्या पाठपुराव्यामुळे अखेर परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात दिनांक ०२ नोव्हेंबर २०२६ रोजी गुन्हा क्रमांक ०५४९/२०२६ नोंदविण्यात आला. सदर प्रकरणात यापूर्वीही बेकायदेशीर सावकारी व्यवसाय व व्याजाच्या वसुलीबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार सहकार विभागामार्फत (पान २ वर)

ना.पंकजाताई मुंडेंच्या पत्राला केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचे पंधरा मिनिटांतच उत्तर!

बीड जिल्ह्यातील रेल्वे, रस्ते, महामार्गाच्या प्रश्नांवर केंद्रीय मंत्री गडकरी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची नवी दिल्लीत घेतली भेट

नवी दिल्ली/वृत्तसंस्था

बीड जिल्ह्यातील रेल्वे, रस्ते आणि महामार्गाच्या प्रश्नांवर राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज नवी दिल्लीत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. बीड जिल्ह्यातील मंझरी हवेली फाटा येथे महामार्गावर वारंवार होणारे अपघात लक्षात घेऊन याठिकाणी उड्डाणपूल मंजूर करावा अशी मागणी त्यांनी केल्यानंतर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून केवळ पंधरा मिनिटांतच त्यांच्या पत्राला उत्तर मिळाले आणि उड्डाणपुलाच्या सर्वेक्षणाचे आदेश निघाले.





ना. पंकजाताई मुंडे आज नवी दिल्लीत होत्या. सकाळी त्यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. बीडचे गुजर समाज सेवा संघाचे अध्यक्ष राजेंद्र गुजर यांनी केलेल्या विनंतीवरून बीड-सोलापुर (पान २ वर)

धारूर किल्ल्याच्या संवर्धन कामावर अभियंत्यांचे 'व्हॉट्सॲप' वरून नियंत्रण!

अभियंत्याकडून पाठविलेल्या फोटोंवरून मार्गदर्शन; नऊ कोटींच्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह

धारूर/अतुल शिनगारे

येथील ऐतिहासिक वैभवाची साक्ष देणाऱ्या धारूरच्या किल्ल्याच्या संवर्धनासाठी तब्बल ८ कोटी ९८ लाख ८७ हजार ७६० रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. महावारसा विशेष स्मारक योजनेतून सुरू असलेल्या या कामाला दोन महिन्यांचा कालावधी उलटला आहे. मात्र, एवढ्या मोठ्या खर्चाच्या कामावर प्रत्यक्ष देखरेख करण्याऐवजी पुरातत्त्व विभाग संबंधित कन्स्ट्रक्शन कंपनीचा अभियंते सह पहारेकरी कर्मचाऱ्याने व्हॉट्सॲपवर पाठविलेल्या फोटोंवरूनच मार्गदर्शन करीत (पान २ वर)





पतीच्या अनैतिक संबंधाला कंटाळून विवाहितेची ॲसिड पिऊन आत्महत्या

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

पतीने बाहेरील महिलेशी असलेल्या अनैतिक संबंधावरून शारीरिक व मानसिक त्रास दिल्याने एका पंचवीस वर्षीय विवाहितेने बाथरुम साफ करण्याचे ॲसिड पिऊन आत्महत्या केली. ही घटना परळी वैजनाथ तालुक्यातील सिद्धेश्वर नगर येथे तीस ऑक्टोबर रोजी घडली.

या प्रकरणी मयत विवाहितेचे वडील श्रीमंत पंढरी गित्ते (वय पंचावन्न, राहणार नंदागौळ, तालुका परळी वैजनाथ) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपी पती सुनील सुरेश बदने (राहणार सिद्धेश्वर नगर, परळी वैजनाथ) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. देवकन्या हिचा विवाह सुनील बदने याच्यासोबत दोन हजार एकोणीस मध्ये झाला होता. काही वर्षे चांगली वागणूक दिल्यानंतर पतीने तिला दारू पिऊन शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. पतीचे बाहेरील महिलेशी संबंध असल्याचे समजल्यानंतर देवकन्याने ही बाब माहेरी सांगितली होती, मात्र नातेवाईकांनी समजूत काढूनही पतीच्या वर्तनात सुधारणा झाली नाही. सततच्या भांडणाला आणि मानसिक त्रासाला कंटाळून देवकन्या हिने राहत्या घरी ॲसिड प्राशन केले. लातूर येथील शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान एकतीस ऑक्टोबर रोजी तिची प्राणज्योत मालवली. याप्रकरणी संभाजी नगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलमांनुसार आरोपी पतीवर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार हे करीत आहेत.



चारा-पाण्याअभावी जनावरांचे हाल; छावणीला नको, दावणीला चारा द्या, किसान सभेची मागणी

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी तालुक्यात दुष्काळामुळे पशुधनासमोर भीषण चारा व पाणी टंचाई निर्माण झाली असून प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे. या भयानक परिस्थितीवर तात्काळ उपाययोजना करण्यासाठी अखिल भारतीय किसान सभा, परळी तालुका कमिटीच्या वतीने प्रशासनाला निवेदन देत विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. शासनाच्या दि २८ सप्टेंबरच्या अहवालानुसार जिल्ह्यात केवळ तीन आठवडे पुरेल इतकाच चारा शिल्लक होता, त्यामुळे नोव्हेंबर महिन्यात परिस्थिती अत्यंत भयावह झाली आहे. पावसात खंड पडल्याने शेती (पान २ वर)

शिंगणवाडी ग्रामपंचायतीच्या कारभाराची चौकशी करा; सरपंचांचा उर्वरित कार्यकाळ बरखास्त करा!

धारूर/अतुल शिनगारे

तालुक्यातील मौजे शिंगणवाडी ग्रामपंचायतीच्या कारभाराची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, तसेच विद्यमान सरपंचांचा उर्वरित कार्यकाळ बरखास्त करण्यात यावा, या मागणीसाठी शिंगणवाडी येथील समस्त ग्रामस्थांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. सोमवार, २ नोव्हेंबर २०२६ पासून धारूर पंचायत समिती कार्यालयासमोर हे (पान २ वर)



03 Nov 2026 page 2_Layout 1 11/3/2026 12:19 AM Page 1

व्यसनमुक्ती (नशामुक्ती) निरोगी जीवन-डॉ.जगदीश टेकाळे



आजचे आरोग्यज्ञान : व्यसनमुक्ती

१ व्यसन लागण्याची प्रमुख कारणे

मानसिक ताण आणि चिंता मित्रपरिवाराचा प्रभाव कुतूहल किंवा चुकीची संगत एकटेपणा आणि नैराश्य दारू, तंबाखू, गुटखा आणि इतर व्यसनांची सहज उपलब्धता

२ व्यसनाची प्रमुख लक्षणे – व्यसन करण्याची सतत इच्छा होणे व्यसन न मिळाल्यास चिडचिड होणे कामात लक्ष न लागणे कुटुंबापासून दूर राहणे- आर्थिक अडचणी आणि आरोग्याकडे दुर्लक्ष होणे. **३ व्यसनमुक्तीसाठी काय करावे?** व्यसनमुक्त होण्याचा ठाम निर्णय घ्या. व्यसन करणारी संगत आणि परिस्थिती टाळा. कुटुंबीयांचा आणि मित्रांचा आधार घ्या. नियमित व्यायाम, योग आणि ध्यान करा. तंबाखू किंवा गुटखा सोडण्यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्या. गरज असल्यास व्यसनमुक्ती केंद्राची मदत घ्या. महत्त्वाची आरोग्यविषयक माहिती दारूचे व्यसन असल्यास अचानक दारू बंद करणे धोकादायक ठरू शकते. वैद्यकीय सल्ल्यानेच व्यसनमुक्तीची प्रक्रिया सुरू करा. आजची व्यसन सोडणे कठीण असू शकते, पण योग्य उपचार, कुटुंबाचा आधार आणि स्वतःची इच्छाशक्ती यामुळे व्यसनमुक्त जीवन शक्य आहे असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

भारतीय सनातन वैदिक संस्कृतीच जगाला शांती व आत्मज्ञान देऊ शकते संत श्री आशारामजी बापू

विश्वगुरू भारत एक श्रीमंत योगी योगेश्वर संत श्री आसारामजी बापू यांनी सर्व जाती धर्म समभावाची शिकवण आपल्या आचरणातून त्यागातून समर्पणातून देत आले आहेत ५० वर्ष भारत व विश्वात गीतेचे आत्मज्ञान चा प्रचार केला आजही त्यांचे खरे साधक करत आहेत आज विश्व युद्धाचे वातावरण देश-विदेशात पाहायला मिळत आहे जग इंटरनेट व मोबाईल मध्ये युवा पिढी विनाशाकडे जात आहे हे वादळ कुठेतरी थांबायला हवे म्हणून आज जगाला युद्धाची नाही तर महात्मा बुद्धाची आवश्यकता आहे महात्मा बुद्धाच्या विचारांची अहिंसा सत्य करुणा प्रज्ञा याची गरज आहे जगातील कोणताही व्यक्ती जातीने मोठा होत नसतो तर तो त्याच्या सत्कर्माने मोठा होत असतो आज राजकारण इतक्या खालच्या थरात पोहोचले आहे की ज्या संतांनी फकीरांनी वसुदेव कुटुंबकम सारे विश्वचि माझे घर व ला इलाही इलाल्ला चा संदेश दिला सर्वात एकच परमात्मा अल्लाह आहे याची जीवनभर आचरण समर्पण केले ते संत आता आपापल्या जातीत वाटून घेतले एक संत महात्मा म्हणतो ''जाती न पूछे संत की पूछ लिजिए ज्ञान मोल करो तलवार का पडी रहने दो मॅन'' परंतु आज काल काही कथा वाचक पोटभरू पूजा दक्षिणा घेणे व दुसऱ्या संतांची निंदा करणे यातच धन्य झाले सर्वच लोक असे आहेत असेही नाही परंतु अशा लोकांमुळे खऱ्या संतालाही कोणी मानायला तयार नाही परंतु काही महात्मे गीता भागवत चा प्रचार करतात करत आहेत त्यांना धन्यवाद विठ्ठल त्यांची आत्मज्ञानाचे ध्येय पूर्ण करो आपली कृपादृष्टी ठेवुन याच जन्मात साक्षत्कार करून मुक्त आत्मा महेश्वर होवत हीच ईश्वरचरणी प्रार्थना आज सनातन वैदिक संस्कृती खूप धोक्यात आहे कारण काहि लोक अज्ञानामुळे आपल्या संस्कृतीला शिव्या देतात जेवढे आपल्या लोकांनी आपल्या धर्माचे संस्कृतीचे वाटोळे केले तेवढे कोणीही केले नाही याचे कारण आपल्याला मॅकोले शिक्षण पद्धतीने नास्तिक बनविले आपल्याला पाश्चात्त्य संस्कृतीचा आदर्श वाटू लागला मी अमेरिकेत डॉक्टर आहे असे सांगायला गर्व वाटू लागला जीवन फक्त पैसा कमावणे व वाईट कामात खर्च करणे यातच आपण धन्य झालो परंतु पापाचा पैसा कधीच सुख शांती देऊ शकत नाही सुख शांतीसाठी ईश्वराचे भजन व अल्लाहचि नमाज बंदगी तुम्हाला शांती देऊ शकते पैशाने शांती मिळत असती तर महात्मा बुद्धांनी राज वैभव त्यागले नसते (त्यागात शांती निरंतरम)आज शुद्ध हवा शुद्ध पाणी गावरान गाईचे दूध तूप लोणी मिळत नाही संतांचा सत्संग अर्थात महात्मा बुद्ध कबीर नानक दे संत ज्ञानेश्वर संत तुकाराम संत सावता बाबा संत श्रेष्ठ भगवान बाबा यांचे विचार आत्मसात करत नाहीत म्हणून प्रत्येक जण तणावात जीवन जगत आहे १८९३ च्या शिकागो धर्म सभेत स्वामी विवेकानंदानि संबोधित केले व त्या व त्यानंतर शंभर वर्षांनी १९९३ ला पूज्य संत श्री आशारामजी बापूजींनी शिकागोचे धर्मसभा गाजवली व सर्व धर्मीयांना गीतेचे आत्मज्ञान आणि तत्त्वज्ञानाने सुखी स्वस्थ व सन्मानित जीवन जगण्याचा संदेश दिला व भारतीय वैदिक संस्कृती जगाला शांती आनंद व माधुर्य देऊ शकते म्हणून भारतीय संस्कृतीचा गौरव वाढवला पाश्चात्य बांधवांनो कागदाचे कितीही सुंदर फुल असू द्या त्याचा सुगंध येत नाही आणि खऱ्या गुलाबाच्या फुलाचा सुगंध कधी झाकत नसतो ही भारतीय वैदिक संस्कृती आहे यामध्ये राम कृष्ण संत तुकाराम संत श्रेष्ठ भगवान बाबा सावता बाबा जगाची माऊली ज्ञानेश्वर यांनी अवतार घेऊन दिशाहीन समाजाला खरी दिशा दिली गाथा हरिपाठ ज्ञानेश्वरी गीतेच्या माध्यमातून आत्मा अमर आहे शरीर नश्वर आहे जन्म मृत्यू हा नियतीचा खेळ आहे ईश्वराशिवाय तुमची कोणीही नाही हा संदेश -१९ कोरोनाने जगाला दिला हे त्रिवार सत्य आहे कारण बुद्धी ही सत्य पक्षपातीने असते समोरचा खरे बोलतो का खोटे हे क्षणात दाखवते बांधवांनो सत्कर्म करा प्राणी मात्राची सेवा करा नमाज आदा करा अल्लाची बंदगी करा आपल्या व इतर धर्मावर प्रेम करा ईश्वर उपासनेचे रस्ते प्रार्थना नमाज ध्यान सत्संग रस्ते अलग आहेत परंतु मंजिले एक ही है पुण्याच्या प्रभावाने सुख शांती धन वैभव आपोआप येते व पापाच्या प्रभावाने दुःख दारिद्र्य अशांती येते कोणी तुम्हाला चांगलं म्हणावा यासाठी कोणतेही कर्म करू नका ईश्वर सर्व पाहत आहे कोणी पाहू किंवा न पाहू तरी असा कोणीतरी आहे जो क्षणोक्षणी पाहत आहे त्याला ईश्वर म्हणा गोड म्हणा अल्लाह काहीही म्हणा

पण तो आहे तो क्षणोक्षणी पाहत आहे तो सर्व पुण्याचा सर्व कर्माचा हिशोब लिहित आहे कोणी या लोकातील सरकारच्या कचाट्याचा आणि एखादा वाचू शकेल परंतु ईश्वरीय सरकारच्या कचाट्यातून आजपर्यंत कोणीही वाचला नाही वाचू शकणार नाही कोणत्याही प्रकारचा जामीन वशिला लाच तेथे चालत नाही कर्म करण्यात तर माणूस स्वतंत्र आहे परंतु फळ भोगण्यात मुळीच स्वातंत्र्य नाही कारण हसत हसत केलेले पाप रडत रडत भोगावी लागते ही त्रिवार सत्य आहे पूज्य बापूजींनी सत्संगाद्वारे अज्ञानातून आत्मज्ञानाकडे प्रकाशाकडे जाण्याचे गीतेची आत्मज्ञान सर्व जाती धर्मासाठी खुले केले सर्व सत्संग युट्युब वर पाहू शकता संयम सदाचार ब्रह्मचारी व चरित्र निर्माण याचे समर्थन करणारे आहेत सर्व जाती धर्माचे आत्म उन्नती बापूजी सत्संगाद्वारे करत आले आहेत पूज्य बापूजींनी व्हॅलेंटाईन डे मुळे होणारा युवा पिढीचा विनाश पाहून त्याला पर्याय म्हणून त्याच दिवशी १४ फेब्रुवारी माता पिता पूजन दिवस साजरा केला आणि संपूर्ण जगातील एक १६८ देशांमध्ये साजरा करण्याची परंपरा सुरू केली १४ फेब्रुवारी व्हॅलेंटाईन डे दिवशी बहुराष्ट्रीय कंपनीचा भारतात ग्रीटिंग बुके व सर्व अश्लील साहित्याचा व्यापार अरबोखरबो रुपयांचा व्यवसाय होत होता यामुळे युवाधन बरबाद होत होते युवा पिढी माता पित्याचा अनादर करत होती म्हणून पूज्य बापूजींनी माता पिता पूजन दिवस सर्व जगातील १६८ देशांमध्ये सुरू केला बापूजींनी बाल संस्कार केंद्र साधकाद्वारे चालवून विद्यार्थ्यांना चांगले विचार चांगले संस्कार याचे बिजारोपण करून संस्कारी युवा पिढी निर्माण करण्यात योगदान दिले ब्रह्मचर्य चे समर्थन करणारे युवा धन सुरक्षा अभियान संपूर्ण भारतात दोन कोटी पुस्तकाचे वितरण केले त्यामुळे युवा पिढी तेजस्वी ओजस्वी होत आहे आजची शिक्षण पद्धती यांना परकीय गुलाम मानसिकता बनवणारी शिक्षण पद्धती आहे पूज्य बापूजींनी हजारो कत्तलखान्यातील गाईंना वाचवून गोशाळा निर्माण केल्या हॉस्पिटलमध्ये होणारा खर्च पाहून गोरगरीब लोकांचे आरोग्य चांगले राहावे म्हणून स्वस्त दरात आयुर्वेदिक औषधी निर्माण केल्या पूज्य बापूजींचे लोक कल्याणकारी सत्कर्म धर्मविरोधी लोकांना सहन झाले नाही आणि म्हणून ८९ वर्ष वयोवृद्ध संतावर अत्याचार व अन्याय होत आहे भारतीय वैदिक संस्कृतीला तोडण्याची जागतिक षडयंत्र आहे त्यामुळे सर्व वारकरी संप्रदाय सर्व जाती धर्मीयांनी मतभेद विसरून संघटित व्हावे तरच भारतीय संस्कृतीचा सूवास गीता भागवताचे ज्ञान विश्वात याचा प्रचार करण्याची व भारताला विश्वगुरू पदावर अग्रेसर करण्याची आज गरज आहे झोपलेल्यांना जागे करता येते परंतु झोपेचे सोंग घेणारा ना जागे करता येत नाही सर्व जाती धर्म बांधवांनी संघटित होऊन बापूजींसारख्या संतावर होत असलेल्या अन्याय अत्याचाराचा विरोध केला पाहिजे हा हक्क भारताच्या संविधानाने आपल्याला दिला आहे आजचे विद्यार्थी उद्याचे देशाची भविष्य आहेत त्यांना गुरुकुल शिक्षण पद्धती द्वारे शिक्षण द्या ते जरूर महान बनतील यात तिळ मात्र शंका नाही सप्रेम हरिओम

सबका मंगल सबका भला हरी ओम युवा संघटना
परळी अंबाजोगाई ग्रुप

पान १ वरून...

धडाकेबाज कारवाई!

वेळोवेळी चौकशी व पडताळणी करण्यात आली होती. वरिष्ठ कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली आणि उपलब्ध अभिलेखांच्या आधारे पुढील कार्यवाही करण्यात आली.

कायद्यापुढे कोणाचीही गय नाही!

विशेष म्हणजे, बेकायदेशीर सावकारीसारख्या गंभीर विषयात केवळ तक्रारी घेऊन थांबण्याऐवजी प्रत्यक्ष चौकशी करून कायद्याच्या चौकटीत गुन्हा दाखल करण्यापर्यंत कार्यवाही नेण्यात आली. श्री. एस. के. चव्हाण यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता कायद्याच्या आधारे निर्भीडपणे कार्यवाही केल्याची चर्चा परिसरात होत आहे. सामान्य नागरिक, शेतकरी व आर्थिक अडचणीत असलेल्या व्यक्तींचे अवाजवी व्याज आकारणी आणि अनधिकृत सावकारीपासून संरक्षण व्हावे, या दृष्टीने अशा कारवाया महत्त्वपूर्ण ठरत आहेत. परवाना नसताना सावकारी व्यवसाय करणाऱ्यांनी कायद्याचे पालन करणे आवश्यक असून, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी सहकार विभागाची ही कार्यवाही एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री.सचिन नामदेव पगोटे करीत आहेत. निर्भीड अधिकारी, कायद्याची कठोर अंमलबजावणी आणि सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याची भूमिका हीच प्रशासनाची खरी ताकद आहे. परळी तालुक्यात झालेल्या या कार्यवाहीमुळे बेकायदेशीर सावकारी करणाऱ्यांना कायद्याचा स्पष्ट संदेश मिळाला आहे. सहकार अधिकारी श्रेणी-२ संलग्न सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका अंबाजोगाई, श्री. एस. के. चव्हाण यांच्या कार्यवाहीचे परिसरातून कौतुक होत आहे.

....

ना.पंकजाताई

महामार्ग क्र ५२ वरील मंझरी हवेली फाटा हा रस्ता मोठ्या वर्दळीचा असल्याने याठिकाणी वारंवार अपघात होतात, हे टाळण्यासाठी या रस्त्यावर उड्डाणपूल मंजुर करावा अशी मागणी ना. पंकजाताई मुंडेंनी गडकरी यांच्याकडे केली. या मागणीची गडकरी यांनी तात्काळ दखल घेऊन संबंधित विभागाला निर्देश दिले आणि केवळ पंधरा मिनिटांतच भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने मंझरी हवेली फाटा येथे उड्डाणपूलाच्या सर्वेक्षणाचे आदेश दिले आणि सन २०२६-२७ च्या प्रकल्प आराखड्यात याचा समावेश करत असल्याचे कळवले.

केंद्रीय रेल्वमंत्र्यांची भेट

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची देखील ना. पंकजाताई मुंडे यांनी आज भेट घेतली. या भेटीत बीड जिल्ह्यातील बीड-परळी रेल्वेमार्ग व जिल्ह्यातील रेल्वेच्या इतर समस्यांबाबत सविस्तर निवेदन देवुन चर्चा केली. मुंबई- लातुर, मछलीपट्टणम-बिदर, हैदराबाद-बिदर ह्या रेल्वेसेवा परळी वैजनाथ पर्यंत विस्तारीत कराव्यात तसेच परळी-बीड रेल्वेचे काम जलदगतीने पूर्ण करावे अशी मागणी त्यांनी पत्राद्वारे केली. या मागणीलाही रेल्वेमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत याबाबत लवकरच कार्यवाही करण्याचा शब्द दिला.

....

'व्हॉट्सॲप'

असल्याचा धक्कादायक प्रकार शनिवार ३१ ऑक्टोबर रोजी समोर आला. त्यामुळे ऐतिहासिक वारशाच्या संवर्धनाच्या नावाखाली सुरू असलेल्या कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. धारूरचा ऐतिहासिक किल्ला राज्य संरक्षित स्मारक असून त्याच्या संवर्धनासाठी शासनाने महावारसा विशेष स्मारक योजनेतून निधी उपलब्ध करून दिला आहे. नागपूर येथील बीएसएस कन्स्ट्रक्शन कंपनीला या कामाचे कंत्राट मिळाले आहे. अंबाजोगाई येथील आर्किटेक्ट या वास्तुविशारद संस्थेचा आराखडा आणि पुरातत्त्व विभागाच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली हे काम दोन वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. किल्ल्यातील झाडेझुडपे हटविणे, कोसळलेली तटबंदी पुन्हा उभारणे, प्रवेशद्वाराची दुरुस्ती, चुनामिश्रित गिलावा, ग्राउटिंग, कंगोरे आणि फरशीची कामे प्रस्तावित आहेत.सध्या किल्ल्यात ढासळलेल्या तटबंदीचे बांधकाम आणि जुन्या भिंतींमधील सांधे भरण्याचे काम सुरू आहे. मात्र, या कामावर पुरातत्त्व विभागाच्या अभियंत्यांची प्रत्यक्ष देखरेख कितपत आहे, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. पुरातत्त्व विभागाने कॉन्ट्रॅक्ट दारावरच सर्व सोपवले आहे. कन्स्ट्रक्शन कंपनीचा अभियंता अनुपम गणगारे व पहारेकरी कर्मचाऱ्यांची कामाच्या पाहणीसाठी नियुक्ती केल्याचे सांगण्यात येते. कंपनीचा अभियंता काम सुरू असताना मोबाईलमध्ये फोटो काढून संबंधित अभियंत्यांना व्हॉट्सॲपवर पाठविते. त्याच फोटोंच्या आधारे अभियंत्यांकडून मार्गदर्शन केले जात असल्याची माहिती संबंधित कंपनीचा अभियंता यांनी दिली शनिवारी याबाबत अधिक चौकशी करण्याचा प्रयत्न केला असता संबंधित व्यक्तीने तेथून काढता पाय घेतला.

पूर्वीच्या चुकीची पुनरावृत्ती नको!

यापूर्वीही दुसऱ्या कंत्राटदाराकडून झालेल्या कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न निर्माण झाले होते. बांधण्यात आलेल्या तटबंदीच्या भिंती अवघ्या सहा महिन्यांत ढासळल्याने पुन्हा बांधकाम करण्याची वेळ आली होती. ऐतिहासिक वास्तूंचे संवर्धन करताना पारंपरिक बांधकाम पद्धती, योग्य साहित्य आणि तांत्रिक निकषांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे जुन्या चुकीची पुनरावृत्ती झाल्यास शासनाचा कोट्यवधींचा निधी वाया जाण्याची भीती आहे.

अभियंत्यांची प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक!

नऊ कोटींच्या जवळपास खर्चाच्या या कामाची जबाबदारी केवळ कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांवर सोपवून चालणार नाही. पुरातत्त्व विभागाच्या संबंधित अभियंत्यांनी नियमित प्रत्यक्ष पाहणी करावी, तर विभागाच्या संचालिका व वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही कामाला भेट देऊन गुणवत्तेची तपासणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. व्हॉट्सॲपवरील फोटोंवरून ऐतिहासिक किल्ल्याचे संवर्धन होणार असेल, तर प्रत्यक्ष देखरेखीची जबाबदारी कोण पार पाडणार, असा सवाल उपस्थित होत आहे. धारूरच्या ऐतिहासिक वैभवाचे जतन करण्यासाठी या कामाची स्वतंत्र गुणवत्ता तपासणी करून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी इतिहासप्रेमींकडून होत आहे.

....

किसान सभेची मागणी

उद्ध्वस्त झाली असून शेतकऱ्यांना प्रचंड चढ्या भावाने चारा विकत घ्यावा लागत असल्याने त्यांची मोठी आर्थिक व शारीरिक ओढाताण होत आहे. सध्या बाजारात जनावरे मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी आणली जात आहेत, मात्र खरेदीदार नसल्याने शेतकऱ्यांसमोर जनावरे विकायला गेले तर विकत नाहीत आणि सांभाळावीत तर त्यांच्यासमोर खायला काय टाकावे? असा गंभीर पेच निर्माण झाला आहे. या परिस्थितीवर मात करण्यासाठी किसान सभेने प्रशासनासमोर जिल्हा नियोजन आयोगाच्या निधीतून पशुधनासाठी चारा व पाणी उपलब्ध करून द्यावा आणि चाऱ्याच्या गुणवत्तेकडे काटेकोर लक्ष द्यावे, छावणीला नको, दावणीला द्या या धोरणानुसार गावातच चारा पुरवठा व्हावा, जेणेकरून लहान शेतकऱ्यांना जनावरे घेऊन लांबच्या छावणीत जावे लागणार नाही, पशुधन विमा धोरण आखून पशु विम्याची बजेटमध्ये तरतूद करावी व पशुधनाचा विमा उतरावा, चाऱ्याची बचत होण्यासाठी मागेल त्याला कडबा कुट्टी योजनेअंतर्गत रु. २० हजार पर्यंतचे अनुदान देण्यात यावे, रोजगार हमी योजनेमध्ये मागेल त्याला हायड्रोपोनिक्स ही योजना समाविष्ट करावी. व्ही. जी. रामजी योजनेमध्ये पशुपालन व पशुखाद्य उगवणे यासाठी दोनशे दिवसांपेक्षा जास्त दिवसांचा रोजगार उपलब्ध करून द्यावा अशी मागणी यावेळी करण्यात आली. शासनाने प्रति जनावर लागणारा चारा शेतकऱ्यांच्या दावणीला मोफत उपलब्ध करून देणे अत्यंत तातडीचे झाले असून, या मागण्यांवर त्वरित कार्यवाही न झाल्यास शेतकरी व पशुधन उद्ध्वस्त होईल, असा इशारा परळी उपजिल्हाधिकारी, तहसीलदार व दुग्ध व पशुसंवर्धन अधिकारी यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यावेळी किसान सभेचे राज्य सहसचिव कॉ.अजय बुरांडे, कॉ.मुरलीधर नागरगोजे, कॉ.भगवान बडे, कॉ.विनायक राजमाने, धनंजय सोळंके, दूध उत्पादक शेतकरी ऋषिकेश भास्कर यांच्यासह इतर शेतकरी उपस्थित होते.

....

शिंगणवाडी

आमरण उपोषण सुरू करण्यात येणार असल्याचे ग्रामस्थांनी जाहीर केले आहे. शिंगणवाडी ग्रामपंचायतीमध्ये मनरेगा (MRGS), १४ वा व १५ वा वित्त आयोग, जिल्हा नियोजन समितीचा निधी (DPDC) तसेच जलजीवन मिशन योजनेच्या कामांमध्ये कथित गैरव्यवहार झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या सर्व योजनांच्या निधीचा विनियोग, मंजूर कामे, प्रत्यक्ष कामांची स्थिती, खर्चाची बिले आणि संबंधित अभिलेख यांची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, मागील आठ वर्षांपासून ग्रामसभा घेण्यात आलेली नसल्याचा गंभीर आरोपही ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामसभा न घेता ग्रामपंचायतीचा कारभार सुरू असल्यास त्याची प्रशासकीय स्तरावर चौकशी करून जबाबदार व्यक्तींवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. ग्रामपंचायतीच्या कारभारातील कथित अनियमितता, विविध योजनांतील निधीचा वापर आणि ग्रामसभेच्या प्रश्नावर प्रशासनाने तातडीने लक्ष घालावे. संबंधित प्रकरणांची चौकशी करून दोषींवर योग्य ती कारवाई करावी, तसेच विद्यमान सरपंचांचा उर्वरित कार्यकाळ बरखास्त करण्याबाबत नियमानुसार निर्णय घ्यावा, अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.या मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिंगणवाडी येथील समस्त ग्रामस्थांच्या वतीने धारूर पंचायत समितीसमोर आमरण उपोषण करण्यात येणार आहे. प्रशासन या आंदोलनाची दखल घेऊन संबंधित प्रकरणांची चौकशी करणार का आणि ग्रामस्थांच्या मागण्यांवर काय निर्णय घेणार, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

शेवटच्या पानावरून...

उपोषणाचा एल्गार!

असणाऱ्या वक्फ मंडळात कोट्यवधींच्या निधीचा विनियोग नेमका कुठे आणि कोणाच्या खिशात गेला, हा ज्वलंत प्रश्न उपोषणातून ऐरणीवर आला आहे. सन २०२० ते २०२५ या कालावधीतील अधिकृत लेखापरीक्षण (ऑडिट) अहवाल आणि ऑगस्ट २०२६ पर्यंतची संपूर्ण माहिती तातडीने अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे. ऑक्टोबर २०२३ ते २५ ऑगस्ट २०२६ या दरम्यान झालेल्या सर्व बैठकांचे इतिवृत्त, पारित झालेले ठराव आणि घेतलेले वादग्रस्त निर्णय जनतेसमोर उघड करण्याचे थेट आव्हान देण्यात आले आहे. जानेवारी २०२० पासून केवळ बैठकांच्या नावावर लाखो रुपयांची उधळपट्टी करण्यात आली असून या खर्चाची संपूर्ण बिले आणि तपशील सार्वजनिक करण्याची मागणी लावून धरण्यात आली आहे.या आंदोलनातील सर्वांत स्फोटक आणि गंभीर मुद्दा म्हणजे बैठकांमधील सदस्यांचा बेकायदेशीर सहभाग मानला जात आहे.जून २०२६ च्या बार कौन्सिल निवडणुकीत पराभूत झाल्यानंतरही ॲड. इफ्तेखार हाश्मी यांनी २५ ऑगस्ट २०२६ पर्यंत मंडळाच्या बैठकांमध्ये कोणाच्या वरदहस्ताने भाग घेतला? आयुब पठाण आणि ॲड. हाश्मी यांच्या सदस्यत्वाची कायदेशीर वैधता नेमकी काय? असा सवाल उपस्थित करत २२ जून ते २५ ऑगस्ट २०२६ दरम्यान घेतलेले सर्व निर्णय, संमत ठराव आणि स्वाक्षऱ्या वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम २५ व २६ नुसार पूर्णपणे बेकायदेशीर ठरवून संबंधितांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मुख्यालय स्थलांतराचा कुटील डाव आणि सीईओंची अनास्था..

पंचक्की येथील स्वतःच्या ऐतिहासिक आणि प्रशस्त जागेचा वापर न करता, कार्यालय अन्यत्र भाड्याच्या जागेत अथवा हज हाऊसमध्ये स्थलांतरित करण्याच्या हालचाली सुरू असून यामागे कोणाचे लागेबांधे आणि आर्थिक हितसंबंध दडले आहेत, असा थेट संशय व्यक्त करण्यात आला आहे. त्याचबरोबर, मुख्य कार्यकारी अधिकारी छत्रपती संभाजीनगरच्या मुख्य कार्यालयात महिन्यातील नेमके किती दिवस प्रत्यक्ष हजर असतात, त्यांची बायोमेट्रिक व अधिकृत हजेरी जाहीर करण्याचे खुले आव्हान उपोषणकर्त्यांनी दिले आहे. दररोज १५० ते २०० नागरिक आपल्या न्याय्य हक्कांसाठी राज्यभरातून येतात, मात्र त्यांच्यासाठी कार्यालयात बसायला धड चार आसनेही उपलब्ध नाहीत; जनतेच्या पैशांवर मौजमजा करणाऱ्या अधिकाऱ्यांना सामान्य नागरिकांना मूलभूत सुविधा देता येत नसल्याने संताप व्यक्त होत आहे.

आरपारची लढाई: दोषींना तुरुंगात धाडा!

या सर्व गंभीर गैरप्रकारांसंदर्भात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वक्फ मंत्री, अल्पसंख्याक आयोग आणि पोलीस आयुक्तांना कागदोपत्री पुरावे सादर करण्यात आले आहेत. ''वक्फची संपत्ती ही सामान्य जनतेची पवित्र अमानत आहे, अधिकाऱ्यांची खासगी जहागीर नाही. प्रशासनाने कागदी घोडे नाचवणे थांबवून या सर्व प्रकरणांची उच्चस्तरीय चौकशी करावी आणि दोषींना थेट तुरुंगात धाडावे. मागण्यांची पूर्तता होईपर्यंत जागेवरून तसूभरही हलणार नाही,'' असा निर्वाणीचा इशारा उपोषणकर्ते मोहम्मद खमरुल इमान खान आणि शेख मकसूद गोंदवाले यांनी दिला आहे. या आंदोलनामुळे भ्रष्ट अधिकारी आणि दलालांचे धाबे दणाणले आहेत.

....

जायकवाडी धरण

आवर्तन असे एकूण चार आवर्तने शेतीसाठी मंजूर करण्यात आली आहेत. मंजूर पाणी आवर्तनाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे देण्याची नियोजन करण्यात आले आहे पहिले आवर्तन : ५ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर, दुसरे आवर्तन : १५ डिसेंबर ते ८ जानेवारी तिसरे आवर्तन : फेब्रुवारी महिन्यात चौथे आवर्तन : उन्हाळी हंगामात येत्या ५ नोव्हेंबर रोजी कालव्याला पाणी सोडण्यात येणार असून, गोदावरी नदीवरील सर्व बंधाऱ्यांमध्येही पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी पाण्याची उपलब्धता व्हावी, पिकांना जीवदान मिळावे आणि दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, यासाठी आमदार हिकमत दादा उढाण यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. आजच्या बैठकीतील निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे . जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे व घनसांगी मतदार संघाचे आमदार हिकमत उडाण यांचे शेतकऱ्यांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

....

शिल्पा लाहोटी

मात्र, रस्त्यावरच रेती, खडी, विटा व बांधकामाचे साहित्य टाकण्यात आल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. विशेषतः शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि भाविकांनाही मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. सार्वजनिक रस्ते हे नागरिकांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी आहेत. कोणालाही रस्त्यावर बांधकाम साहित्य टाकून वाहतुकीस अडथळा निर्माण करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे नगर परिषदेने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित ठिकाणाची तात्काळ पाहणी करावी, रस्त्यावरील सर्व बांधकाम साहित्य हटवावे, तसेच अतिक्रमण करणाऱ्यांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नगरसेविका शिल्पा लाहोटी यांनी केली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारचे अतिक्रमण पुन्हा होऊ नये, यासाठी नगर परिषदेने आवश्यक उपाययोजना करून शाळा परिसर आणि मंदिर दर्शनाच्या मार्गावरील वाहतूक सुरक्षित व सुरळीत ठेवावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि नागरिकांची गैरसोय लक्षात घेता नगर परिषद प्रशासन या मागणीवर किती तत्परतेने कार्यवाही करते, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

....

वानटाकळी

रोजी श्रीविनोद रनविरे ,तहसीलदार परळी वैजनाथ यांना नोटीस देऊन वानटाकळी चे सरपंच श्रीमती गंगाबाई ज्ञानोबा हांगे यांच्या विरुद्ध ,सरपंच, ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात न घेता परस्पर बेकायदेशीर मनमानी कारभार करत आहे., सरपंच, ग्रामपंचायत सदस्यांची नियमित मासिकसभा घेत नाही., सरपंच, ग्रामपंचायत वानटाळी ची नियमित ग्रामसभा घेत नाही., सरपंच, ग्रामपंचायत सदस्यांना गाव विकासाच्या कामाचा व निधीचा हिशोब देत नाही., सरपंच, ग्रामपंचायत अंतर्गत नागरिकांना पिण्याच्या पाण्याची व आरोग्य,स्वच्छतेची नागरी समस्या सोडविण्यासाठी पर्यत्न करत नाही.या व इतर कारणांमुळे सरपंच श्रीमती गंगाबाई ज्ञानोबा हांगे यांच्या विरुद्ध १)तुकाराम देविदास मुंडे २) अनिल शिवराम जाधव ३) सौ.हौसाबाई आत्माराम गायके ४) सौ.गंगा अनिल गायके ५) सौ.अर्चना उत्तम कसबे ६) प्रतिक्षा राजाभाऊ भाकरे ७)सौ कोमल भैय्यासाहेब घाडगे. यांनी अविश्वास ठराव दाखल केला आहे,त्यावर तहसीलदार परळी वैजनाथ यांनी दि.०५/११/२०२६ रोजी दुपारी ३ वाजता ग्रामपंचायत कार्यालय वानटाळी येथे तहसीलदार परळी वैजनाथ यांचे अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे.असी माहिती तुकाराम देविदास मुंडे यांनी दिली आहे.

तुकाराम देविदास मुंडे
ग्रामपंचायत सदस्य वानटाकळी

....

अग्रीम मदत

आर्थिक आधार मिळाला असल्याची माहिती आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर विश्वास असून, केंद्र शासनाचे अनुदान, राज्य शासनाची मदत आणि पीकविमा यांसह शेतकऱ्यांना देय असलेली मदत मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. अग्रीम मदतीनंतरही नुकसानभरपाईची प्रक्रिया सुरू राहणार असून, पात्र शेतकऱ्यांना शंभर टक्के मदत मिळणारच, असा ठाम विश्वास आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांनी निराश होऊ नये, शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले. दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना वेळेवर आर्थिक मदत मिळणे ही शासनाची संवेदनशीलता आणि शेतकरीहिताची बांधिलकी दर्शवणारी बाब आहे. अग्रीम मदतीमुळे शेतीचा खर्च, दैनंदिन गरजा आणि आगामी हंगामाच्या तयारीसाठी शेतकऱ्यांना हातभार लागणार आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी निर्णय घेणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्र शासनाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी मनःपूर्वक आभार मानले. शेतकऱ्यांना शासनाच्या सर्व मदतीचा लाभ मिळवून देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी सांगितले.

....

धान्य तुला सोहळा

साईराज बोराडे सह नातेवाईक, स्नेहीजण तसेच राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहून मातोश्री नंदाबाई बोराडे यांना दिर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी किरणताई तौर, भावनाताई नखाते, ॲड. पंकज बोराडे आणि आण्णासाहेब बोराडे यांनी आपल्या मनोगतातून आईच्या प्रेरणादायी व्यक्तित्त्वाचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनिषा उमरीकर यांनी केले, तर रवींद्र तौर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

जाहिर प्रगटन

सर्व जनता मौ. परळी वै ता. परळी वै. जि. बीड अर्जदार श्री प्रभु भिवाजी गिते. रा. चांदापुर ता.परळी वै जि. बीड यांनी मौजे चांदापुर येथील सर्व्हे नंबर २ मधील २८ आर जमीनीतील ७/१२ वर साधे कुळाची नोंद आहे. इतर हक्कामध्ये सा. कुळाची नोंद आहे ही नोंद महसूल अभिलेखात कमी करणे बाबत या कार्यालयास विनंती केली आहे.

सबब, वरील जमिन विक्रीसाठी परवानगी मिळणेबाबत आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाले पासुन १५ (पंधरा) दिवसाचे आत स्वत: अथवा विधिज्ञांमार्फत खाली सही करणाराचे कार्यालयात आपला आक्षेप / उजरदारी नोंदवावी. उशीरा प्राप्त झालेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/–
तहसिलदार परळी वै.

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा परळी वै., जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, श्री.डि.वाय.रायरीकर यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५९७/२०२६

शारदाबाई ज्ञानोबा गुट्टे वि. निरंक
(मार्फत ॲड.के.टी.गोलेर परळी वै.)

अर्जदार –

१. शारदाबाई भ्र.ज्ञानोबा गुट्टे, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम रा.नंदनंज, ता.परळी वै. जि.बीड
२. तुकाराम पि.ज्ञानोबा गुट्टे, वय २२ वर्षे, धंदा शेती, रा.नंदनंज, ता.परळी वै. जि.बीड
३. विश्वजीत पि.ज्ञानोबा गुट्टे, वय २१ वर्षे, धंदा शेती, रा.नंदनंज, ता.परळी वै. जि.बीड
४. प्रतिक्षा भ्र.दिपक लटपटे, वय २४ वर्षे, धंदा घरकाम, रा.कोद्री, ता.गंगाखेड जि.परभणी
५. सुमनबाई भ्र.नाथराव गुट्टे, वय ७६ वर्षे धंदा घरकाम, रा.नंदनंज, ता.परळी वै. जि.बीड

ज्याअर्थी **मयत ज्ञानोबा पि.नारायण गुट्टे हे/हया दिनांक ०९/०५/२०२३ रोजी मौजे हेळंब, ता. परळी वै. जि. बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क.१ यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **मयत ज्ञानोबा पि.नारायण गुट्टे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३०/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :– ०७/१२/२०२६

स्वाक्षरीत/–
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय क.स्तर, परळी वै.

स्वाक्षरीत/–
सहायक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, परळी वै.

03 Nov 2026 jalna page 3_Layout 1 11/3/2026 12:38 AM Page 1

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना | मंगळवार दि.०३ नोव्हेंबर २०२६ | पान ३

पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांचा जालना जिल्हा दौरा कार्यक्रम

जालना/जिमाका

राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे या जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहेत.

पालकमंत्री मुंडे यांचे मंगळवार दि. ३ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वरुडी ता. बदनापूर येथील शिंदे सिल्क इंडस्ट्रीज प्रा.लि. भेट देवून पाहणी करतील. सकाळी ११.०० वाजता जालना शहराकडे आगमन करतील. सकाळी ११.३० वाजता जालना महानगरपालिकेच्या हुतात्मा स्मारक लायब्ररी, टाऊन हॉल लायब्ररी, ग्लो गार्डन व नेहरु उद्यान भूमिपुजन कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी १२.३० वाजता जालना महानगरपालिका कार्यालयाकडे रवाना होतील. दुपारी १२.३० वाजता जालना महापालिका विविध विकास कामांचा व पाणी टंचाई आढावा बैठकीस उपस्थित राहतील. स्थळ- जालना महानगरपालिका सभागृह. दुपारी १.३० ते २.२० राखीव दुपारी २.२५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रयाण करतील. दुपारी २.३० वाजता जिल्ह्यातील दुष्काळ परिस्थिती व पाणी टंचाई आढावा बैठकीस उपस्थित राहतील. दुपारी ३.३५ वाजता जिल्हा रेशीम कार्यालयाकडे प्रयाण करतील. दुपारी ३.४५ वाजता रेशीम कोष बाजारपेठेला भेट देवून पाहणी करतील. स्थळ जिल्हा रेशीम कार्यालय, जालना तसेच दुपारी ४.२० वाजता परळी वैजनाथ जि. बीडकडे प्रयाण करतील.

ना.पंकजाताई मुंडे उद्या जालन्यात; दुष्काळी परिस्थिती, पाणी टंचाईचा घेणार आढावा

जालना,बीड/प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे उद्या (ता. ०३) जालना दौऱ्यावर असून शहर व जिल्ह्यातील पाणी टंचाई तसेच दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी जिल्हा प्रशासनाची बैठक घेणार आहेत. ४ नोव्हेंबर रोजी परळीत तर ५ तारखेला त्या बीडमध्ये असणार आहेत, अशी माहिती त्यांच्या संपर्क कार्यालयातून देण्यात आली आहे.

ना. पंकजाताई मुंडे यांचा ३ ते ५ नोव्हेंबर दरम्यानचा दौरा पुढील प्रमाणे...मंगळवार ३ नोव्हेंबर रोजी त्या जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून सकाळी १०.३० वा. शिंदे सिल्क इंडस्ट्रीजला भेट, ११.३० वा. जालना महानगरपालिकेच्या हुतात्मा स्मारक, टाऊन हॉल, ग्लो गार्डन व नेहरू उद्यानाचे भूमिपूजन त्यानंतर दुपारी १२.३० वा जालना महानगरपालिकेतील विविध विकासकामांचा आढावा व पाणीटंचाई संदर्भात बैठक, दुपारी २.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालयात जालना जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती व पाणीटंचाईचा आढावा घेतल्यानंतर जिल्हा रेशीम कार्यालय येथे रेशीम कोष बाजारपेठेला त्या भेट देणार आहेत.

४ तारखेला परळीत; ५ ला बीडमध्ये घेणार दुष्काळाचा आढावा

बुधवारी, ४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत परळी, माजलगाव व केज तालुक्यांतील अभ्यागतांच्या भेटीसाठी वेळ राखीव ठेवण्यात आला आहे. या भेटी शासकीय विश्रामगृह, छत्रपती शिवाजी महाराज चौक, परळी वैजनाथ येथे होणार आहेत. गुरुवारी, ५ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वा. अंबाजोगाई येथे डॉ. नवनाथ घुगे यांच्या 'घुगे हार्ट अँड केअर हॉस्पिटल'चे उद्घाटन होणार आहे. त्यानंतर दुपारी १२.३० वा. बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती व पाणीटंचाईचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक होईल. दुपारी १.४० वा. बीड येथे जनसंपर्क कार्यालयात त्या अभ्यागतांच्या भेटीसाठी उपलब्ध असणार आहेत.

दुष्काळसदृश्य परिस्थितीत प्रभाग क्र.१ मधील नागरी समस्या तातडीने सोडवा-नगरसेवक भास्कर आबा दानवे

जालना/प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १ मधील नागरिकांना भेडसावणाऱ्या तीव्र पाणीटंचाई आणि पाणीपुरवठ्याशी संबंधित विविध समस्यांबाबत भारतीय जनता पक्षाचे महानगर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक भास्कर आबा दानवे यांनी महानगरपालिकेच्या आयुक्तांना उपाययोजना करण्याची पत्राद्वारे मागणी केली आहे. या पत्रामध्ये प्रभागातील पाणीपुरवठा सुरळीत करणे, जलवाहिनी दुरुस्तीतील विलंब दूर करणे आणि नवीन जलवाहिन्या टाकण्याची मागणी करण्यात आली आहे.

प्रभाग क्रमांक १ मधील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पश्चिम बाजूस नव्याने विकसित झालेल्या द्वारका नगर, रॉयल नगर आणि भगत नगर या परिसरांमध्ये महानगरपालिकेमार्फत जलवाहिनी टाकण्यात आलेली आहे. मात्र, अद्यापपर्यंत या परिसरात पाणीपुरवठा सुरू करण्यात आलेला नाही, ज्यामुळे स्थानिक नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे या परिसरात नियमित व सुरळीत पाणीपुरवठा सुरू करावा अशी मागणी पत्रात केली आहे.



याशिवाय, प्रभाग क्रमांक १ मधील विविध परिसरांमध्ये पाणीपुरवठा अनियमित व अपुऱ्या प्रमाणात होत असल्याने नागरिकांना सतत पाणीटंचाईचा त्रास सहन करावा लागतो. संबंधित भागात जलवाहिनी नादुरुस्त होणे किंवा लिकेज झाल्यास दुरुस्तीसाठी रस्त्यांवर खोदकाम केले जाते, परंतु प्रत्यक्ष दुरुस्तीचे काम पूर्ण होण्यास १५ ते २० दिवसांचा अवधी लागतो. यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत होऊन नागरिकांची मोठी गैरसोय होते. तसेच, रस्त्यांवर खोदकाम करून खड्डे व उघड्या अवस्थेतील कामामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून, रात्रीच्या वेळी अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

प्रभागातील काही नव्याने विकसित झालेल्या सोसायट्यांमध्ये अद्याप जलवाहिनी टाकण्यात आलेली नाही. त्यातच चालू वर्षातील दुष्काळसदृश्य परिस्थितीमुळे पाणीटंचाईची समस्या अधिक बिकट होत चालली आहे. त्यामुळे फाईन लिव्हिंग सोसायटी, स्काय बर्ड सोसायटी (जिजामाता कॉलनी), म्हाडा कॉलनी (शिवाजीनगर), ढवळेश्वर आणि मानकरतन नगर या ठिकाणी नवीन जलवाहिनी टाकण्याच्या कामास प्राधान्य देऊन लवकरात लवकर कार्यवाही करावी अशी मागणी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केली आहे.

शेतकऱ्यांच्या खात्यात ५ हजारांची अग्रिम मदत जमा होण्यास सुरुवात

जालना/जिमाका

राज्य शासनाने दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांसाठी महत्वपुर्ण निर्णय घेतला असून, त्यांच्या खात्यात पाच हजार रुपयांची अग्रिम मदत जमा होण्यास सुरुवात झाली आहे. जालना जिल्हा प्रशासनाने अशा शेतकऱ्यांची यादी अपलोड केली आहे, ज्यांना थेट डीबीटी द्वारे ५ हजार रुपयांची आगाऊ रक्कम दिली जाणार आहे. राज्य शासनाने आजपासून शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे पाठवण्यास सुरुवात केली आहे. यात जिल्ह्यातील जालना तालुक्यातील ९१ हजार २२६ शेतकरी तर बदनापुर तालुक्यातील ६४ हजार ६७८, भोकरदन तालुक्यातील १ लाख ३३ हजार ८९९, जाफ्राबाद तालुक्यातील ७० हजार ६३५, परतुर तालुक्यातील ५१ हजार २२६, मंठा तालुक्यातील ६४ हजार ८८८, अंबड तालुक्यातील ९१ हजार २०० आणि घनसावंगी तालुक्यातील ७७ हजार २०५ असे जिल्ह्यातील एकुण ६ लाख ४४ हजार ९५७ शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे पाठवण्यास सुरुवात झाली आहे. दिवाळीच्या सणापूर्वीच ही रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात झाल्याने, त्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. दुष्काळामुळे शेतीचे झालेले नुकसान आणि आर्थिक अडचणींना तोंड देत असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही ५ हजार रुपयांची अग्रिम मदत राज्य शासनाकडून तातडीने दिली जात आहे. या निर्णयामुळे शेतकरी बांधवांना दिवाळी सण साजरा करण्यासाठी आणि दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी हातभार लागणार आहे. जिल्ह्यात या अग्रिम मदतीची अंमलबजावणी वेगाने सुरू झाली असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी दिली आहे.

खुल्या न्यायालयात गैरवर्तन करून आता लपता कशाला? सर्वोच्च न्यायालयाकडून वकिलाची याचिका फेटाळली

नवी दिल्ली/विशेष वृत्तप्रतिनिधी

वडिलांच्या जामिनासाठी स्वतःची वकिली सनद (बार लायसन्स) हमी म्हणून देण्याची भाषा करणाऱ्या आणि प्रत्यक्ष सुनावणीदरम्यान गैरवर्तन करणाऱ्या एका वकिलाला सर्वोच्च न्यायालयाने तीव्र शब्दांत फटकारले आहे. सुनावणीचे ऑडिओ-व्हिडिओ चित्रण सोशल मीडियावरून हटवण्याच्या मागणीसाठी या वकिलाने याचिका दाखल केली होती. त्यावर सरन्यायाधीशांच्या खंडपीठाने अत्यंत कडक शब्दांत ताशेरे ओढत, ''जर तुम्ही खुल्या न्यायालयात इतके धाडस दाखवू शकता, हवी तशी भाषा वापरू शकता, तर आता लपण्याचा प्रयत्न कशाला करत आहात?'' असा थेट सवाल उपस्थित केला.

याचिकाकर्ते वकील भानू प्रताप सिंग यांनी दाखल केलेल्या याचिकेत सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स, गुगल, मेटा, एक्स आणि विविध न्यूज पोर्टल्सवरून त्यांच्या सुनावणीचे क्लिप्स तातडीने हटवण्याचे (टेकडाउन) आदेश देण्याची मागणी केली होती. तसेच हे व्हिडिओ डार्क वेब किंवा इतर अनधिकृत डिजिटल माध्यमांवर पसरू नयेत, यासाठी उपाययोजनांची मागणी केली होती. मात्र, न्यायालयाने ही याचिका मुदतपूर्व असल्याचे स्पष्ट केले. न्यायमूर्ती बागची यांनी नमूद केले की, सोशल मीडियावरील आक्षेपार्ह मजकूर हटवण्यासाठी माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६९-अ अंतर्गत उपलब्ध असलेले कायदेशीर पर्याय याचिकाकर्त्याने आधी पूर्णपणे चोखाळले पाहिजेत. थेट न्यायालयात येण्याऐवजी आधी संबंधित प्लॅटफॉर्मकडे रीतसर तक्रार करणे आवश्यक होते. तसेच प्रसारित व्हिडिओ हे बनावट किंवा एआय-निर्मित नसल्याचेही खंडपीठाने स्पष्ट केले. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सने तक्रार ऐकली नाही, तरच पुन्हा न्यायालयात दाद मागावी, अशी मुभा देत न्यायालयाने ही याचिका निकाली काढली. या संपूर्ण घडामोडीवर कायदेशीर विश्लेषक ॲड. महेश धन्नावत यांनी आपले मत मांडताना म्हटले की, सर्वोच्च न्यायालयाचे हे स्पष्ट ताशेरे देशभरातील वकिलांसाठी एक अत्यंत मोठा आणि डोळे उघडणारा धडा आहेत. आजच्या डिजिटल आणि थेट प्रक्षेपणाच्या (लाईव्ह स्ट्रीमिंग) युगात न्यायालयात आपण कसे वागतो आणि बोलतो, यावर संपूर्ण समाजाचे लक्ष असते. वकिली पेशा हा केवळ कोर्टात वाद घालण्यापुरता मर्यादित नसून, न्यायालयाचा सन्मान आणि भाषेची प्रतिष्ठा राखणे हे प्रत्येक वकिलाचे प्राथमिक कर्तव्य आहे.

आवेशात येऊन कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन बोलणे आणि नंतर सोशल मीडियावर बदनामी होते म्हणून पळवाट शोधणे अत्यंत चुकीचे आहे. न्यायालयातील आचारसंहिता, भाषेचा संयम आणि शिस्त हीच वकिलाची खरी ओळख असते. त्यामुळे भावनिक न होता केवळ कायद्याच्या परिघात राहूनच आपली बाजू मांडली पाहिजे, हाच सर्वात मोठा धडा या प्रकरणातून सर्व वकिलांनी घेतला पाहिजे, असे ॲड. महेश धन्नावत यांनी नमूद केले.

बीड एसटी महामंडळात शिकाऊ उमेदवारांची भरती सुरू; विविध व्यवसायांसाठी संधी

बीड/जिमाका

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बीड विभागीय कार्यालयांतर्गत सन २०२६-२७ या सत्रासाठी विविध व्यवसायांमध्ये शिकाऊ उमेदवार (Apprentice) निवडीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मान्यताप्राप्त ITI मधून विविध व्यवसायांमध्ये उत्तीर्ण झालेले उमेदवार या भरतीसाठी पात्र असतील. केंद्र शासनाच्या apprenticeshipindia.org या M.I.S पोर्टलवर शिकाऊ उमेदवार भरतीची कार्यवाही प्रथम ऑफलाईन पद्धतीने आणि नंतर ऑनलाईन पद्धतीने केली जाणार आहे. शिकाऊ उमेदवारांसाठी भरावयाच्या जागा, विद्यावेतन, शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा आणि अर्ज करण्याची शेवटची तारीख यांसारख्या अटी व शर्तींची सविस्तर माहिती वरील अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी जास्तीत जास्त उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा. असे, आवाहन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, विभाग नियंत्रक राज्य परिवहन, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्र. ०२४४२-२२२५८० यावर संपर्क साधावा.

कुरेशी मोहल्लयात गोवंश कत्तलखान्यावर छापा, १४ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त!

अंबड/ज्ञानेश्वर साळुंके

अंबड शहरातील कुरेशी मोहल्ला परिसरात सुरू असलेल्या अवैध गोवंश कत्तलीवर अंबड पोलिसांनी दिनांक ०१ नोव्हेंबर २०२६ रोजी पहाटे ६:१० वाजता धाडसी छापा कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी कत्तल केलेले संशयित मांस, हत्यारे, वजनकाटे, चार चारचाकी व दोन दुचाकी वाहनांसह तब्बल १४ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस निरीक्षक संतोष घोडके यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, कुरेशी मोहल्ला येथील हनीफ दादामियाँ कुरेशी याच्या तीन मजली इमारतीत गोवंशीय जनावरांची कत्तल सुरू होती व बाजूलाच जनावरे बांधून ठेवण्यात आली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ ढाकणे, पोलीस उपनिरीक्षक आर. एस. जावळे व पथकासह तात्काळ घटनास्थळी पोहोचून पंचांसमक्ष ही कारवाई केली.

कारवाईची ठळक वैशिष्ट्ये:

जप्त केलेले साहित्य: अंदाजे ५०० किलो संशयित गोमांस, धारदार कुऱ्हाडी, सुरे, चाकू, सत्तूर, लाकडी ओंडके, फ्रीज, वजनकाटे, डिजिटल पेमेंट क्यूआर कोड आणि व्यवहाराची वही.

वाहन जप्त: टाटा एस, टवेरा, मारुती सुझुकी स्विफ्ट आणि महिंद्रा स्कॉर्पिओ या चार चारचाकी गाड्यांसह दोन दुचाकी वाहने जप्त करण्यात आली आहेत.

जिवंत जनावरे: घटनास्थळावरून एकूण चार जिवंत जनावरांची सुटका करून त्यांची पुढील काळजी व सुरक्षिततेसाठी गोशाळेत व्यवस्था करण्याची कार्यवाही सुरू आहे.

गुन्हा दाखल: मुख्य आरोपी हनीफ दादामियाँ कुरेशी व त्याच्या इतर साथीदारांविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये पोलीस ठाणे अंबड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही यशस्वी कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. तेगबीर सिंग संधू (जालना), मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी (जालना) तसेच मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सिद्धेश्वर धुमाळ (अंबड) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष घोडके यांच्या नेतृत्वाखाली एपीआय अमित म्हस्के, पीएसआय आदिनाथ ढाकणे, पीएसआय रोहन जावळे आणि पोलीस अंमलदारांच्या पथकाने पार पाडली. अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध गोवंश कत्तल, वाहतूक व विक्री यांसारख्या बेकायदेशीर कृत्यांविरुद्ध यापुढेही सातत्याने कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे ॲड निलेश हेलोंडे यांचा जालना जिल्हा दौरा कार्यक्रम

जालना/जिमाका

कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे राज्यमंत्री दर्जा तथा जालना जिल्ह्याच्या ॲड निलेश हेलोंडे या जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहेत.

ॲड श्री. हेलोंडे हे बुधवार दि. ४ नोव्हेंबर, २०२६ रोजी दुपारी ५.०० वाजता तहसिलदार बदनापूर यांनी निश्चित केलेल्या शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबास भेट देतील. सायंकाळी ६.०० वाजता छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

भाजपा जालना महानगर च्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त एकता दौड

देशाची एकता हेच भारताचे खरे सामर्थ्य-माजी मा.आ.कैलास गोरंटयाल

जालना/प्रतिनिधी

भारताचे पहिले उपपंतप्रधान व पहिले गृहमंत्री, भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवसाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टी, जालना महानगरच्या वतीने एकता दौड चे आयोजन आज दि. ३१ ऑक्टोबर २०२६ शनिवार रोजी करण्यात आले, ही एकता दौड भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथन सुरू होऊन लक्कडकोट-बसस्थानक-मामा चौक-महावीर चौक-सुभाषचंद्र बोस चौक मार्गे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून राष्ट्रगीताने एकता दौड ची सांगता झाली. यावेळी माजी आ.कैलास गोरंटयाल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, सभापती अशोक पांगारकर, गटनेते महेश निकम, संगीताताई गोरंटयाल, मा.जिल्हाध्यक्ष सतीश जाधव, जिल्हा सरचिटणीस अरुणा जाधव, वसंत शिंदे, अमोल कारंजेकर, सुनील पवार, शिवप्रकाश चितळकर, युवामोर्चा जिल्हाध्यक्ष गोविंद भताने, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा शुभांगी देशपांडे, संध्याताई देठे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचा गौरव केला. देशाची एकता आणि अखंडता टिकवून ठेवण्यासाठी सरदार पटेल यांनी केलेले कार्य अतुलनीय असून त्यांच्या विचारांची आजच्या काळातही तितकीच आवश्यकता आहे. भारताची विविधतेतील एकता हीच देशाची खरी ताकद आहे. जात, धर्म, भाषा आणि प्रांत यापलीकडे जाऊन प्रत्येक भारतीयाने राष्ट्रहिताला प्राधान्य देणे आवश्यक आहे. राष्ट्रीय एकता दिवसाच्या माध्यमातून नव्या पिढीमध्ये देशभक्ती, राष्ट्रनिष्ठा आणि सामाजिक एकात्मतेची भावना अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याचे स्मरण करून सांगितले की, सरदार पटेल यांनी स्वातंत्र्यानंतर देशातील विविध संस्थानांचे एकत्रीकरण करून अखंड भारताच्या निर्मितीत ऐतिहासिक योगदान दिले. त्यांची राष्ट्रनिष्ठा, दृढ इच्छाशक्ती आणि देशाच्या एकतेसाठी केलेले कार्य प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे. राष्ट्रीय एकता दिवसाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेली एकता दौड ही देशाच्या एकात्मतेचा आणि अखंडतेचा संकल्प करणारा उपक्रम आहे. सरदार पटेल यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत देशाच्या विकासासाठी आणि राष्ट्रहितासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी शिवाजी शेजूळ, सिद्धिविनायक मुळे, आनंद झाड, महावीर ढक्का, दुर्गेश कुरील, जगदीश भरतीया, विक्रांत ढक्का, रोहित भूरेवाल, सुरज पणबिसरे, यश खरात, सतीश केरकळ, मंडळ अध्यक्ष अमोल धानुरे, मोहन राऊत, ॲड. रिमा खरात, सखुबाई पणबिसरे, पूनम स्वामी, अनामिका पांगारकर, पदमा मानधनी, स्नेहलता कामड, वैशाली बनसोडे, रमेश गौरक्षक, जगदीश भरतिया, कल्याण भदनेकर, अशोक पवार, आनंद झारकंडे, भगवान चांदोडे, अर्जुन गेही, विनोद रत्नपारखे, सोपान पेंढारकर, देविदास देशमुख, विजय कामड, राजेश स्वामी, मनोज इंगळे, नंदकिशोर गरदास, मनोज बिडकर, दत्ता जाधव, बाबुराव भवर, सुमित सुरडकर, करण निकाळजे, विकास कदम, विष्णू डोंगरे, विजय पवार, शिवराज नारीयलवाले, विठ्ठल इंदलकर, अजित मानधनी, अमोल भवर, जीवन सले, राजेश देसार, मुकेश चव्हाण, शाम उगले, गोपाल चौधरी, योगेश लहाने, हरिभाऊ नाटकर, गणेश कळकुंबे, गणेश शेवाळे, कैलास सोळुंके, गणेश जल्लेवार, राजाराम जाधव, गौरव गोधेकर, पियुष मुंगसे, गुलाब पणबिसरे आदींसह मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

महाराष्ट्राच्या रणरागिणी तथा जालना जिल्हयाच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली

जालना शहराची रेशीम नगरीकडे वाटचाल

महाराष्ट्राच्या रणरागिणी तथा जालना जिल्हयाच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली जालना शहराची रेशीम नगरीकडे वाटचाल सुरू झाल्या असून रेशीम उद्योग हा कमी पाण्यात, तुलनेने कमी जोखमीसह नियमित उत्पन्न देणारा, पर्यावरणपूरक आणि हवामान बदलाच्या परिस्थितीतही सक्षम असा शेतीपूरक व्यवसाय आहे. त्यामुळे शेतकरी, महिला आणि ग्रामीण युवकांसाठी वर्षभर रोजगार व उत्पन्नाचे साधन म्हणून रेशीम उद्योगाचे महत्त्व वाढत आहे.

महाराष्ट्रात सध्या २० हजार ९३८ शेतकरी आणि २२ हजार ६४५ एकर तुती क्षेत्र आहे. गतवर्षी राज्यात ५ हजार ७६५ मेट्रिक टन रेशीम कोष आणि ८८६ मेट्रिक टन रेशीम धाग्याचे उत्पादन झाले. मराठवाड्यात ११ हजार ८८१ एकर तुती क्षेत्र आणि ३ हजार १३४ मेट्रिक टन कोष उत्पादन असून, राज्याच्या एकूण कोष उत्पादनात मराठवाड्याचा ५४ टक्के वाटा आहे.

जालना जिल्ह्यात सध्या ८९४ शेतकरी आणि ९१५ एकर तुती लागवड आहे. स्टील सिटी आणि सीड सिटी अशी ओळख असलेल्या जालन्याला आता रेशीम नगरी म्हणून नवी ओळख देण्याचा प्रयत्न सुरू आहे. तुती लागवडीपासून अंडीपुंज निर्मिती, कीटक संगोपन, कोष उत्पादन, कोष विक्री, धागा निर्मिती, रंगाई, हातमाग विणकाम आणि तयार रेशीम वस्त्रनिर्मितीपर्यंतची संपूर्ण मूल्यसाखळी जिल्ह्यात विकसित करण्याचे नियोजन आहे.

यामुळे जालना रेशीम मातीपासून वस्त्रापर्यंत ही संकल्पना प्रत्यक्षात येणार असून, शेतकऱ्यांच्या उत्पादनाला स्थानिक पातळीवरच मूल्यवर्धन मिळणार आहे.

जालना येथे २.५ एकर क्षेत्रापैकी १,३८९.५१४ चौ.मी. क्षेत्रावर अत्याधुनिक रेशीम कोष बाजारपेठ उभारण्यात आली आहे. यासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत ६ कोटी १३ लाख आणि जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत १ कोटी २० लाख, अशी एकूण ७ कोटी ३३ लाख रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. आधुनिक लिलाव सभागृह, कोष वाळवण व साठवणूक सुविधा, प्रतवारी व कोष परीक्षण केंद्र, शेतकरी प्रशिक्षण सभागृह, प्रशासकीय व बैठक कक्ष, तसेच खरेदी-विक्री प्रक्रियेत पारदर्शकता आणणारी संगणकीय प्रणाली आणि भ्रमणध्वनी उपयोजनाची सुविधा येथे उपलब्ध आहे. शेतकरी व व्यापाऱ्यांसाठी निवास व्यवस्था, ११.५ किलोवॅट सौरऊर्जा संच आणि तीन सौर उंच दिवेही बसविण्यात आले आहेत.



जालना रेशीम कोष बाजारपेठेची सुरुवात २०१८ मध्ये झाली. त्यापूर्वी शेतकऱ्यांना कोष विक्रीसाठी सुमारे एक हजार किलोमीटर दूर रामनगर, कर्नाटक येथे जावे लागत होते. जालना येथे बाजारपेठ सुरू झाल्यानंतर हा त्रास दूर झाला. २०१८ ते २०२६ या कालावधीत ३,२७१.७१ मेट्रिक टन कोषांची खरेदी-विक्री झाली असून, त्याची उलाढाल १५४.३२ कोटी रुपये आहे. या व्यवहारात ३८ हजार २६२ शेतकऱ्यांनी सहभाग घेतला आहे.शेतकऱ्यांना शुल्कमुक्त बाजारपेठ जालना बाजारपेठेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शेतकऱ्यांकडून कोष विक्रीसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. पारदर्शक व्यवहार, योग्य दर, कमी वाहतूक खर्च, वैज्ञानिक प्रतवारी, वाळवण सुविधा आणि डिजिटल व्यवहारामुळे ही बाजारपेठ शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरणार आहे.दरवर्षी सुमारे एक हजार मेट्रिक टन कोष आवक अपेक्षित असून, त्यातून सुमारे १५.७१ लाख मनुष्य-दिवस रोजगारनिर्मितीची क्षमता निर्माण होण्याचा अंदाज आहे. कृषी विज्ञान केंद्र, खरपुडी येथे रेशीम हातमाग प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले आहे. ग्रामीण महिलांना रेशीम वस्त्रनिर्मितीचे कौशल्य देऊन दररोज ५०० ते ७०० रुपयांपर्यंत रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. रेशीम उद्योग विभागातर्फे कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात येणार असून त्या माध्यमातून रेशीम उद्योग वाढीस बळ मिळणार आहे.

दुष्काळी परिस्थितीचा जालना जिल्ह्यातील तुती शेतीवर परिणाम झाला असला तरी भविष्यात जालना शहर हे रेशीम नगरी म्हणून नावारूपाला येईल , यात शंका नाही.

- निर्मला उगले
जिल्हा रेशीम विकास अधिकारी, जालना

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — मंगळवार दि.०३ नोव्हेंबर २०२६ — पान नं.४



लातूरमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

१९ लाखांहून अधिक लाखांचा अवैध मद्यसाठा जप्त

लातूर । प्रतिनिधी

राज्य उत्पादन शुल्क विभागाने ३० ऑक्टोबर २०२६ रोजी लातूर येथील मळवटी रोडवरील सद्गुरू नगर भागात बेकायदा गोवा राज्य निर्मित आणि महाराष्ट्र राज्यात विक्रीकरिता प्रतिबंध असलेला विदेशी मद्याचा साठा जप्त केला आहे. या कारवाईदरम्यान घटनास्थळी गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य ७५० मि.ली. क्षमतेच्या प्लॅस्टिकच्या एकूण १ हजार १५२ सीलबंद बाटल्या, बनावट विदेशी मद्याच्या विविध ब्रँड्सच्या १८० मि.ली. क्षमतेच्या १२५ बाटल्या, ५ हजार ६५० नगांचे विविध ब्रँडचे बनावट बूच, मद्य वाहतुकीसाठी वापरलेले चारचाकी वाहन आणि दोन मोबाईल संच असा एकूण १७ लाख १ हजार २३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ (अ), (ड), (ई), ८१, ८३, ९० व १०३ अन्वये योगेश आत्माराम सांडवे (मद्य साठा मालक, रा. बालाजी मंदिर चौक, सोहेल नगर, जि. लातूर), अशोक प्रभू राजे (जागा मालक, रा. सद्गुरू नगर, मळवटी रोड, ता. जि. लातूर) या दोघांविरुद्ध गुन्हा क्रमांक ३३०/२०२६ नोंदविण्यात आला आहे. या आरोपींना न्यायालयात हजर केले असता पोलीस कोठडीतील तपासात मिळालेल्या माहितीनुसार, १ नोव्हेंबर २०२६ रोजी उमाकांत गोविंदराव



इंगळे याच्या आनंद नगर, लातूर येथील गणेश मंदिराशेजारील राहत्या घरात छापा टाकण्यात आला. तिथे गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य ७५० मि.ली. क्षमतेच्या २७६ सीलबंद बाटल्या (रिकव्हरी) मिळून आल्या, ज्यांची किंमत २ लाख ७६ हजार रुपये आहे. यासह या संपूर्ण कारवाईत एकूण १९ लाख ७७ हजार २३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक युवराज राठोड, उपअधीक्षक मारुती मुपडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कारवाईमध्ये राज्य उत्पादन शुल्क भरारी पथकाचे निरीक्षक पी. जी. दाते, लातूर शहर निरीक्षक आर. एस. कोतवाल, चाकूरचे निरीक्षक श्रीमती मनीषा मिसाळ, डी. एच. आशमोड, दुय्यम निरीक्षक व्ही. एस. पवार, भरारी पथकाचे संजय राठोड, रघुनाथ भोसले, बालाजी वाघमोडे, गणेश साळवी, शिवराज वाघमारे, रामेश्वर माकोडे, स्वप्नील काळे, शाहू घुले, दीक्षा साळवी, श्री. रोटे आणि कार्यालयातील सहाय्यक दुय्यम निरीक्षक एस. एस. केंगारे तसेच जवान कपिल गोसावी, शैलेश गड्डीमे, हणमंत माने, मीरा हासूळे, महिला जवान शीतल पवार, वाहन चालक फाजील खतीब, ए. टी. गुणाले, गजानन होळकर, सहाय्यक दुय्यम निरीक्षक मंगेश खारकर, जोतिराम पवार, श्रीकांत साळुंखे, संतोष केंद्रे, बळी साखरे, भरत गायकवाड, ऋषिकेश चिंचोळीकर, गीता शेनेवाळ, समाधान गिरी, विशाल सुडके, सौरभ पाटवडकर व प्रथमेश फत्तेपूरे यांनी सहभाग नोंदवला.

गुन्ह्याचा पुढील तपास राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, लातूरचे दुय्यम निरीक्षक दीपक एच. आशमोड करीत आहेत. दरम्यान, मद्य खरेदी करताना परवानाधारक दुकानातूनच करावी आणि अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्रीसंदर्भात कोणतीही माहिती वा तक्रार असल्यास राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या १८००२३३९९९, ८४२२००११३३ आणि ०२३८२-२४५४१२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत करण्यात आले आहे.

लातूरला हक्काचे व शासन मान्य उजनीचे पाणी मिळावे

आ. संभाजी पाटील निलंगेकर यांची पाणीटंचाई व दुष्काळ आढावा बैठकीत मागणी

लातूर । प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यात २०१५-१६ पेक्षा गंभीर पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता असून या जलसंकटाला सामोरे जाण्यासाठी सामुहिक प्रयत्नांची गरज आहे. या पाणीटंचाई वर कायमस्वरूपी मात करण्यासाठी लातूरला हक्काचे व शासनमान्य उजनीचे पाणी मिळणे गरजेचे आहे. यासाठी प्रशासनाने व लोकप्रतिनिधिनी यांचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे. या पाणीटंचाई वर मात करण्यासाठी लवकरच ठोस निर्णय न झाल्यास जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्यात जनतेच्या रोषाला सामोरे जाण्याची वेळ येईल असे सांगून लातूरच्या हक्काचे व शासनमान्य पाणी मिळण्यासाठी प्रशासन व शासनाने तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केली आहे. जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली पाणीटंचाई व



दुष्काळ आढावा ऑनलाइन बैठक पार पडली यावेळी आ. संभाजी पाटील निलंगेकर बोलत होते. या बैठकीस जिल्ह्यातील आमदार, उपजिल्हाधिकारी व तहसीलदार उपस्थित होते. लातूर जिल्ह्याला सातत्याने पाणीटंचाई व दुष्काळाला सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आणून देत आ. निलंगेकर म्हणाले कि लातूर जिल्ह्याची दुष्काळ व पाणीटंचाईची समस्या कायमस्वरूपी मिटवण्यासाठी शासनाने लातूर जिल्ह्यास उजनीचे पाणी देण्याचे निर्णय घेतलेला आहे. यामुळे जिल्ह्याला शासनमान्य व हक्काचे पाणी मिळण्यावर शिक्कामोर्तब झालेला असलेला तरी अद्याप यासाठी ठोस काम झाले नसल्याची खंत व्यक्त केली. हक्काचे पाणी मिळण्याकरिता प्रशासनस्तरावर प्रयत्न आवश्यक असून याला लोकप्रतिनिधींच्या पाठपुराव्याची तितकीच गरज असल्याचे आ. निलंगेकर यांनी नमूद केले आहे. जिल्ह्यात निर्माण होणारी संभाव्य पाणीटंचाई २०१५-१६ पेक्षाही भीषण असणार असून सध्या जिल्ह्यातील जवळपास सर्वच पाणी प्रकल्प कोरडे पडू लागलेले आहेत. त्यामुळे नागरिकांना पाणी बचत करण्यासाठी आवश्यक त्या सूचना देवून पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविण्यासह प्रशासनाने पाणीचोरी रोखण्याकरिता कडक पाऊले उचलणे गरजेचे असल्याचे स्पष्ट केले.

जिल्ह्यात निर्माण होणारी पाणी टंचाई लक्षात घेता प्रशासनाने लातूरच्या हक्काचे व शासनमान्य उजनीचे पाणी आणण्याकरिता तात्काळ आवश्यक प्रस्ताव तयार करून त्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करावा अशी मागणी करून आ. निलंगेकर म्हणाले की याबाबत शासन व प्रशासनाने ठोस निर्णय घेण्याची हीच वेळ असल्याचे सांगितले. जिल्ह्यातील पाणीटंचाईवर ठोस निर्णय न झाल्यास जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात सर्वसामान्य जनता रस्त्यावर उतरून आपला आक्रोश व रोष दाखवण्यासाठी आंदोलन करतील अशी भीती व्यक्त करून लातूरच्या हक्काचे पाणी आणण्यासाठी शासन व प्रशासनाने लवकरात लवकर ठोस निर्णय घ्यावा अशी मागणी या बैठकीत आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केली.

पत्रकार संतोष सोनवणे राजर्षी शाहू महाराज पुरस्काराने सन्मानित!

राजर्षी शाहू महाराज सामाजिक दायित्व मंचाच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त विशेष गौरव; सात सामाजिक संस्थांसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सन्मान

लातूर । प्रतिनिधी

लातूर तालुक्यातील माटेफळ येथील राजर्षी शाहू महाराज सामाजिक दायित्व मंचाच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विशेष सन्मान सोहळ्यात पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते संतोष सोनवणे यांना त्यांच्या पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल 'राजर्षी शाहू महाराज पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

रविवारी लातूर येथील भालचंद्र ब्लड बँक सभागृहात हा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी तालुक्यातील सात सामाजिक संस्थांचा गौरव करण्यात आला, तर शिक्षण, आरोग्य, पत्रकारिता, सामाजिक कार्य आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन मेडिकल असोसिएशनचे डॉ. हर्षवर्धन राऊत यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी ड. अण्णाराव पाटील होते. उद्योजक राहुल कदम, पंचशील डावकर मॅडम, सूरज शिंदे, सामाजिक कार्यकर्ते सुशील चिकटे आणि ड. इरफान शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

पत्रकार संतोष सोनवणे हे २०१३ पासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून, २०१७ पासून दैनिक जगमित्रचे लातूर जिल्हा प्रतिनिधी म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न, सामाजिक समस्या, शैक्षणिक उपक्रम, आरोग्यविषयक प्रश्न आणि प्रशासनाशी संबंधित विषयांना सातत्याने वाचा फोडण्याचे काम ते करीत आहेत. पत्रकारितेसोबतच सामाजिक बांधिलकी जपत रुग्णहक्क संघर्ष समितीच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मदत, आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना उपचारासाठी सहकार्य, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप तसेच महिला सक्षमीकरण, कामगार नोंदणी आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. समाजातील वंचित, गरजू आणि दुर्लक्षित घटकांचे प्रश्न मांडणाऱ्या पत्रकारितेचा तसेच सामाजिक कार्याचा गौरव झाल्याने संतोष सोनवणे यांच्यावर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

यावेळी मंचाचे संस्थापक अध्यक्ष बापू खोसे, संतोष खोसे, काशिनाथ खोसे, राष्ट्रपती पुरस्कार विजेते आदर्श शिक्षक उमेश खोसे, अर्जुन कांबळे, धनंजय कांबळे, अमोल गिरी, बिभिषण घोडके यांच्यासह मंचाचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काकासाहेब खोसे यांनी केले, तर प्रा. सचिन खोसे यांनी आभार मानले. समाजासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन मिळालेला हा सन्मान भविष्यात अधिक जोमाने पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात काम करण्याची प्रेरणा देणारा ठरला आहे.

विद्यापीठ स्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवात शिवलिंगेश्वर फार्मसीच्या पाच संशोधन प्रकल्पांची राज्यस्तरीय फेरीसाठी निवड

आलमला । प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या वतीने आयोजित विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सव २०२६-२७ मध्ये शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, आलमला येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. महाविद्यालयाच्या तब्बल पाच संशोधन प्रकल्पांनी विविध विभागांत पुरस्कार प्राप्त करून राज्यस्तरीय फेरीसाठी निवड मिळवली आहे.

पुरस्कारप्राप्त विद्यार्थी व मार्गदर्शक : मानव्यविद्या, भाषा आणि ललित कला पदवी - अनुष्का भोसले - द्वितीय क्रमांक -मार्गदर्शक : डॉ. धाराशिवे व्ही. एम., कृषी आणि पशुसंवर्धन पदव्युत्तर- सोहम उलागड्डे - द्वितीय क्रमांक -



मार्गदर्शक : डॉ. कुलकर्णी एस. एस., अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान पदवी -श्रद्धा कापसे - प्रथम क्रमांक मार्गदर्शक : डॉ. धाराशिवे व्ही. एम., अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान - पदव्युत्तर -गौतम दुर्गम - द्वितीय क्रमांक मार्गदर्शक : डॉ. गिरी ए. बी., अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान - पदव्युत्तर-ओंकार कोटगिरे - तृतीय क्रमांक मार्गदर्शक : डॉ. वाडेवाले व्ही. बी. संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवेश्वर धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला योग्य दिशा देऊन त्यांना विद्यापीठ स्तरावर यश मिळवून देणाऱ्या मार्गदर्शक प्राध्यापक व समन्वयिका येलम व्ही एम (कापसे) यांचेही कौतुक करण्यात आले.

एकाच वेळी पाच प्रकल्पांची राज्यस्तरीय फेरीसाठी झालेली ही निवड शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीच्या उच्च दर्जाचे संशोधन, नवोपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा अधोरेखित करणारी ठरली आहे. राज्यस्तरीय फेरीतही हे विद्यार्थी अशीच उल्लेखनीय कामगिरी करतील, असा विश्वास महाविद्यालयाच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

शालेय राज्यस्तरीय रोल बॉल स्पर्धेसाठी समिट इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांची निवड

लातूर । संतोष सोनवणे

लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १४ वर्षांखालील शालेय विभागीय रोल बॉल स्पर्धेत समिट इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तरीय रोल बॉल स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे.

या स्पर्धेत समिट इंटरनॅशनल स्कूलच्या संघाने शानदार खेळाचे प्रदर्शन केले. संघाचा कर्णधार आदित्य मोरे याने तब्बल ९ गोल नोंदवत संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. त्याच्या उत्कृष्ट खेळामुळे संघाला विजय मिळवून राज्यस्तरीय स्पर्धेत प्रवेश मिळवता आला. या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आदित्य मोरे, कारुण्य आंबुलगे, सूर्यांश काणेकर, सय्यद सौद, आदित्य चित्ते, रौनक तापडे, अमानत पटेल, स्वराज मोरे आणि हर्षवर्धन डोंगरे यांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन दिलीप माने, अध्यक्ष दिनेश माने, संचालिका सौ. सोनल दिनेश माने, प्राचार्य बिनू जेकब, उपप्राचार्य विक्रम माने व सौ. रेखा नवनंदर, समन्वयक अलिशा रॉय, डमिन मॅनेजर विक्रम मिगलानी तसेच क्रीडा शिक्षक अबू चाऊस, रंजीत राठोड, पूजा तोडकरी आणि रोल बॉल प्रशिक्षक सय्यद लायक यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. समिट इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

एमआयएमच्या दक्षतेमुळे औसा नगर परिषदेची मोकाट कुत्र्याची धरपकड सुरू

औसा । बी.डी. उबाळे

शहरातील मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी एमआयएम कडून नगर परिषद औसा प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केलेल्या मागणीची अखेर दखल घेतली आहे. शनिवार, दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी औसा नगर परिषद प्रशासनाकडून शहरातील मोकाट कुत्रे पकडण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. शहरात मोकाट कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून, कुत्र्याच्या हल्ल्यात तीन वर्षीय चिमुकलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याच्या दुर्दैवी घटनेने संपूर्ण शहरात हळहळ व्यक्त होत होती. या घटनेनंतर एमआयएमचे औसा प्रमुख सय्यद



मुजफ्फरअली इनामदार यांनी आक्रमक भूमिका घेत नगर परिषद प्रशासनाला निवेदन दिले होते.

शहरातील विविध भागांत मोकाट कुत्र्यांकडून नागरिकांवर हल्ले होत असून, लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी त्यांनी निवेदनातून केली होती. तसेच प्रशासनाने त्वरित कार्यवाही न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला होता. या मागणीची उशिरा का होईना पण दखल घेत नगर परिषद प्रशासनाने प्रत्यक्ष कारवाईला सुरुवात केली असून, शहरातील मोकाट कुत्रे पकडून नेण्यात येत आहेत. त्यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. मात्र, ही मोहीम केवळ एक दिवसापुरती मर्यादित न राहता शहरातील सर्वच भागांमध्ये सातत्याने राबवावी, तसेच पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कुत्र्यांबाबत योग्य ती काळजी घेऊन नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

नेताजी सावंतांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत श्रीराम विद्यालयाचे यश

औसा । बी.डी. उबाळे

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, जिल्हा क्रीडा परिषद लातूर व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय लातूर आणि लातूर जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेचे आयोजन राजनंदा विद्यालय वासनगांव ता.जि.लातूर येथे करण्यात आले होते. या जिल्हास्तरीय स्पर्धेकरीता औसा तालुक्यातील श्रीराम माध्यमिक विद्यालय एंडी-सारोळा या शाळेतील १७ विद्यार्थ्यांची विविध प्रकारच्या योगासन स्पर्धेसाठी निवड झालेली होती. त्यापैकी आर्टिस्टिक पेअर १९ वर्षे वयोगटातील मुलीं कु.सातपुते तेजस्वीनी राम व कु.भोसले तृष्णाली रमाकांत यांनी योगासनांचे चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करून लातूर जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच रिदमिक पेअर १९ वर्षे वयोगटाखालील मुली कु.पांचाळ संध्या विरभद्र आणि कु.सिरसाट स्नेहा संतोष यांनीही उत्कृष्ट योगासनांचे प्रात्यक्षिके सादर करून जिल्ह्यातून तृतीय क्रमांक पटकाविल्यामुळे शाळेच्या यशात आणखी भर पडली आहे. या सर्व विद्यार्थ्यांस नेताजी सावंत योगगुरू (सशिक्षक) यांनी मार्गदर्शन केले असल्याचे समजते. त्यांच्या या यशाबद्धल संस्थेचे अध्यक्ष, सचिव, संस्थेचे पदाधिकारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अविनाश जाधव यांनी चारही यशस्वी खेळाडूंचे व योग मार्गदर्शक सावंतचें पुष्पहाराने येथोचित सत्कार करून अभिनंदन केले. तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या उज्वल यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन व कौतुकांचा वर्षाव होत आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ग्रामपातळीवर चारा व पाणी नियोजन करा!

रब्बी चारा पिकांची लवकर पेरणी, मुरघास निर्मिती आणि पर्यायी चारा स्रोतांचा वापर करण्याचे प्रा. डॉ. अनिल भिकाने यांचे आवाहन

उदगीर । प्रतिनिधी

राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनाचे संरक्षण आणि दुग्ध व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येक गावाने उपलब्ध पाण्याच्या साठ्यानुसार ग्रामपातळीवर रब्बी हंगामातील चारा पिकांचे नियोजन करावे. उपलब्ध पाण्याचा विचार करून चारा पिकांची लवकर पेरणी करावी आणि उत्पादित होणाऱ्या हिरव्या चाऱ्याचा साध्या पद्धतीने मुरघास तयार करून साठा करावा, असे आवाहन महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरचे माजी विस्तार शिक्षण संचालक प्रा.डॉ. अनिल भिकाने यांनी केले आहे.

दुष्काळी परिस्थितीत चाऱ्याची उपलब्धता कमी असल्यास ओला ऊस जनावरांना कुट्टी करून देता येतो. मात्र, उसाचा मुरघास तयार करून वापरणे अधिक फायदेशीर ठरते. त्यासाठी पाणीदार उस असेल तर उस ४ ते ५ तास उन्हात सुकवून अन्यथा पाणी कमी मिळालेला ऊस असेल तर त्याची सुमारे १ सेंमी किंवा ०.४ इंच आकाराची कुट्टी करावी. मुरघास तयार करताना योग्य जिवाणू व एन्झाइमयुक्त कल्चरचा साधरणतः १०० ग्रॅम प्रति टन किंवा उत्पादकाच्या शिफारशीनुसार वापर करावा. कुट्टीचा प्रत्येक ४ ते ६ इंचाचा थर व्यवस्थित दाबून त्यातील हवा काढावी व संपूर्ण मुरघास हवाबंद करावा. अशा पद्धतीने सुमारे ५०-६० दिवसांत उत्तम प्रतीचा मुरघास तयार होऊ शकतो.

उसाचे पाचट आणि वाडे यांची कुट्टी करून जनावरांना खाद्य म्हणून वापरता येते. साखर कारखान्यांमधून उपलब्ध होणारा उसाचा बगॅाससुद्धा पर्यायी चारा स्रोत म्हणून जरूर वापरावा. तुराटी व पराटी यांची कुट्टी करून वापरता येते. मात्र, बगॅास तुराटी, पराटी किंवा तत्सम चाऱ्याची पाचकता वाढविण्यासाठी एन्झाइम प्रक्रिया करणे आवश्यक आहे. बाजारात उपलब्ध असलेल्या खाद्य एन्झाइमचा वापर



वापरल्यानंतर साधारण ४ ते ६ तासांत असा चारा जनावरांना देता येऊ शकतो. तसेच निकृष्ट प्रतीच्या वाळलेल्या चाऱ्याची पौष्टिकता आणि पाचकता वाढविण्यासाठी युरिया-मळी प्रक्रिया करता येते. प्रक्रिया केलेला चारा योग्य पद्धतीने हवाबंद ठेवून साधारण तीन आठवड्यांनंतर वापरता येतो. मात्र, युरियाची मात्रा, ओलावा व प्रक्रिया पद्धत शास्त्रीय मार्गदर्शनानुसारच ठेवावी. प्रक्रिया केलेला चारा जनावरांना देताना योग्य काळजी घेणे आवश्यक आहे.

मुरघासामुळे उन्हाळ्यात पाण्याचीही बचत!

उन्हाळ्यात पाण्याची गरज कमी करण्यासाठी हिरव्या चाऱ्याचा मुरघास करून साठविणे अत्यंत उपयुक्त आहे. मुरघासामध्ये ओलावा असल्यामुळे जनावरांना चाऱ्याबरोबर काही प्रमाणात पाणीही मिळते. त्यामुळे उन्हाळ्यातील पाणी व्यवस्थापनास मदत होते. म्हणूनच उपलब्ध हिरवा चारा वाया न घालवता त्याचा मुरघास तयार करून ठेवण्याची गरज आहे.

मुक्त संचार गोठा पद्धतीचा अवलंब करा!

दुष्काळी परिस्थितीत पाण्याची बचत करण्यासाठी पारंपरिक गोठा पद्धतीऐवजी मुक्त संचार गोठा पद्धतीचा अवलंब करावा. पारंपरिक पद्धतीमध्ये जनावरे व गोठा धुण्यासाठी प्रति जनावर प्रतिदिन साधारण ५० लिटर पाणी खर्च होऊ शकते. मुक्त संचार गोठा पद्धतीचा अवलंब केल्यास जनावरे धुणे आणि गोठ्याची वारंवार धुलाई करणे टाळता येत असल्याने मोठ्या प्रमाणात पाण्याची बचत होऊ शकते. मुक्त संचार गोठ्यात दाट सावलीचे झाड घेतले तर जनावरांना नैसर्गिक सावली उपलब्ध होते. त्यामुळे उष्णतेचा ताण कमी होण्यास मदत होते. जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची मात्र पुरेशी उपलब्धता ठेवणे आवश्यक आहे.

दुष्काळावर मात करण्यासाठी केवळ चारा उपलब्ध करून देणे पुरेसे नाही, तर उपलब्ध चाऱ्याचे योग्य नियोजन, पर्यायी चारा स्रोतांचा वापर, मुरघास निर्मिती, चाऱ्यावरील प्रक्रिया आणि पाण्याची काटकसर या सर्व उपाययोजना एकत्रितपणे राबविणे आवश्यक आहे. प्रत्येक गावाने ग्रामपंचायत, महसुल विभाग, कृषी विभाग आणि पशुसंवर्धन विभाग यांच्या समन्वयातून ग्रामपातळीवर चारा व पाणी नियोजन आराखडा तयार करावा, असे आवाहन प्रा. डॉ. अनिल भिकाने यांनी केले आहे.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संगिता काळे (धाराशिव जिल्हा प्रतिनिधी)
मो.9588601740 PRGI.NO.MHMAR/26/A0224

धाराशिव जिल्हा आवृत्ती | मंगळवार दि.०३ नोव्हेंबर २०२६ | पान नं. ५

आता संभाजी नगर, पुणे, मुंबई येथे जाण्याची गरज नाही

मुळव्याध : संडासच्या जागी आग होणे, दुखणे, कोंब येणे, रक्त जाणे, जागा लहान होणे, फिशर

सांधेदुखी : पाठीच्या मणक्याचे त्रास, चमक मारणे, गॅप पडणे, गुडघे दुखी, टाचदुखी, मानपाठ, कंबरदुखी, हातपायाला मुंग्या येणे, नस दबणे, डोकेदुखी, अंग दुखणे,

स्त्रीयांचे सर्व आजार : मुल बाळ होत नसल्यास वजन जास्त असणे, केस गळणे, चक्करयेणे, घबराहट, बैचेनी, झोप न येणे, पचनाचे व पित्ताचे त्रास, पोटदुखी, हाडीताप, मुतखडा, त्वचारोग, ॲलर्जि सर्दी, खोकला, दमा.

रविवारी दवाखाना बंद राहील

डॉ.रविंद्र ईटके
आयुर्वेद व पंचवर्ग तज्ञ (पुणे)

डॉ.सौ.भाग्यश्री ईटके
स्त्रीरोग व आयुर्वेद तज्ञ

वेळ : स. ११ ते २.३० संध्या : ६ ते ८
सोनोग्राफी सेंटर समोर पदमावती गल्ली, परळी. वै
मो.9822816010, 7588596838

विश्वश्री : आयुर्वेद हॉस्पिटल व पंचकर्म केंद्र

दुष्काळाच्या संकटात शेतकरी, शेतमजुरांना वाऱ्यावर सोडणार नाही; शासन खंबीरपणे पाठीशी-पालकमंत्री प्रताप सरनाईक

तामलवाडीत दुष्काळग्रस्त भगिनींना 'आनंदाचा शिधा' दिवाळी भेट

धाराशिव/जिमाका

दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यांत चिंता असली,तरी त्यांच्या घरातील दिवाळीचा आनंद कमी होऊ देणार नाही.संकट कितीही मोठे असले,तरी सरकार शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. आगामी काळात दुष्काळाची परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.मागील वर्षी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले, तर यंदा पावसाअभावी दुष्काळाचे संकट ओढवले आहे.या संकटामुळे शेतकरी हवालदिल झाला असला, तरी सर्वांच्या सहकार्याने आपण निश्चितपणे दुष्काळावर मात करू. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आजपासून त्यांच्या बँक खात्यांत पाच हजार रुपये जमा करण्यास सुरुवात झाली आहे.शासनाकडून शक्य तेवढी सर्व मदत करण्यात येईल.गरज पडेल तेव्हा मी सदैव तुमच्या पाठीशी उभा राहीन,असा विश्वास पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

आज २ नोव्हेंबर रोजी तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे दुष्काळग्रस्त कुटुंबांतील महिलांना 'आनंदाचा शिधा' दिवाळी भेट वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाला माजी आमदार ज्ञानराज चौगुले,जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, पोलीस अधीक्षक रितू खोखर आणि जय राजेनिंबाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी तामलवाडी ग्रामस्थांच्या वतीने पालकमंत्री श्री.सरनाईक यांचा सत्कार करण्यात आला.

पालकमंत्री श्री.सरनाईक म्हणाले, दुष्काळाच्या परिस्थितीत प्रत्येक कुटुंबाच्या अडचणींची शासनाला जाणीव आहे. दिवाळी हा आनंदाचा आणि आपुलकीचा सण आहे. या सणाच्या निमित्ताने दुष्काळग्रस्त कुटुंबांतील भगिनींच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे, त्यांच्या घरातही दिवाळीचा आनंद साजरा व्हावा, या भावनेतून विविध प्रकारच्या जीवनावश्यक साहित्याचा समावेश असलेली दिवाळी भेट देण्यात येत आहे. ही केवळ मदत नसून, एका



भावाने आपल्या बहिणीला प्रेमाने दिलेली दिवाळीची भेट आहे. भगिनींनी ती आपुलकीच्या भावनेतून स्वीकारावी.तुमच्या सुखदुःखात आणि प्रत्येक संकटात मी तुमचा भाऊ म्हणून सदैव सोबत राहीन.शासन आपल्याला सर्वतोपरी मदत करण्यासाठी तत्पर आहे.दुष्काळाचे संकट मोठे असले,तरी कोणत्याही कुटुंबाने खचून जाऊ नये.सर्वांच्या सहकार्याने या संकटावर मात करून प्रत्येकाच्या आयुष्यात पुन्हा आनंदाचे दिवस आणण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दुष्काळग्रस्त कुटुंबांतील महिलांना प्रातिनिधिक स्वरूपात 'आनंदाचा शिधा' दिवाळी भेटीचे वितरण करण्यात आले. दिव्यांग विकास क्षीरसागर व बाळासाहेब जाधव यांच्यासह लक्ष्मी मगर, धनुबाई काळे, छाया शिंदे, मीरा काळे, संगीता डोलारे आणि अर्चना गवळी यांना मान्यवरांच्या हस्ते दिवाळीच्या शिध्याचे वाटप करण्यात आले.

दुष्काळामुळे निर्माण झालेल्या आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर दिवाळीच्या सणासाठी मिळालेली ही भेट लाभार्थी कुटुंबांसाठी दिलासादायक ठरली. कार्यक्रमाला तामलवाडी येथील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

दुष्काळाच्या चिंतेत असलेल्या भगिनींना दिवाळी भेट देताना पालकमंत्र्यांनी व्यक्त केलेली आपुलकी आणि शासनाकडून शेतकऱ्यांच्या खात्यात आजपासून ५ हजार रुपये मदत जमा होत असल्यामुळे कार्यक्रमाला भावनिक स्पर्श लाभला.

नंदगाव शिवारात अज्ञात व्यक्तींने लावलेल्या आगीत सोयाबीन ढिग जळून खाक...

ऐन दुष्काळात होरपळत असलेल्या शेतकऱ्याचे विस एकर क्षेत्रातून काढून ठेवलेल्या सोयाबीन ढिगास आग लागल्याने सोयाबीन काढ जळून खाक.. अज्ञात व्यक्तींकडून आग लावल्याचा संशय; शेतकऱ्याचे दहा लाखांचे नुकसान



लोहगाव/निजाम शेख

तुळजापूर तालुक्यातील नंदगाव शिवारात शेतात काढून ठेवलेल्या सोयाबीनच्या ढिगाला अज्ञात व्यक्तींनी आग लावल्याची घटना बुधवार दि.२८ रोजी सायंकाळी ७.३० च्या सुमार घडली. या आगीत शेतकरी दत्तात्रय येणगुरे यांच्या सुमारे २० एकर क्षेत्रातील सोयाबीनचे काढ जळून खाक झाले असून, त्यांचे अंदाजे दहा लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

एकीकडे दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी होरपळत असताना, मोठ्या कष्टाने पिकवलेले सोयाबीन काढून ठेवले होते. मात्र, ऐन हंगामात सोयाबीनच्या ढिगाला आग लागल्याने शेतकऱ्याच्या तोंडचा घास हिरावला गेला आहे. या घटनेमुळे शेतकरी दत्तात्रय येणगुरे यांच्यावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे.

या घटनेची अज्ञात व्यक्ती विरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे. या आगीमागील कारणाचा शोध घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करावी, आणि शासनाकडून शेतकऱ्याला आर्थिक मदत मिळावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांना प्राधान्य द्या; प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा

परभणी/जिमाका

जिल्ह्यातील दुष्काळ परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना दिलासा देण्यासाठी विभाग प्रमुखांनी दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांना प्राधान्य द्यावे. शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून गरजू नागरिकांपर्यंत योजनांचे लाभ पोहोचवावेत. तसेच विविध विभागांकडील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून विकासकामांना गती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी दिले.

जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेऊन विभागनिहाय कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील महत्त्वाचे प्रश्न, विविध विभागांसमोरील अडचणी, प्रलंबित कामांची सद्यस्थिती तसेच शासनाने निर्धारित केलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेबाबत माहिती जाणून घेतली.

जिल्ह्यात सध्या दुष्काळ परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांना, विशेषतः शेतकरी आणि ग्रामीण भागातील जनतेला दिलासा देणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित विभागांनी दुष्काळ निवारणासाठी आवश्यक उपाययोजनांचे प्रभावी नियोजन करून त्यांची काटेकोर अंमलबजावणी करावी. नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनातील सर्व यंत्रणांनी संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करण्यावर भर

विविध विभागांकडे प्रलंबित असलेली कामे विनाकारण प्रलंबित राहणार नाहीत, याची संबंधित विभागप्रमुखांनी दक्षता घ्यावी. प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन ती तातडीने मार्गी लावावीत. शासनाने दिलेली उद्दिष्टे आणि निर्धारित केलेली कामे विहित कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक असून, त्यासाठी विभागाने स्वतंत्र नियोजन करावे, असेही जिल्हाधिकारी चव्हाण यांनी स्पष्ट केले.

शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांच्या प्रश्नांचे वेळेत निराकरण करणे आणि प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान करणे यावर भर देण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. योजनांची अंमलबजावणी करताना केवळ उद्दिष्टपूर्ती न करता त्याचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांना मिळतो की नाही, याकडेही संबंधित विभागांनी लक्ष द्यावे, असे त्यांनी सांगितले.

विभागांमध्ये समन्वय ठेवून कामे पूर्ण करा

जिल्ह्याच्या विकासाशी संबंधित विविध कामे प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी परस्परांशी समन्वय ठेवणे आवश्यक आहे. एका विभागाच्या कामाचा दुसऱ्या विभागाशी संबंध असल्यास संबंधित विभागांनी एकत्रितपणे प्रश्न सोडवावेत. समन्वयाच्या अभावामुळे कोणतेही काम रखडणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच कामांची अचूकता, गुणवत्ता आणि वेळेचे नियोजन यांना प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

पालकमंत्री प्रताप सरनाईक ३ नोव्हेंबरला जिल्ह्याच्या दौऱ्यावर

धाराशिव, पळसप, येरमाळा व पारगाव येथे दिवाळी शिधा वाटप कार्यक्रम

धाराशिव/जिमाका

परिवहनमंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक हे उद्या,मंगळवार,दि.३ नोव्हेंबर २०२६ रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून या दौऱ्यात ते धाराशिव,पळसप,येरमाळा आणि पारगाव येथे आयोजित दिवाळी शिधा वाटप कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत.

पालकमंत्री श्री.सरनाईक हे मंगळवारी सकाळी ९.३० वाजता शासकीय विश्रामगृह,तुळजापूर येथून मोटारीने धाराशिवकडे प्रयाण करतील.सकाळी १० वाजता धाराशिव येथे त्यांचे आगमन होईल.त्यानंतर ते दिवाळी शिधा वाटप कार्यक्रमास उपस्थित राहतील. सकाळी १०.३० वाजता धाराशिव येथून मोटारीने पळसप (ता.धाराशिव) येथे प्रयाण करतील.सकाळी ११.१५ वाजता पळसप येथे त्यांचे आगमन,याठिकाणी आयोजित दिवाळी शिधा वाटप कार्यक्रमास ते उपस्थित राहतील.सकाळी ११.४५ वाजता पळसप येथून मोटारीने येरमाळा (ता.कळंब) येथे प्रयाण करतील. दुपारी १२.३० वाजता येरमाळा येथे त्यांचे आगमन व याठिकाणी आयोजित दिवाळी शिधा वाटप कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी १ वाजता येरमाळा येथून मोटारीने पारगाव (ता.वाशी,जि.धाराशिव) येथे प्रयाण करतील.दुपारी १.३० वाजता पारगाव येथे त्यांचे आगमन होईल. याठिकाणीही ते दिवाळी शिधा वाटप कार्यक्रमास उपस्थित राहतील.दुपारी २ वाजता पारगाव येथून मोटारीने छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

ओबीसी महामंडळाच्या थकीत कर्जावरील व्याजात ५० टक्के सवलत

एकरकमी परतफेड योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन; ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत

धाराशिव/जिमाका

इतर मागासवर्गीय प्रवर्गातील कर्जदार लाभार्थ्यांना थकीत कर्जाच्या बोजातून दिलासा देण्यासाठी ओबीसी महामंडळामार्फत एकरकमी परतफेड (जढड) योजना राबविण्यात येत आहे.या योजनेअंतर्गत संपूर्ण थकीत कर्जाच्या मुद्दल रकमेचा एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यांना थकीत व्याजाच्या रकमेत ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. ही योजना ३१ मार्च २०२७ पर्यंत लागू राहणार असल्याची माहिती महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापक श्रीमती व्ही. डी. लहारे यांनी दिली.

महामंडळाकडून विविध योजनांअंतर्गत कर्ज घेतलेल्या आणि कर्जाची परतफेड थकीत असलेल्या लाभार्थ्यांना या योजनेमुळे कर्जमुक्त होण्याची संधी उपलब्ध झाली आहे.पात्र थकबाकीदार लाभार्थ्यांनी या सवलतीचा लाभ घेऊन आपली थकीत कर्ज प्रकरणे निकाली काढावीत.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी थकबाकीदार लाभार्थ्यांनी महामंडळाच्या धाराशिव जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधावा. योजनेच्या अटी,शर्ती आणि अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२२३८६३ यावर संपर्क साधता येईल.

महामंडळाच्या सर्व थकबाकीदार लाभार्थ्यांनी ३१ मार्च २०२७ या अंतिम मुदतीची वाट न पाहता एकरकमी परतफेड योजनेचा लाभ घेऊन कर्जमुक्त व्हावे,असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक श्रीमती व्ही.डी.लहारे यांनी केले आहे.

महाडीबीटी २.० वर शिष्यवृत्ती अर्ज नोंदणीला अल्प प्रतिसाद; जिल्ह्यात केवळ ४०० विद्यार्थ्यांची नोंदणी

एकही पात्र मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये-सहाय्यक आयुक्त

धाराशिव/जिमाका

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक आधार देणाऱ्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनांच्या अर्ज नोंदणीला जिल्ह्यात अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याचे समोर आले आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी अद्ययावत महाडीबीटी २.० प्रणालीवर जिल्ह्यातील केवळ ४०० अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत हे प्रमाण अत्यल्प असल्याने समाज कल्याण विभागाच्या आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती अर्ज नोंदणीला गती देऊन एकही पात्र मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहणार नाही,याची दक्षता घ्यावी,असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी केले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येतात.या योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना सुलभपणे मिळावा, यासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून अद्ययावत करण्यात आलेल्या महाडीबीटी २.० (MahaDBT २.०) प्रणालीवर ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना https://mahadbt2.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरून शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येणार आहे. मात्र,धाराशिव जिल्ह्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची नोंदणी अपेक्षेपेक्षा अत्यंत कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील केवळ ४०० विद्यार्थ्यांनी महाडीबीटी २.० प्रणालीवर नोंदणी केली आहे.मागील शैक्षणिक वर्षाच्या तुलनेत हे प्रमाण अत्यल्प असल्याने संबंधित यंत्रणांनी अर्ज नोंदणी वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्ज नोंदणीचा आढावा घ्यावा.ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज भरलेले नाहीत,अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालय स्तरावरून तातडीने सूचित करून अर्ज भरण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करावे. तसेच,महाविद्यालयांकडे ऑनलाइन प्राप्त होणाऱ्या शिष्यवृत्ती अर्जांची संबंधित शासन निर्णयातील निकषांनुसार परिपूर्ण छाननी करण्यात यावी.अर्जातील आवश्यक माहिती, कागदपत्रे आणि पात्रतेची पडताळणी करून पात्र अर्ज तात्काळ समाज कल्याण कार्यालयाकडे अग्रेषित करावेत.अर्ज छाननी आणि अग्रेषित करण्याच्या प्रक्रियेत अनावश्यक विलंब होणार नाही,याचीही संबंधित महाविद्यालयांनी दक्षता घ्यावी. शिष्यवृत्ती ही आर्थिकदृष्ट्या गरजू आणि पात्र विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाला आधार देणारी महत्त्वाची योजना आहे. त्यामुळे केवळ अर्ज न भरल्यामुळे किंवा महाविद्यालय स्तरावर अर्ज प्रलंबित राहिल्यामुळे कोणत्याही पात्र विद्यार्थ्याला शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहावे लागू नये,यासाठी महाविद्यालयांनी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी अनुसूचित जाती प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनी महाडीबीटी २.० प्रणालीवर आपले शिष्यवृत्ती अर्ज लवकरात लवकर भरावेत. महाविद्यालयांनीही विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी प्रोत्साहित करून प्राप्त अर्जांची नियमानुसार छाननी करावी आणि पात्र अर्ज तातडीने समाज कल्याण कार्यालयाकडे पाठवावेत.जिल्ह्यातील एकही पात्र मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही, यासाठी सर्व महाविद्यालयांनी जबाबदारीने कार्यवाही करावी,असे आवाहन सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी केले आहे.

03 Nov 2026_Layout 1 11/3/2026 12:10 AM Page 2

हिशोब द्या, नाहीतर खुर्च्या रिकाम्या करा; वक्फ मंडळाविरुद्ध पंचक्रोशीत उपोषणाचा एल्गार!

उपोषणाचा मंडप पडताच सीईओसह बड्या अधिकाऱ्यांचा पळ; वक्फ वर्तुळात प्रचंड खळबळ!

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळातील संशयास्पद कारभार, उघड माजलेली आर्थिक उधळपट्टी आणि प्रशासकीय अनागोंदीविरोधात अखेर जनआक्रोशाचा तीव्र भडका उडाला आहे. वारंवार निवेदने, तक्रारी आणि कायदेशीर पाठपुरावा करूनही ढिम्म प्रशासन सुस्त राहिल्याने संतप्त झालेले मोहम्मद खमरुल इमान खान जफर खान नाज आणि शेख मकसूद गोंदवाले (भोकर) यांनी दिनांक, २ नोव्हेंबर २०२६ रोजी पासून पंचक्की येथील वक्फ मंडळाच्या मुख्य मुख्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणाचे थेट हत्यार उपसले आहे. ''केवळ पोकळ आश्वासने आता चालणार नाहीत; ठोस लेखी कारवाई आणि सर्व हिशोब जनतेसमोर मांडल्याशिवाय एक पाऊलही मागे हटणार नाही,'' असा कडक इशारा उपोषणकर्त्यांनी दिल्याने वक्फ वर्तुळात एकच प्रचंड खळबळ उडाली आहे.विशेष म्हणजे, २ नोव्हेंबर रोजी उपोषणकर्ते मंडपावर बसताच छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ कार्यालयातील मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अधीक्षक अधिकारी यांनी कार्यालयातून पळ काढल्याची चर्चा दिवसभर परिसरात रंगली होती. सार्वजनिक व धार्मिक मालमत्तांचे रक्षण करण्याची घटनात्मक जबाबदारी (पान २ वर)



स्वाभिमानीच्या लढ्याला यश ५ नोव्हेंबरपासून जायकवाडीतून गेवराई माजलगाव साठी पाणी सुटणार!

शेख आतिख/तलवाडा

जायकवाडी धरणातून (नाथसागर) पैठण उजव्या कालव्याद्वारे आगामी ५ नोव्हेंबरपासून पाणी सोडण्याचा दिलासादायक निर्णय प्रशासनाने घेतला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने गेवराई आणि माजलगाव तालुक्यातील रब्बी पिकांना व मुक्या जनावरांना पाणी मिळावे, यासाठी प्रशासनाला दिलेल्या इशाऱ्यानंतर अखेर या आंदोलनाला मोठे यश आले आहे.

धरणात सध्या सुमारे ७४ टक्के जलसाठा उपलब्ध असतानाही पाणी सोडण्यास विलंब होत असल्याने शेतकरी चिंतेत होते. या पार्श्वभूमीवर, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष दिनकर रिंगणे यांच्या



मार्गदर्शनाखाली संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी व जलसंपदा विभागाकडे आक्रमक मागणी केली होती. तसेच २६ ऑक्टोबर रोजी जिल्हा प्रशासनाला तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला होता. या पाठपुराव्याची दखल घेत अखेर प्रशासनाने ५ नोव्हेंबरपासून पाणी सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

या यशस्वी लढ्यासाठी बीड जिल्हा युवा उपाध्यक्ष शेख खिजर जैनुद्दीन, माजलगाव तालुकाध्यक्ष बाळासाहेब शेंडगे, महिला तालुकाध्यक्ष सुनिता गील, जयदेव शिंगने, बाळू डहाळे व इतर सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. ''हा विजय स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या आक्रमक भूमिकेचा आणि शेतकरी एकजुटीचा आहे,'' अशी प्रतिक्रिया संघटनेचे उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन यांनी दिली आहे. प्रशासनाच्या या निर्णयामुळे दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांना व रब्बी पिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

आ.हिकमत दादा उडान यांच्या प्रयत्नाला यश

जायकवाडी धरणातून शेतीसाठी चार आवर्तने मंजूर

घनसावंगी/प्रतिनिधी

घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी ५ नोव्हेंबरपासून कालव्याला पाणी सोडणार छत्रपती संभाजीनगर येथे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कालवा सल्लागार समितीची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. आमदार हिकमत दादा उढाण यांच्या या मागणीला यश आले असून, जायकवाडी (पैठण) येथील नाथसागर धरणातून डावा व उजवा कालव्याद्वारे रब्बी हंगामासाठी तीन आवर्तने, तर उन्हाळी हंगामात एक (पान २ वर)





आज औंध, पुणे येथे पार पडलेल्या अखंड मराठा साम्राज्य फाऊंडेशन तर्फे आयोजित नवदुर्गा सन्मान सोहळा या कार्यक्रमात परळी तालुक्यातील डिग्रस गावच्या राधाबाई प्रकाश खोडके यांना मुंबई च्या महापौर रितुताई तावडे ज्योतीताई मेटे यांच्या हस्ते प्रशस्ती पत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले, परळी सारख्या तालुक्यातून बाहेर पडून देहू येथे वास्तव्यास राहून तेथे चपाती चा व्यवसाय चालू केला त्या व्यवसायातून २० ते २५ महिलांना रोजगार दिला तसेच सामाजिक कार्यात सुद्धा जमेल तसे योगदान देण्याचे मोलाचे काम केले. या कामाची दखल घेऊन अखंड मराठा साम्राज्य फाऊंडेशन ने दखल घेऊन राधाबाई खोडके यांना नवदुर्गा या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, यावेळी मंत्री मेघनाताई बोर्डीकर साकोरे यांनीही हजेरी लावली.

फाउंडेशन शाळेजवळील मुख्य रस्त्यावर बांधकाम साहित्याचे अतिक्रमण; तात्काळ हटविण्याची नगरसेविका शिल्पा लाहोटी यांची मागणी!

विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि मंदिर दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

शहरातील फाउंडेशन शाळेजवळील मुख्य रस्त्यावर तसेच मंदिर दर्शनासाठी जाणाऱ्या प्रमुख मार्गावर रेती, खडी, विटा व इतर बांधकाम साहित्य टाकून करण्यात आलेल्या अतिक्रमणामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. या अतिक्रमणामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून अपघाताचा धोका वाढला आहे. हे अतिक्रमण तात्काळ हटवून संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी प्रभाग क्रमांक १३ च्या नगरसेविका सौ.



शिल्पा जयपाल लाहोटी यांनी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

फाउंडेशन शाळेच्या परिसरातील या मुख्य रस्त्यावर दिवसभर दुचाकी, चारचाकी व अन्य वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. या मार्गावर शाळेत जाणारे विद्यार्थी, विद्यार्थ्यांना सोडण्यासाठी व घेण्यासाठी येणाऱ्या माता-भगिनी, स्थानिक नागरिक तसेच मंदिरात दर्शनासाठी जाणारे असंख्य भाविक येजा करतात. (पान २ वर)

वानटाकळी सरपंच गंगाबाई ज्ञानोबा हांगे यांचे विरुद्ध अविश्वास दाखल



परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी तालुक्यातील वानटाळी चे सरपंच श्रीमती गंगाबाई ज्ञानोबा हांगे यांचे विरुद्ध ७ ग्रामपंचायत सदस्यांनी तहसीलदार परळी वैजनाथ यांचेकडे अर्ज दाखल केला असून तहसीलदार परळी वैजनाथ यांनी ग्रामपंचायत वानटाळी ची विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे.असी माहिती ग्रामपंचायत सदस्य तुकाराम देविदास मुंडे यांनी दिली आहे. वानटाकळी ग्रामपंचायतीचे सदस्य, यांनी आज दि.०२/११/२०२६ (पान २ वर)

नायब तहसीलदार सुरेंद्र डोके यांचा अत्तार फाऊंडेशन बीडतर्फे वाढदिवसानिमित्त सन्मान

बीड/प्रतिनिधी

बीड तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार आदरणीय श्री. सुरेंद्र डोके साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त अत्तार फाऊंडेशन बीडच्या वतीने त्यांना पुष्पगुच्छ, हार व श्रीफळ देऊन सन्मानपूर्वक वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

शासन आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून महसूल विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. सर्वसामान्य नागरिकांचे महसूलविषयक प्रश्न संवेदनशीलतेने समजून घेऊन ते न्याय्य, पारदर्शक आणि नियमानुसार सोडविणे ही प्रशासनाची मूलभूत जबाबदारी आहे. या जबाबदारीचे भान ठेवून कर्तव्यदक्षता, पारदर्शकता आणि न्यायप्रियतेच्या माध्यमातून जनहिताला प्राधान्य देणाऱ्या प्रशासकीय



अधिकाऱ्यांचे कार्य समाजासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

लोकाभिमुख प्रशासन हीच खरी लोकसेवा! सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कार्यालयांमध्ये सन्मानाची वागणूक मिळावी, त्यांच्या प्रश्नांची वेळेत दखल घेतली जावी आणि त्यांना न्याय मिळावा, हीच सुशासनाची खरी ओळख आहे. अशा लोकहितकारी कार्याला प्रोत्साहन देणे आणि कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्यांचा सन्मान करणे, हा अत्तार फाऊंडेशनचा सकारात्मक दृष्टिकोन असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

नायब तहसीलदार श्री. सुरेंद्र डोके साहेब यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि भावी वाटचालीसाठी भरभरून यश लाभो, तसेच त्यांच्या हातून यापुढेही निष्पक्ष, पारदर्शक आणि जनहितकारी सेवा घडत राहो, अशा सदिच्छा अत्तार फाऊंडेशनच्या वतीने व्यक्त करण्यात आल्या. याप्रसंगी अत्तार फाऊंडेशन महाराष्ट्राचे संस्थापक अध्यक्ष इम्रान अत्तार, सचिव फिरोज सर , उपाध्यक्ष समीर आतार सर आणि सरचिटणीस रफीक अत्तार उपस्थित होते.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात ३२२ कोटी ४७ लाखांची अग्रीम मदत

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महाराष्ट्र शासनाचे आ.बबनराव लोणीकर यांच्याकडून अभिनंदन व आभार

बीड/प्रतिनिधी

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीचा आर्थिक दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार जालना जिल्ह्यातील ६ लाख ४४ हजार ९५७ शेतकऱ्यांच्या खात्यात आज प्रत्येकी ५ हजार रुपयांची अग्रीम मदत जमा करण्यात आली. यासाठी एकूण ३२२ कोटी ४७ लाख ८५ हजार रुपये वितरित झाले आहेत. शेतकऱ्यांच्या अडचणींची जाणीव ठेवून तातडीने मदत उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करून आभार मानले आहेत.



राज्य शासनाच्या निर्णयानुसार खरीप हंगामात ३३ टक्क्यांपेक्षा अधिक पीक नुकसान झालेल्या पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी ५ हजार रुपयांची अग्रीम मदत थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रणालीद्वारे देण्यात येत आहे. संपूर्ण नुकसानभरपाईची प्रक्रिया पूर्ण होण्याची वाट न पाहता शेतकऱ्यांना तातडीचा आर्थिक आधार मिळावा, हा या निर्णयामागील महत्त्वाचा उद्देश आहे. शासनाने यासाठी ७ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद केली असून, संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची भूमिका घेतली आहे अशी माहिती आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.

जिल्ह्यात तालुकानिहाय जालना ९१,२२६, बदनापूर ६४,६७८, भोकरदन १,३३,८९९, जाफ्राबाद ७०,६३५, परतूर ५१,२२६, मंठा ६४,८८८, अंबड ९१,२०० आणि घनसावंगी ७७,२०५ शेतकऱ्यांना या मदतीचा लाभ मिळाला आहे. एकूण ६,४४,९५७ शेतकऱ्यांच्या खात्यात ३२२ कोटी ४७ लाख ८५ हजार रुपये जमा झाल्याने दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना मोठा (पान २ वर)

आधार प्रकल्पांतर्गत ४८० गरजू मुलांना दीपावली फराळ साहित्याचे वाटप

धारूर/अतूल शिनगारे

माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या आधार प्रकल्पांतर्गत लोकनेते सुंदरराव सोळंके नागरी सहकारी पतसंस्थेच्या धारूर शाखेत झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजाऊ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मिलिंद गायकवाड उपस्थित होते. यावेळी पोलीस पाटील संघाचे अध्यक्ष सचिन थोरात, तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. परमेश्वर शिनगारे, महारुद्र इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजनाने झाली. यावेळी मान्यवरांनी प्रतिष्ठानच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत गरजू विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून उज्ज्वल भविष्य घडवावे, असे आवाहन केले. आधार प्रकल्पाच्या



माध्यमातून वंचित व निराधार मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचे कार्य सुरू असल्याचे सचिन थोरात यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुरुषोत्तम सोळंके यांनी केले. सूत्रसंचालन शिंदे मॅडम यांनी, तर आभार स्वाती फावडे मॅडम यांनी मानले. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रतिष्ठानचे पदाधिकारी, पतसंस्थेचे अधिकारी-कर्मचारी व सिंदफणा पब्लिक स्कूलच्या शिक्षकांनी परिश्रम घेतले. गरजू मुलांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



लेक-जावयांच्या प्रेमातून साकारला अमृतमहोत्सवी सप्त धान्य तुला सोहळा



पाथरी/आवडाजी ढवळे

श्रीमती नंदाबाई लक्ष्मणराव बोराडे यांच्या ७५ व्या जन्मवर्षपूर्ती निमित्त रविवारी बालाजी मंदिरातील सिंदुर हॉल येथे अमृतमहोत्सवी सप्त धान्य तुला हा शानदार सोहळा संपन्न झाला.

काटकसर, परोपकार आणि अध्यात्मिक मूल्यांवर आधारलेला श्रीमती नंदाबाई लक्ष्मणराव बोराडे यांचा ७५ वर्षांचा प्रेरणादायी जीवनप्रवास आदर्शवत राहिला आहे.आईप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांना दीर्घायुष्य लाभावे, या उद्देशाने किरणताई रवींद्रजी तौर, भावनाताई अनिलराव नखाते, अमृता सुशील डक आणि मयुरी संजय पावडे या लेक-जावयांनी या सोहळ्याचे छान आयोजन केले होते. या अनोख्या सप्त धान्य तुला सोहळ्याने उपस्थितांचे लक्ष वेधले. यावेळी माजी.आ. हारीभाऊ लहाने,साईबाबा बँकेचे चेअरमन हेमंतराव आडळकर, नारायणराव डक, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोकराव डक, जि. प. माजी उपाध्यक्ष राजेंद्र लहाने, दत्तराव पावडे, उपनगराध्यक्ष (पान २ वर)

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740).

नोव्हेंबर / November
मंगळवार/Tuesday
दि.०३/Dt. 03
२०२६ / 2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ४ पाने Pages 4

किंमत ३ रुपये Price 3 rupees

jagmitra2010@gmail.com

www.jagmitra.com

नांदेड / Nanded • वर्ष १ / Year 1 • अंक २८३ / Issue 283 • RNI.No.MAHMAR/2011/38814

नांदेड न्यायालय बॉम्बस्फोट धमकी प्रकरण: पोलीसाकडून सपूर्ण परिसर सुरक्षित घोषित

अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन; नांदेड जिल्हा व सत्र न्यायालयाच्या अधिकृत ईमेल आयडीवर

नांदेड । प्रतिनिधी

दिनांक ०२/११/२०२६ रोजी दुपारच्या सुमारास एका ईमेल आयडीवरून न्यायालयात आयईडी (खएऊ) बॉम्बस्फोट घडवून आणण्याबाबतचा एक धमकीचा ईमेल प्राप्त झाला होता. सदरचा ईमेल जिल्हा न्यायालयाकडून पुढील तातडीच्या कार्यवाहीसाठी पोलीस प्रशासनास प्राप्त झाला. अजित कुंभार, पोलीस निरीक्षक, वजीराबाद व पोलीस ठाण्यातील उपलब्ध अधिकारी आणि अंमलदार, रणजीत भोईटे, पोलीस निरीक्षक, दहशतवाद विरोधी शाखा (-ढइ) तसेच दहशतवाद विरोधी पथक, नांदेड यांनी डॉ. नीलाभ रोहन, पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या आदेशाने तात्काळ न्यायालयात धाव घेतली.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश (झऊा) यांच्याशी चर्चा करून, त्यांच्या सूचनेनुसार पीए (झ-) सिस्टीमद्वारे उद्घोषणा करण्यात आली आणि न्यायालयातील सर्व पक्षकार, वकील, अधिकारी व कर्मचारी यांना सुरक्षिततेच्या कारणास्तव तात्काळ न्यायालय



परिसराबाहेर काढण्यात आले. मिना तोटेवाड, पोलीस निरीक्षक, बॉम्बशोधक व नाशक पथक (इऊऊड) तसेच मारोती चव्हाण, जलद प्रतिसाद पथक व त्यांच्या पथकाने संपूर्ण न्यायालय परिसराची घातपात विरोधी तपासणी केली. यामध्ये नांदेड जिल्हा व सत्र न्यायालयाची मुख्य इमारत, आतील व बाहेरील संपूर्ण परिसराची बारकाईने तपासणी करण्यात आली. तब्बल दोन तास चाललेल्या या सखोल तपासणीदरम्यान न्यायालय परिसरात कोणतीही संशयास्पद किंवा स्फोटक वस्तू आढळून आलेली नाही, असे इऊऊड पथकाने स्पष्ट केले.

तपासणी पूर्ण झाल्यानंतर आणि परिसर पूर्णपणे सुरक्षित असल्याची खात्री पटल्यानंतर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या आदेशाने दुपारी १६.२५ वाजता न्यायालयाचे कामकाज पूर्ववत सुरू करण्यात आले व पक्षकार आणि नागरिकांना न्यायालयात प्रवेश देण्यास मुभा देण्यात आली. धमकीचा ईमेल पाठवणाऱ्या अज्ञात व्यक्तीचा व ईमेल स्रोताचा तांत्रिक तपास पोलीस विभागाकडून युद्धपातळीवर केला जात आहे. तरी नांदेड जिल्ह्यातील सर्व नागरिकांना, वकिलांना व पक्षकारांना डॉ. नीलाभ रोहन, पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या तर्फे आवाहन करण्यात येते की, कोणीही कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये व घाबरून जाऊ नये. पोलीस प्रशासन नागरिकांच्या सुरक्षेसाठी पूर्णपणे सज्ज व सतर्क आहे.

भूमीहीन व गरीब कुटुंबांच्या विविध मागण्यांसाठी आमरण उपोषण सुरु; पोमनाळा येथील नागरिकांचा आक्रमक पवित्रा

भोकर । एजास कुरेशी

शेतकरी व गरीब कुटुंबांच्या हितासाठी आणि त्यांच्या विविध प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी नांदेड जिल्हयात प्रशासनाकडे अर्ज देण्यात आला होता. पोमनाळा येथील भूमीहीन व गरीब कुटुंबांना दिवाळी साजरी करण्यासाठी आणि मूलभूत सुविधा मिळवण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली होती. दिवाळीसाठी आर्थिक मदत: भूमीहीन कुटुंबांना दुष्काळकाळात आलेली दिवाळी साजरी करण्यासाठी प्रति कुटुंब २०,००० रुपये बँक अकाऊंटमध्ये जमा करण्यात यावेत.



पिण्याच्या पाण्यासाठी पोमनाळा येथे दररोज तीन टँकरने शासकीय स्थरावर पाणी पुरवठा सुरू करावा आणि जानेवारी २०२७ पासून जनतेला पिण्यासाठी नियमित पाणी चालू करावे.

दुष्काळामुळे त्रस्त झालेल्या भूमीहीन एस.सी. ३५ कुटुंबांचे लाईटबिल आणि कर्ज वसुलीची ताकीद एका वर्षासाठी थांबवण्यात यावी. तसेच मोरे पोमनाळा व पोमनाळा तांडा येथील प्राव्हेट फायनान्स कंपन्यांचे वितरित करण्यात आलेले कर्ज वसुलीची ताकीदही एका वर्षासाठी देण्यात येऊ नये. भूमीहीन कुटुंबांना पोमनाळा व पोमनाळा तांडा येथील भूमीहीन कुटुंबांना गायरान पट्टे नावे करून देण्यात यावे

संबंधित अधिकाऱ्यांमार्फत भूमीहीन कुटुंबांच्या मागण्या तातडीने मान्य न केल्यास, भोकर तालुक्यातील सर्व खेड्यांच्या सहकार्याने दि. ०२/११/२०२६ रोजी तहसील कार्यालय भोकर येथे आमरण पोषणाची सुरुवात करण्यात आली आहे. या उपोषणादरम्यान नागरिकांचे काही नुकसान झाल्यास किंवा अनुचित प्रकार घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित अधिकारी वर्गाची राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. हा अर्ज अनिल सुधाकर मोरे रा. मोरे पोमनाळा, व इतर नागरिक, महिलांच्या वतीने जिल्हाधिकारी साहेब, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांच्याकडे सादर करण्यात आला असून, या निवेदनाची प्रत मुख्यमंत्री कार्यालय, महसूल मंत्री, स्थानिक आमदार आणि गटविकास अधिकारी यांनाही पाठवण्यात आली आहे.

शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी सीता नदीचे खोलीकरण सुरू!

तीन दिवसांपासून युद्धपातळीवर काम सुरू; पाणी जपून वापरण्याचे पाणीपुरवठा सभापती श्याम चंद्रे यांचे नागरिकांना आवाहन

मुदखेड । प्रतिनिधी

मुदखेड शहराला आगामी काळात सुरळीत पाणीपुरवठा व्हावा आणि संभाव्य पाणीटंचाईवर मात करता यावी, या उद्देशाने सीता नदीपात्रातील खोलीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. मागील तीन दिवसांपासून या कामाला सुरुवात झाली असून, नदीपात्रातील पाणीसाठा वाढविण्याच्या दृष्टीने नगरपरिषद प्रशासनाकडून प्रयत्न केले जात आहेत.

यंदा पावसाचे प्रमाण तुलनेने कमी राहिल्याने परिसरात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यातच एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत शहरातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी सीता नदीपात्रातील खोलीकरणाचे काम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या कामामुळे नदीपात्रात अधिक पाणीसाठा उपलब्ध होण्यास मदत होईल आणि शहराच्या पाणीपुरवठ्याला दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.



दरम्यान, नागरिकांनी पाण्याचा वापर अत्यंत जपून व काटकसरीने करावा, पाण्याचा अपव्यय टाळावा आणि उपलब्ध पाण्याचा योग्य विनियोग करावा, असे आवाहन मुदखेड नगरपरिषदेचे पाणीपुरवठा सभापती श्याम चंद्रे यांनी केले आहे. शहरातील प्रत्येक नागरिकाला पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी नगरपरिषद प्रशासन प्रयत्नशील आहे. मात्र, पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाच्या प्रयत्नांसोबतच नागरिकांचे सहकार्यही तितकेच महत्त्वाचे आहे. पाणी ही मौल्यवान नैसर्गिक संपत्ती असून तिचे संवर्धन करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करून नगरपरिषद प्रशासनाला सहकार्य करावे, असेही सभापती श्याम चंद्रे यांनी सांगितले.

न्याहळी येथील मारुती मंदिर संस्थानच्या विहिरीचा मोबदला मिळण्याबाबत विश्वस्तांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

मुदखेड । प्रतिनिधी

मुदखेड शहरातील न्याहळी येथील श्री मारुती मंदिर संस्थानच्या मालकीच्या पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीचे अधिग्रहण करून योग्य मोबदला देण्यात यावा, अशी मागणी मारुती मंदिर संस्थानच्या वतीने नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. न्याहळी येथील श्री मारुती मंदिर संस्थानची ही आड विहीर तब्बल १०० वर्षांपासून असून, त्या विहिरीचे पाणी अनेक वर्षांपासून परिसराला उपलब्ध होत आहे. नगरपरिषदेकडून याच विहिरीचे पाणी न्याहळी प्रभागात पुरवले जाते आणि नागरिकांकडून पाणीपट्टी देखील वसूल केली जाते. मात्र, असे असतानाही या पाण्याचा मोबदला मारुती मंदिर संस्थानला मिळत नसल्याची खंत विश्वस्तांनी व्यक्त केली आहे.

न्याहळी प्रभागाला पाणी पुरवठा करणाऱ्या या आड विहिरीच्या पाण्याचा योग्य मोबदला श्री मारुती मंदिर संस्थानला देऊन प्रशासनाने सहकार्य करावे, अशी विनंती निवेदन यापूर्वीही प्रशासनाला देऊनही कोणतीही दखल घेतली गेलेली नाही. दिलेल्या निवेदनाची दखल नगर परिषद प्रशासनाने नळपटी वसूलीतुन संस्थाना देऊन सहकार्य करावे जर मोबदला मिळाला नाही, तर संस्थानतर्फे बसवलेली पाणीपुरवठा करणारी मोटर आणि पाईप काढून पाणीपुरवठा बंद करण्यात येईल, असा इशाराही विश्वस्तांनी दिला आहे. या निवेदनावर मारुती मंदिर संस्थान न्याहळी चे अध्यक्ष ईश्वर पिन्नलवार, मारोती तोटावाड, गंगाधर खतगावे, शिवा बाचेवाड, गणपतराव पावडे, गंगाधर तोटावाड, बालाजी पावडे, मानसिंग महाराज गिरी, प्रल्हाद कवडे, भीमराव महादवाड आदी विश्वस्तांच्या स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

अवर्षण, दुष्काळात सक्तीची वसूली थांबवा; तल्हारीतांडा येथील नागरीकांचे हिमायतनगर येथील खाजगी फायनांन्स कंपनीच्या शाखेला निवेदन

हिमायतनगर । धम्मपाल मुनेश्वर

अवर्षणांमुळे दुष्काळ आणि नापिकीने शेतकरी-शेतमजुरांचे कंबरडे मोडले असताना दुसरीकडे विविध फायनान्स कंपन्यांच्या कर्जवसुलीचा तगादा सुरू असल्याने ग्रामीण भागातील सामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. संकटाच्या काळात तरी सक्तीची वसुली थांबवा, अशी मागणी किनवट तालूक्यातील तल्हारी तांडा येथील ग्रामस्थांनी हिमायतनगर येथील खाजगी फायनांन्स कंपनीच्या शाखा कार्यालयाला निवेदन देवून केली आहे.

अवर्षणांमुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असल्याने शेतीचे उत्पन्न कमालीचे घटले असून शेतकरी, शेतमजूर आणि सामान्य कुटुंबांसमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हाताला काम नाही, शेतीतून उत्पन्न नाही, अशा परिस्थितीत कर्जाचे हप्ते भरण्यासाठी वसुली कर्मचाऱ्यांकडून तगादा लावला जात असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.दुष्काळात दिलासा देण्याऐवजी वसुलीचा दबाव आणला जात आहे. दि.२ नोव्हेंबर २०२६ रोजी समस्ता फायनान्ससह विविध फायनान्स कंपन्यांच्या हिमायतनगर व इस्लापूर शाखांमध्ये निवेदने देऊन सक्तीची कर्जवसुली तात्काळ थांबविण्याची मागणी करण्यात आली आहे. दुष्काळी परिस्थितीचा विचार करून वसुली कर्मचाऱ्यांना हप्त्यांसाठी दबाव न टाकण्याचे स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदन दिले, पण पोचपावती देण्यासही नकार?

दरम्यान, फायनान्स कंपन्यांच्या कार्यालयात निवेदन देण्यासाठी गेलेल्या ग्रामस्थांना संबंधित व्यवस्थापकांकडून निवेदनाची पोचपावती देण्यास नकार देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवेदन स्वीकारल्यानंतर त्याची अधिकृत प्रत किंवा पोचपावती देणे अपेक्षित असताना व्यवस्थापकांच्या या भूमिकेमुळे ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. नागरिकांच्या मागण्यांची दखल घेण्याऐवजी निवेदनाची पोचपावती देण्यासही टाळाटाळ होत असेल, तर सामान्य माणसाने आपली कैफियत मांडायची तरी कुणाकडे, असा सवाल उपस्थित होत आहे.

हप्ते भरण्यासाठी पैसे कुठून आणायचे?

शेतीत नापिकी, मजुरीचे काम ठप्प आणि घरखर्चाचा वाढता भार अशा परिस्थितीत कर्जाचे हप्ते भरणे शक्य नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीचा विचार करून सक्तीची वसुली थांबवावी आणि शेतकरी, शेतमजूर व गरीब कुटुंबांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर शिल्या विकास राठोड, इंदु जीवन राठोड, सुनिता विशावर तांबारे, राजश्री रविंद्र पवार, शोभा नंदू राठोड, नंदा संजय राठोड, देवका राजू राठोड, सीमा नामदेव पवार, रिया प्रविण राठोड यांच्यासह तल्हारी तांडा येथील असंख्य ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

गोंधनखेड्यात महिलांचे पाण्यासाठी आंदोलन

सेनगाव । प्रतिनिधी

सेनगाव तालुक्यातील गौधनखेडा येथे पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. गावात पाण्याचा थेंबही मिळत नसल्याने संतप्त महिलांनी थेट पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन केले. तब्बल सात तासानंतर पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. गौधनखेडा येथील ग्रामस्थांना आतापर्यंत खाजगी नळाद्वारे दरमहा ३०० रुपये देऊन पाणीपुरवठा केला जात होता. मात्र सध्या भूजल पातळी खालावल्याने शेतीसाठी पाणी अपुरे पडत असल्याने संबंधित शेतकऱ्याने गावाकडे होणारा पाणीपुरवठा बंद केला आहे. परिणामी ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे.

गावात पाण्याची टाकी उभारण्यात आली असून खाजगी शेतात विहीर खोदून सुमारे दोन वर्षांपूर्वी पाणीपुरवठ्याची चाचणीही घेण्यात आली होती. मात्र तेव्हापासून या टाकीत पाण्याचा एक थेंबही पडलेला नाही. टाकी असूनही पाणी नाही आणि पर्यायी व्यवस्थाही नसल्याने ग्रामस्थांची पाण्यासाठी परवड सुरू आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी महिलांनी पंचायत समितीच्या संबंधित विभागाला निवेदन देऊन पाणीटंचाई दूर करण्याची मागणी केली होती. मात्र दोन-तीन दिवस उलटूनही कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे संतप्त महिलांनी पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन सुरू केले. जोपर्यंत पाणी मिळत नाही, तोपर्यंत खाली उतरणार नाही असा पवित्रा त्यांनी घेतला. विशेष म्हणजे, आंदोलन सुरू असताना ग्रामसेवक, सरपंच आणि पाणीपुरवठा सेवक यापैकी कोणीही घटनास्थळी फिरकले नसल्याने महिलांनी नाराजी व्यक्त केली.

या आंदोलनात आशा शामराव ढाकरे, दीपमाला लक्ष्मण ढाकरे, कलावती केशव पाण्याची व्यवस्था लवकरात लवकर न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी संतप्त महिलांनी दिला. या आंदोलनाची प्रशासन दखल घेणार का याकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे. ढाकरे, जनाबाई गंगाराम ढाकरे, सुशीला दिलीप फुकटे, सुनीता संतोष ढाकरे, लक्ष्मी अशोक ढाकरे, रेखा रतन ढाकरे, रेखा विष्णू ढाकरे, लीलाबाई तानाजी ढाकरे, सुनीता भगवान खिल्लारे, सुमन उत्तम खिल्लारे, आशा संजय खिल्लारे, जमुनाबाई परसराम खिल्लारे, गंगूबाई तुळशीराम खिल्लारे, लक्ष्मीबाई राजाराम खिल्लारे यांच्यासह गावातील अनेक महिलांनी सहभाग घेतला होता.

आखाडा बाळापूर ग्रामीण रुग्णालयातील समस्यांचा पाढा; आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना निवेदन!

रिक्त पदे भरा, ट्रॉमा केअर सेंटर सुरू करा, पाच वर्षांपासून बंद असलेली प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत कार्यान्वित करा; शिवसेनेची मागणी

कळमनुरी । गंगासागर पंडित

कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर येथील ग्रामीण रुग्णालय हे परिसरातील हजारो गोरगरीब रुग्णांसाठी महत्त्वाचे आरोग्य केंद्र आहे. मात्र, या रुग्णालयात अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या असून, रुग्णांना उपचार घेताना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. या समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आखाडा बाळापूर ग्रामीण रुग्णालयाला भेट दिली असता, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे जिल्हा उपसंघटक सोपान पाटील बोंढारे यांनी त्यांना निवेदन सादर करून विविध मागण्या मांडल्या.

या निवेदनात रुग्णालयातील रिक्त पदांचा प्रश्न प्रामुख्याने उपस्थित करण्यात आला आहे. रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, फार्मासिस्ट (कंपाउंडर), लॅब टेक्निशियन आणि स्टाफ नर्स यांची पदे रिक्त असल्याने आरोग्य सेवेवर परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. तसेच कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या कामकाजात अनियमितता असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे. सफाई कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्याने रुग्णालयातील स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होत असल्याचेही सांगण्यात आले.

औषधांचा तुटवडा अन् मूलभूत सुविधांचा अभाव

रुग्णालयात अत्यावश्यक औषधांचा कायमस्वरूपी तुटवडा जाणवत असून,



अनेक वेळा रुग्णांना बाहेरून औषधे खरेदी करावी लागत आहेत. याशिवाय पुरेशा बेडची व्यवस्था, स्ट्रेचर, शुद्ध पिण्याचे पाणी आणि स्वच्छतागृह अशा मूलभूत सुविधांचीही कमतरता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

मंजूर ट्रॉमा केअर सेंटर तातडीने सुरू करा

आखाडा बाळापूर ग्रामीण रुग्णालयासाठी ट्रॉमा केअर सेंटर मंजूर झालेले असतानाही ते अद्याप पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झालेले नाही. अपघातग्रस्त तसेच गंभीर रुग्णांना तातडीने उपचार मिळण्यासाठी या केंद्राची आवश्यकता आहे. त्यामुळे आवश्यक वैद्यकीय सुविधा आणि मनुष्यबळ उपलब्ध करून ट्रॉमा केअर सेंटर तातडीने सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

पीएमसाठी स्वतंत्र कर्मचारी नेमण्याची मागणी

ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन (पोस्टमार्टम) करण्यासाठी कायमस्वरूपी प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध नसल्याने अपघाती किंवा नैसर्गिक मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या नातेवाइकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे शवविच्छेदनासाठी स्वतंत्र प्रशिक्षित कर्मचारी नियुक्त करावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

पाच वर्षांपासून बांधलेली प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत धूळखात

आखाडा बाळापूर परिसरात नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत बांधून जवळपास पाच वर्षे पूर्ण झाली आहेत. मात्र, लाखो रुपये खर्च करून बांधण्यात आलेली ही इमारत अद्याप वापरात आलेली नसल्याने ती धूळखात पडून आहे. संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आदेश देऊन ही इमारत कार्यान्वित करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी ग्रामीण रुग्णालयाची प्रत्यक्ष पाहणी करून या सर्व समस्यांची दखल घ्यावी. रिक्त पदे तातडीने भरावीत, शवविच्छेदनासाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करावा, पाच वर्षांपासून बंद असलेली प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत सुरू करण्याचे आदेश द्यावेत, औषध पुरवठा व स्वच्छतेसाठी विशेष निधी उपलब्ध करून द्यावा, अशा विविध मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.

यावेळी आमदार संतोष बांगर उपस्थित होते. ग्रामीण भागातील सर्वसामान्य आणि गोरगरीब नागरिकांना वेळेत व दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी शासनाने या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा निवेदनकर्त्यांनी व्यक्त केली.

दैनिक जगमित्र कार्यालय, ९-२-३४६, बिलाल नगर, दैगलूर नाका, इतवारा, नांदेड

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

शेख मौला शेख उस्मान (नांदेड जिल्हा प्रतिनिधी)
मो.9766664949 PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — मंगळवार दि.०३ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ४

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीत शिवसेनेचा मदतीचा हात

परभणी । प्रतिनिधी

दुष्काळाच्या संकटामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकरी कुटुंबांची दिवाळी गोड व्हावी आणि त्यांच्या सणाचा आनंद द्विगुणित व्हावा, या उद्देशाने परभणी विधानसभा मतदारसंघात शिवसेनेच्या वतीने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळी शिध्याचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांच्या नेतृत्वाखाली विविध गावांतील गरजू व दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्यात आला.

यंदा जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. खरीप हंगामातील पिकांचे नुकसान, उत्पन्नातील घट आणि वाढत्या आर्थिक अडचणींमुळे अनेक शेतकरी कुटुंबांसमोर दिवाळीचा



सण साजरा करण्याचेही आव्हान निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत शेतकरी बांधवांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविण्यासाठी शिवसेनेने शिधावाटपाचा उपक्रम हाती घेतला.

परभणी विधानसभा मतदारसंघातील विविध गावांमध्ये दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांची गरज लक्षात घेऊन दिवाळी शिध्याचे वाटप करण्यात आले. सणासुदीच्या काळात मिळालेल्या या मदतीमुळे आर्थिक संकटात असलेल्या अनेक कुटुंबांना दिलासा मिळणार आहे. संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना आधार देणे, हीच खरी लोकसेवा असल्याची भूमिका यामागे असल्याचे शिवसेनेच्या वतीने सांगण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सणाच्या काळात मदतीचा आधार मिळाला आहे. जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी या उपक्रमाच्या माध्यमातून गावागावांत मदत पोहोचविण्याचा प्रयत्न केला.

दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना केवळ आश्वासन नव्हे, तर प्रत्यक्ष मदतीची गरज असते. याच भावनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून शिवसेनेने सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला आहे. 'मदतीचं तोरण हेच शिवसेनेचं धोरण!' या भूमिकेतून शेतकरी कुटुंबांची दिवाळी आनंददायी करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

जात पडताळणीचे नवीन पोर्टल ठरतेय सर्वसामान्यांसाठी डोकेदुखी!

तांत्रिक अडचणींमुळे जात वैधता प्रमाणपत्राचे काम संथगतीने; पोर्टलसोबत ऑफलाइन प्रक्रियाही सुरू ठेवण्याची मागणी

कळमनुरी । गंगासागर पंडित

हिंगोली जिल्ह्यांमध्ये जात पडताळणी प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक व्हावी, या उद्देशाने शासनाने नवीन ऑनलाइन पोर्टल सुरू केले आहे. मात्र, प्रत्यक्षात या पोर्टलवरील तांत्रिक अडचणींमुळे सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी आणि पालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे. नवीन पोर्टलवर अर्ज कसा करायचा, आवश्यक कागदपत्रे कशी अपलोड करायची, याबाबत अनेकांना पुरेशी माहिती नसल्याने नागरिक संभ्रमात पडले आहेत.

विशेष म्हणजे, जात पडताळणी कार्यालयात अर्जदारांच्या फाईलमधील आवश्यक कागदपत्रे तसेच फोटो अपलोड होत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे अनेक अर्ज प्रलंबित राहत असून जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याच्या प्रक्रियेला विलंब होत आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवेशासाठी तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक असल्याने या विलंबाचा फटका संबंधित अर्जदारांना बसत आहे. शासनाने ऑनलाइन प्रक्रिया सुरू केली असली तरी ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना इंटरनेट, तांत्रिक ज्ञान आणि पोर्टल हाताळण्याचा अनुभव नसतो. त्यातच पोर्टलवरील तांत्रिक अडचणींमुळे नागरिकांना वारंवार कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. ऑनलाइन अर्ज करूनही काम होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

ऑनलाइनसोबत ऑफलाइन प्रक्रियाही सुरू ठेवा!

शासनाने नवीन पोर्टलमधील तांत्रिक त्रुटी तातडीने दूर कराव्यात, नागरिकांना पोर्टल वापरण्यासाठी योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे आणि जात पडताळणीची प्रक्रिया सुरळीत करावी, अशी मागणी होत आहे. तसेच ऑनलाइन पोर्टलसोबतच पूर्वीप्रमाणे ऑफलाइन पद्धतीनेही अर्ज व कागदपत्रे स्वीकारण्याची सुविधा सुरू ठेवावी, जेणेकरून सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय होणार नाही. शासनाने डिजिटल प्रक्रियेच्या माध्यमातून कामकाज सुलभ करण्याचा प्रयत्न केला असला, तरी तांत्रिक अडचणींमुळे नागरिकांना त्रास होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे जात पडताळणी पोर्टलमधील अडचणी दूर करून ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी जोर धरत आहे.

हेल्पलाइन ठरत आहे डोकेदुखी

नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना सुलभपणे जात पडताळणी प्रमाणपत्र मिळावे यासाठी सामाजिक न्याय विभागाकडून संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे यासोबतच हेल्पलाइन नंबर देखील देण्यात आले आहेत मात्र हेल्पलाइन नंबर सतत व्यस्त असल्याचा संदेश मिळत असून व्हाट्सअप क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर काहीही उत्तर मिळत नाही यामुळे विद्यार्थी व नागरिक चांगलेच अडचणी सापडले आहेत.

परभणी जिल्हा न्यायालय बॉम्बने उडविण्याची धमकी! निनावी ई-मेलने न्यायालयात खळबळ

धमकीचा मेल मिळताच पोलिसांची धावपळ; बॉम्बशोधक पथक, डॉग स्कॉड दाखल, संपूर्ण इमारत तातडीने रिकामी

परभणी । प्रतिनिधी

परभणी येथील जिल्हा व सत्र न्यायालयाची इमारत बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा निनावी ई-मेल सोमवारी (दि.२ नोव्हेंबर) प्राप्त झाल्याने न्यायालयीन वर्तुळात एकच खळबळ उडाली. या धमकीची माहिती मिळताच पोलीस प्रशासन तातडीने ॲक्शन मोडवर आले. बॉम्बशोधक व नाशक पथक, डॉग स्कॉड तसेच मोठा पोलीस फौजफाटा न्यायालय परिसरात दाखल झाला. खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण न्यायालयीन इमारत रिकामी करण्यात आली, परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



सोमवारी दुपारच्या सुमारास परभणी जिल्हा व सत्र न्यायालयाच्या अधिकृत ई-मेलवर अज्ञात व्यक्तीकडून हा धमकीचा संदेश पाठविण्यात आला. त्यामध्ये जिल्हा न्यायालयाची इमारत बॉम्बने उडविण्याचा उल्लेख करण्यात आला होता. न्यायालयासारख्या महत्त्वाच्या ठिकाणाला थेट लक्ष्य करण्याची धमकी मिळाल्याने न्यायाधीश, वकील, पक्षकार, न्यायालयीन कर्मचारी आणि उपस्थित नागरिकांमध्ये घबराट पसरली. ई-मेलची माहिती मिळताच न्यायालय प्रशासनाने तत्काळ पोलिसांना कळविले. त्यानंतर पोलिसांनी कोणतीही जोखीम न पत्करता तातडीने घटनास्थळी धाव घेतली. बॉम्बशोधक व नाशक पथकासह डॉग स्कॉडला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलालाही घटनास्थळी बोलावण्यात आले. न्यायालयातील कामकाज थांबवून न्यायाधीश, वकील, कर्मचारी आणि पक्षकारांना सुरक्षितपणे इमारतीबाहेर काढण्यात आले.

दरम्यान, संपूर्ण न्यायालयीन परिसराची तपासणी करण्यासाठी पोलिसांनी विशेष खबरदारी घेतली. परिसरातील प्रवेशावर निर्बंध घालण्यात आले असून संशयास्पद वस्तूंची तपासणी करण्यासाठी पथकांकडून शोधमोहीम राबविण्यात येत आहे.

धमकीचा ई-मेल नेमका कोठून आणि कोणी पाठविला, याचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर निर्माण झाले आहे. न्यायालयाला बॉम्बने उडविण्याच्या धमकीमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीनेही हा प्रकार गंभीर मानला जात आहे. धमकीच्या ई-मेलमागील व्यक्तीचा शोध आणि तपासणीत काय निष्पन्न होते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

देगलूर नगर परिषदेच्या वतीने 'महिला बचतगटांचा दीपोत्सव २०२६' चा दिमाखदार शुभारंभ

५० महिला बचतगटांचे स्टॉल्स; नागरिकांनी स्थानिक उत्पादनांना प्राधान्य देण्याचे नगराध्यक्षांचे आवाहन

देगलूर । अजीम अन्सारी

दिनांक २ नोव्हेंबर २०२६ रोजी देगलूर नगर परिषदेच्या वतीने, मा. नगराध्यक्षा सौ.विजयमाला बालाजीराव टेकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्याधिकारी श्रीमती निलम बाबुराव कांबळे यांच्या पुढाकारातून महिला बचतगटांचा दीपोत्सव २०२६ चे थाटामाटात उद्घाटन करण्यात आले. स्थानिक डॉ.बाबासाहेब आंबेडकर डिजिटल अभ्यासिका इमारतीमध्ये आयोजित हा तीन दिवसीय दीपोत्सव सोहळा दिनांक ४ नोव्हेंबर २०२६ पर्यंत चालणार आहे.



या सोहळ्याचे शानदार उद्घाटन मा. नगराध्यक्षा सौ.विजयमाला बालाजीराव टेकाळे यांच्या शुभहस्ते पार पडले. या प्रसंगी माजी नगराध्यक्षा सौ.उज्वला लक्ष्मीकांत पदमवार, सभापती सौ. शोभा दिगंबर कडलवार, सौ. योगेश्वरी लक्ष्मण तोटावार, शेख आर्शिया फातेमा पाशामियाँ, सौ. अंजली अंकुशराव देसाई तसेच नगर परिषद मुख्याधिकारी श्रीमती निलम बाबुराव कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटनप्रसंगी बोलताना नगराध्यक्षा सौ. विजयमाला टेकाळे यांनी सर्व बचतगटांच्या स्टॉल्सला भेट देऊन महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांची पाहणी केली व त्यांच्या कौशल्याचे भरभरून कौतुक केले. दीपावलीची खरेदी करताना देगलूर शहरातील नागरिकांनी महिला बचतगटांनी लावलेल्या या स्टॉल्सना प्रथम प्राधान्य देऊन महिलांच्या स्वावलंबनाला पाठबळ द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी मुख्याधिकारी श्रीमती निलम कांबळे यांनी माहिती दिली की, नगर परिषदेच्या शिफारशीतून देगलूर शहरातील १२ बचतगटांना 'प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग' योजनेअंतर्गत प्रत्येकी ४ लाखांचे अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. पुढील काळात शहरातील इतर बचतगटांनी देखील नवीन उद्योगांची सुरुवात करावी. या दीपोत्सव प्रदर्शनात शहरातील एकूण ५० महिला बचतगट सहभागी झाले आहेत. यात दिवाळीसाठी लागणारे खमंग खाद्यपदार्थ, घराच्या सजावटीचे साहित्य, आकर्षक दागिने, साड्या व विविध ड्रेसेस यांचे भव्य स्टॉल्स मांडण्यात आले आहेत. कार्यक्रमाच्या पहिल्याच दिवशी देगलूरकरांनी खरेदीसाठी मोठी गर्दी केली असून ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. यामुळे सहभागी महिला बचतगटांच्या सदस्यांमध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण दिसून येत आहे.

'त्रिसंगम वार्ता'च्या पहिल्या अंकाचे दिमाखात प्रकाशन; आमदार अंतापुरकरांनी दिल्या शुभेच्छा

देगलूर । अजीम अन्सारी

साप्ताहिक त्रिसंगम वार्ता च्या पहिल्या अंकाचे प्रकाशन देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघाचे आमदार जितेश रावसाहेब अंतापुरकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी आमदार अंतापुरकर यांनी साप्ताहिकाच्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देत संपादक शेख असलम यांना मोलाचे प्रोत्साहन दिले.



पत्रकारिता हे केवळ बातम्या प्रसिद्ध करण्याचे माध्यम नसून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे आणि लोकशाही अधिक बळकट करण्याचे प्रभावी साधन आहे. हाच विचार डोळ्यांसमोर ठेवून 'साप्ताहिक त्रिसंगम वार्ता'ने आपल्या पत्रकारितेच्या प्रवासाला सुरुवात केली आहे. जनतेच्या समस्या, विकासाचे प्रश्न आणि समाजहिताच्या विषयांना प्राधान्य देत निर्भीड व निष्पक्ष पत्रकारिता करण्याचा संकल्प या नव्या उपक्रमाच्या माध्यमातून करण्यात आला आहे. पहिल्या अंकाच्या प्रकाशनप्रसंगी आमदार जितेश रावसाहेब अंतापुरकर यांनी दिलेल्या शुभेच्छा आणि व्यक्त केलेला विश्वास संपादक शेख असलम यांच्यासाठी विशेष प्रेरणादायी ठरला. यावेळी आमदार अंतापुरकर यांनी मी नेहमी तुमच्या सोबत आहे, असे आश्वासक शब्द देत पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन दिले. त्यांच्या या शब्दांमुळे लेखणीला नवे बळ आणि पत्रकारितेच्या प्रवासाला नवी ऊर्जा मिळाल्याची भावना संपादक शेख असलम यांनी व्यक्त केली.

आमदार अंतापुरकर यांनी दाखवलेला विश्वास आणि दिलेला पाठिंबा ही आपल्यासाठी मोठी ताकद असून, जनतेचा निर्भीड आवाज बनून लोकहिताचे प्रश्न सातत्याने मांडणे हेच 'साप्ताहिक त्रिसंगम वार्ता'चे ध्येय असल्याचे शेख असलम यांनी सांगितले. तसेच पहिल्या अंकाच्या प्रकाशनप्रसंगी दिलेल्या प्रेमळ शुभेच्छा आणि मोलाच्या पाठिंब्याबद्दल त्यांनी आमदार जितेश रावसाहेब अंतापुरकर यांचे मनःपूर्वक आभार मानले. जनतेचा विश्वास, निर्भीड पत्रकारिता आणि लोकहिताचा ध्यास या त्रिसूत्रीच्या माध्यमातून 'साप्ताहिक त्रिसंगम वार्ता' आगामी काळात वाचकांच्या विश्वासास पात्र ठरेल, असा निर्धार संपादक शेख असलम यांनी व्यक्त केला.

दुष्काळ निवारणासाठी प्रशासन ॲक्शन मोडवर; प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावा!

जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांचे विभागप्रमुखांना निर्देश; विभागनिहाय कामकाजाचा घेतला आढावा

परभणी । प्रतिनिधी

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना, विशेषतः शेतकरी आणि ग्रामीण भागातील जनतेला दिलासा देण्यासाठी दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे. शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून पात्र लाभार्थ्यांपर्यंत त्यांचे लाभ पोहोचवावेत. तसेच विविध विभागांकडील प्रलंबित कामे विनाविलंब पूर्ण करून विकासकामांना गती द्यावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी विभागप्रमुखांना दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात सोमवारी (दि.२) जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुखांची बैठक घेण्यात आली. यावेळी



जिल्हाधिकाऱ्यांनी विभागनिहाय कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. जिल्ह्यातील महत्त्वाचे प्रश्न, विभागांसमोरील अडचणी, प्रलंबित कामांची सद्यस्थिती आणि शासनाने निर्धारित केलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेबाबत त्यांनी माहिती जाणून घेतली.

जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी संबंधित विभागांनी आवश्यक उपाययोजनांचे प्रभावी नियोजन करून त्यांची काटेकोर अंमलबजावणी करावी. शेतकरी आणि ग्रामीण जनतेच्या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात. प्रशासनातील सर्व यंत्रणांनी संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. विविध विभागांकडील प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा. शासनाने दिलेली उद्दिष्टे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी प्रत्येक विभागाने स्वतंत्र नियोजन करावे. केवळ कागदोपत्री उद्दिष्टपूर्ती न करता योजनांचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांपर्यंत पोहोचतो की नाही, याची खात्री करावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

विभागांमध्ये समन्वय आवश्यक

विकासकामे पूर्ण करताना विभागांमध्ये समन्वयाचा अभाव राहू नये. एका विभागाशी संबंधित कामासाठी दुसऱ्या विभागाचे सहकार्य आवश्यक असल्यास संयुक्तपणे प्रश्न सोडवावेत. कामांची गुणवत्ता, अचूकता आणि वेळेचे नियोजन यांना प्राधान्य देऊन नियमित आढावा घ्यावा, असेही त्यांनी सांगितले. बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, महापालिका आयुक्त नितीन नार्वेकर, अप्पर जिल्हाधिकारी शोभा जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, शैलेश लाहोटी, युवराज डापकर यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश भूषण काळे यांनी पालम येथे आयोजित करण्यात येणाऱ्या कायदेविषयक व शासकीय योजनांच्या माहितीविषयक शिबिरासाठी सर्व विभागप्रमुखांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

लेखी आश्वासन हवेतच! थकीत वेतनासाठी महापालिका कर्मचाऱ्यांचे पुन्हा कामबंद आंदोलन

परभणी । प्रतिनिधी

महापालिका प्रशासनाने लेखी आश्वासन देऊनही कर्मचाऱ्यांचे उर्वरित थकीत वेतन अदा न केल्याने परभणी महानगरपालिका कर्मचारी संघटनेच्या वतीने सोमवार (दि. २ नोव्हेंबर) पासून पुन्हा कामबंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. थकीत वेतनाचा प्रश्न मार्गी लावण्याऐवजी प्रशासनाकडून केवळ आश्वासने दिली जात असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला असून, प्रलंबित वेतन मिळेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा पवित्रा संघटनेने घेतला आहे.

महापालिका कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाच्या प्रश्नावर यापूर्वीही संघटनेच्या वतीने २८ जुलै ते ११ ऑगस्ट २०२६ या कालावधीत कामबंद आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनामुळे महापालिकेच्या प्रशासकीय कामकाजावर परिणाम झाला होता. त्यानंतर ११ ऑगस्ट रोजी प्रशासन आणि कर्मचारी संघटनेमध्ये झालेल्या चर्चेत तडजोड होऊन कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत प्रशासनाने लेखी आश्वासन दिले होते. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी त्यावेळी आंदोलन मागे घेतले होते. मात्र, आंदोलन मागे घेऊन बराच कालावधी उलटूनही प्रशासनाने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केलेली नाही. कर्मचाऱ्यांचे उर्वरित थकीत वेतन अद्याप मिळाले नसल्याने संघटनेने पुन्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.

यासंदर्भात महापालिका कर्मचारी संघटनेच्या वतीने २१ ऑक्टोबर रोजी महापालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आले होते. या निवेदनातून २ नोव्हेंबरपूर्वी कर्मचाऱ्यांचे उर्वरित थकीत वेतन अदा करावे, अन्यथा त्याच दिवसापासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला होता. मात्र, निर्धारित मुदतीत वेतनाचा प्रश्न निकाली न निघाल्याने अखेर सोमवारपासून आंदोलन सुरू करण्यात आले. या आंदोलनात महापालिका कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष नासेर खान वहिद खान, सचिव विश्वनाथ उफाडे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले आहेत. आश्वासनानंतरही वेतनाचा प्रश्न कायम असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी असून, आता प्रशासन या आंदोलनाची दखल घेऊन थकीत वेतनाचा प्रश्न कधी मार्गी लावते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सेवानिवृत्तीनंतर शुद्धोधन गायकवाड यांनी सामाजिक कार्याची धुरा सांभाळावी : गायकवाड

सेवापूर्ती गौरव सोहळात; इलगासुत गौरवग्रंथाचे प्रकाशन

कुंडलवाडी । प्रतिनिधी

प्रा.डॉ.शुद्धोधन गायकवाड यांनी आपल्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेत अनेक विद्यार्थी घडविले असून, त्यांचे विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत आहेत. सेवानिवृत्ती म्हणजे कार्याचा शेवट नव्हे, तर सामाजिक कार्यासाठी मिळालेली नवी संधी आहे. त्यामुळे त्यांनी यापुढील काळात सामाजिक प्रबोधनाचे कार्य हाती घेऊन समाजाला योग्य दिशा देण्यासाठी योगदान द्यावे, असे प्रतिपादन आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते सुरेश गायकवाड यांनी केले.

बिलोली तालुक्यातील अर्जापूर येथील पानसरे महाविद्यालयात ३१ ऑक्टोबर रोजी प्रा.डॉ. शुद्धोधन गायकवाड यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव सुभाष गायकवाड होते. यावेळी कुंडलवाडी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई कोटलावार, माजी शिक्षण सभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, जुक्टाचे माजी राज्याध्यक्ष डी.बी. जांभरूनकर, संस्थेचे माजी सचिव पंढरीनाथ दाचावार, माधवराव पाटील, माजी प्राचार्य डॉ. जी.व्ही. चव्हाण, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक श्रीनिवास चव्हाण, माजी प्राचार्य आनंद मंगनाळे, डॉ. राम जाधव, प्राचार्य कुंभेकर, प्रभारी प्राचार्य डॉ. महादेव बेलखेडे, उप प्राचार्य गोपाळ चौधरी, स्टॉप सेक्रेटरी प्रा.डॉ. देविदास जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना सुरेश गायकवाड म्हणाले की, शुद्धोधन गायकवाड यांनी आपल्या अध्यापनाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी घडविले. त्यांचे विद्यार्थी परदेशातही उच्च



शिक्षण घेत असून विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहेत. आता निवृत्तीनंतर थांबण्याची गरज नाही, तर कामाचे स्वरूप बदलून समाजप्रबोधनाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. समाजाला योग्य दिशा देणे आणि समाजाला मूळ प्रवाहात टिकवून ठेवणे आज अत्यंत गरजेचे आहे. ही गरज ओळखून निवृत्त व्यक्तींनीही सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. शुद्धोधन आणि प्रतिमा गायकवाड यांची जोडी आदर्श असल्याचे सांगत त्यांनी गायकवाड दाम्पत्याला दीर्घायुष्य लाभावे आणि त्यांच्या हातून भविष्यातही उत्तम कार्य घडावे, अशा शुभेच्छा दिल्या.

या सोहळ्यात पानसरे महाविद्यालयाच्या वतीने प्रा.डॉ. शुद्धोधन गायकवाड यांचा सपत्नीक शाल, महात्मा फुलेंची पगडी, आहेर, भव्य पुष्पहार, भगवान गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर मूर्ती तसेच मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. तसेच बुद्धिस्ट सोशल ऑर्गनायझेशन, नांदेडच्या वतीने त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त तयार करण्यात आलेल्या इलगासुत या गौरवग्रंथाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. बुद्धिस्ट सोशल ऑर्गनायझेशनच्या वतीनेही स्वतंत्र मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. नांदेड येथील मैत्रेय मॉर्निंग वॉक ग्रुपच्या वतीनेही त्यांचा सत्कार करण्यात आला. मानपत्राचे वाचन मिलिंद व्यवहारे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. देविदास जाधव यांनी केले. यावेळी शिवराज पाटील होटाळकर, डी.बी. जांभरूनकर, प्रकाश पाटील अर्जुने, हनमंत मटके, संतोष पाटील शिवशेट्टे, प्रा. हेमंत बावणे, प्राचार्य गौतम मगरे, राजू लाभशेटवार, हौसाजी वारघडे, दत्ताहरी धोत्रे, डॉ. राम वाघमारे आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून गायकवाड यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव केला. अध्यक्षीय समारोप सुभाष गायकवाड यांनी केला.

सत्काराला उत्तर देताना प्रा.डॉ. शुद्धोधन गायकवाड यांनी आपल्या शैक्षणिक प्रवासातील अनेक आठवणींना उजाळा दिला. ग्रामीण भागातून शिक्षण घेत असताना मोठे बंधू सुभाष गायकवाड यांनी केलेल्या सहकार्यामुळे पुढील शिक्षण पूर्ण करता आले. त्यानंतर १९९४ मध्ये पानसरे महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून सेवा करण्याची संधी मिळाली. गेल्या ३२ वर्षांच्या सेवाकाळात विद्यार्थ्यांना घडविण्याबरोबरच महाविद्यालयाच्या विकासासाठीही योगदान देता आले. पर्यवेक्षक पदाची जबाबदारी सांभाळताना संस्थेच्या आणि महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी केलेल्या प्रयत्नांचाही त्यांनी उल्लेख केला. यावेळी त्यांचे चिरंजीव कनिष्क गायकवाड तसेच कन्या प्रेरणा आणि समीक्षा गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त करून वडिलांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रकाश शिंदे तर उपस्थितांचे आभार उप प्राचार्य गोविंद चौधरी यांनी मानले. या कार्यक्रमाला प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, सर्व सेवक, पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक इलासाहे जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, ९-२-३४६, बिलाल नगर, देगलूर नाका, इतवारा, नांदेड महाराष्ट्र ४३१६०४ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.* पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील. Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, 9-2-346, Bilal Nagar, Deglur Naka, Itwara, Nanded, MAHARASHTRA - 431604. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

बद्रीनारायण घुगे (पुणे जिल्हा प्रतिनिधी)
मो.9922476927 PRGI.No.- MHMAR/26/A4099

पुणे जिल्हा आवृत्ती — मंगळवार दि.०३ नोव्हेंबर २०२६ — पान नं. २

पिंपरी-चिंचवडमध्ये दिवाळी फराळाला मागणी; रेडिमेड फराळाच्या विक्रीत ४० टक्क्यांपर्यंत वाढ

पिंपरी । प्रतिनिधी

दिवाळी अवघ्या काही दिवसांवर आली असून, पिंपरी-चिंचवड शहरातील बाजारपेठ फराळाच्या खमंग वासाने दरवळू लागली आहे. पूर्वी घरोघरी महिला चार-चार दिवस फराळ बनवत असत, मात्र, आता विभक्त कुटुंब पद्धत, नोकरदार महिलांची संख्या वाढल्याने आणि महागाईमुळे अनेकांनी रेडिमेड फराळाला पसंती दिली आहे.

ऑफिस आणि घर दोन्ही आघाड्यांवर जबाबदारी सांभाळताना महिलांना घरात फराळ करायला वेळ मिळत नसल्याने रेडिमेड फराळाला मागणी वाढते आहे. मागील वर्षीपेक्षा ३० ते ४० टक्क्यांनी यंदा फराळाला मागणी असल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली. घरगुती महिला व्यावसायिक, बचतगटांना यामुळे फराळविक्रीतून चांगला नफा होत आहे. फराळ हा सर्वांच्याच जिव्हाळ्याचा विषय आहे. दिवाळीत फराळ बनवण्याची परंपरा असली तरीही हल्ली वर्षभर इतर दिवशीही फराळ खाल्ला जातो. दिवाळीला त्याचे विशेष महत्व असून या काळात घरात फराळ बनवण्यासाठी वेळ मिळतोच असे नाही, या परिस्थितीत बाहेरुन फराळ विकत घेण्याकडे कल वाढला आहे.

अगदी एका आठवड्यावर दिवाळी आली असल्याने फराळाच्या ऑर्डर दिल्या जात आहेत. एखादा किलो का होईना पण फराळ विकत घेतला जातो. चविष्ट आणि चांगल्या प्रतीचा फराळ विकत घेण्यासाठी घरगुती फराळाला प्राधान्य दिले जाते. यामुळे हल्ली घरगुती महिला व्यावसायिकांचे प्रमाणही वाढते आहे. यामध्ये काही महिलांना आपले स्वयंपाकाचे कौशल्य वापरुन आर्थिक कमाईदेखील करता येते. तसेच घरातूनच कमाईचा एक मार्ग असल्याने अनेक महिला हा व्यवसाय करत आहेत. घरगुती फराळ असल्याने त्यावर विश्वासही ठेवला जातो.

मोशीच्या कचरा प्रश्नावर महापालिकेसह राज्य शासनाकडे पाठपुरावा करणार!

आमदार महेश लांडगे यांचे मोशीकर ग्रामस्थ, स्थानिक लोकप्रतिनिधींना आश्वासन

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

मोशी कचरा डेपोमुळे निर्माण होणाऱ्या दुर्गंधी, प्रदूषण आणि आरोग्यविषयक समस्यांच्या सोडवणुकीसाठी महापालिका प्रशासनाकडे आणि प्रसंगी राज्य शासनाकडे आवश्यक पाठपुरावा करणार असल्याची भूमिका भाजपा आमदार महेश लांडगे यांनी मांडली. मोशीतील ग्रामस्थ व नागरिकांनी त्यांची भेट घेऊन कचरा डेपोशी संबंधित अडचणी मांडल्या आणि उपाययोजनांच्या मागण्यांचे निवेदन दिले. मोशी कचरा डेपोवरील वाढत्या भारामुळे परिसरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे ग्रामस्थांनी यावेळी सांगितले. डेपोची क्षमता संपत असल्याची चिंता व्यक्त करताना, त्याची सद्यस्थिती, पर्यावरणीय परिणाम आणि कार्यपद्धतीची तातडीने तांत्रिक तपासणी करून अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी त्यांनी केली.

यावेळी नगरसेवक निखिल बोऱ्हाडे, नगरसेविक अर्चना सस्ते, नगरसेविका सारिका बोऱ्हाडे, नगरसेविका सुजाता बोराटे, नगरसेविका सारिका गायकवाड, नगरसेवक डॉ. सुहास कांबळे, सोसायटी फेडरेशनेचे संजीवन सांगळे, मा. नगरसेविका कविता आल्हाट, मा. नगरसेवक धनंजय आल्हाट, अतिश बारणे, ज्ञानेश्वर बोऱ्हाडे, निलेश बोराटे, प्रकाश आल्हाट, निखिल सस्ते, नितीन बोऱ्हाडे, राजेश सस्ते यांच्यासह ग्रामस्थ आणि सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी उपस्थित होते.



कचरा व्यवस्थापनाच्या विकेंद्रीकरणाचा आग्रह

संपूर्ण शहरातील कचरा एकाच ठिकाणी आणून साठविण्याच्या व्यवस्थेऐवजी कचरा व्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण करावे, अशी प्रमुख मागणी निवेदनात करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या प्रत्येक प्रभागात स्वतंत्र, आधुनिक आणि शास्त्रोक्त कचरा प्रक्रिया केंद्रे उभारावीत. ओला, सुका आणि इतर कचऱ्याचे उगमस्थानी वर्गीकरण व स्वतंत्र प्रक्रिया बंधनकारक करून मोशी डेपोवर जाणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी करावे, अशी भूमिका ग्रामस्थांनी मांडली. तसेच, कचऱ्यातून निर्माण होणारे दूषित द्रव अर्थात 'लिचेट' इंद्रायणी नदीत मिसळत असल्याची तक्रार नागरिकांनी निवेदनातून केली आहे. या तक्रारीची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थिती तपासावी. दूषित द्रवाचा संभाव्य प्रवाह रोखून त्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करावी, तसेच नदीच्या पाण्याचे नमुने तपासून अहवाल जाहीर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. डेपो परिसरातील हवा, पाणी आणि मातीच्या गुणवत्तेची नियमित तपासणी करून निष्कर्ष नागरिकांसाठी सार्वजनिक करावेत. रहिवाशांच्या आरोग्यावर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा अभ्यास करण्यासाठी आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करून आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असेही निवेदनात नमूद केले आहे.

कालबद्ध कृती आराखड्याची मागणी

कचरा डेपोचा भविष्यातील वापर, क्षमता आणि पर्यावरण संरक्षणाच्या उपाययोजनांसाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करून तो ग्रामस्थांसमोर सादर करावा. मोशी ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते आणि संबंधित तज्ज्ञांची बैठक घेऊन नागरिकांच्या सूचना व हरकती विचारात घ्याव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे. ग्रामस्थांच्या समस्या आणि सूचना जाणून घेतल्यानंतर आमदार लांडगे यांनी या मागण्यांबाबत पाठपुरावा करण्याची भूमिका स्पष्ट केली. नागरिकांचे आरोग्य, पर्यावरणाचे संरक्षण आणि इंद्रायणीचे संवर्धन लक्षात घेऊन ठोस व दीर्घकालीन उपाययोजना होणे आवश्यक आहे. त्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाकडे आणि गरज भासल्यास राज्य शासनाकडे आवश्यक पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

मोशीकरांनी भेट घेऊन कचरा डेपोमुळे भेडसावणाऱ्या समस्या आणि त्यावरील उपाययोजनांच्या मागण्या मांडल्या आहेत. नागरिकांचे आरोग्य आणि इंद्रायणीचे संरक्षण यांना प्राधान्य देत या मागण्यांबाबत महापालिका प्रशासनाकडे आणि प्रसंगी राज्य शासनाकडे आवश्यक पाठपुरावा करू. कचरा व्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण, शास्त्रोक्त प्रक्रिया आणि प्रदूषण नियंत्रणासाठी कालबद्ध उपाययोजना व्हाव्यात, यासाठी आग्रही आहोत.
– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

आधार हॉस्पिटलच्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद, १०० हून अधिक नागरिकांनी घेतला लाभ

विविध आजारांच्या तपासण्या व वैद्यकीय मार्गदर्शन

पिंपरी । प्रतिनिधी

पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा संकल्प अभियानांतर्गत तसेच आधार हॉस्पिटलच्या सेवाकार्याच्या वर्षपूर्तीनिमित्त देहूरोड येथील आधार हॉस्पिटल मल्टिस्पेशालिटी अँड आयसीयू यांच्या वतीने महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत आरोग्य तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, १०० हून अधिक नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.





शिबिरामध्ये हृदयविकार, मधुमेह, रक्तदाब, अस्थिरोग, खीरोग, किडनी विकार, कर्करोग तसेच इतर विविध आजारांसंदर्भात आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. याशिवाय ईसीजी, एक्स-रे, रक्तदाब व रक्तातील साखरेची तपासणी अशा विविध वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. गरजू नागरिकांना आवश्यक वैद्यकीय सल्ला व पुढील उपचारांबाबत मार्गदर्शनही करण्यात आले. या कार्यक्रमाला चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या माजी आमदार श्रीमती अश्विनीताई लक्ष्मण जगताप, भारतीय जनता पक्षाच्या देहू-देहूरोड शहर मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. रघुवीर उध्दवराव शेलार तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (रामदास आठवले गट) चे देहूरोड शहराध्यक्ष अरविंद गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी माजी आमदार, चिंचवड विधानसभा, श्रीमती अश्विनीताई जगताप यांनी निरोगी आरोग्य राखण्याचे महत्त्व, दैनंदिन जीवनातील आरोग्यविषयक काळजी आणि महिलांच्या आहार व आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता याविषयी मार्गदर्शन केले. रघुवीर शेलार यांनी आपल्या मनोगतात आधार हॉस्पिटलच्या सेवाकार्याचे विशेष कौतुक केले. गेल्या १५ वर्षांपासून आरोग्य क्षेत्रात हॉस्पिटलने केलेल्या कार्याचा उल्लेख करत सर्वसामान्य नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यातील योगदान अधोरेखित केले. तसेच माजी आमदार के. लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या आरोग्यविषयक संकल्पना व समाजसेवेच्या भूमिकेचाही उल्लेख केला.

कार्यक्रमास भाजप युवा संघटनेचे अध्यक्ष अनिरुद्ध काळोखे, अध्यक्ष सचिन मराठे, सरचिटणीस नारायण (तात्या) पंचपिंड, भाजपा महिला मोर्चाच्या अध्यक्षा सौ. सविता पिंजण, ज्येष्ठ माजी महिला पदाधिकारी सौ. लीलावती भारद्वाज, सौ, सरस्वती पिंजण, सौ. बॉबी डिक्का, सौ. प्रीती चौधरी, भाजपचे माजी पदाधिकारी राजेश टिळेकर, ज्येष्ठ पदाधिकारी हनीफ शेख, बाबू कोळी, रवि काळोखे, शक्तिवेल स्वामी, राजू ओसवाल यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब शेलार व प्रदीप बेंद्रे यांनी केले. या उपक्रमाचे आयोजन डॉ. महेश कुदळे, डॉ. शीतल कुदळे व डॉ. गणेश राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी आधार हॉस्पिटलमधील सर्व डॉक्टर, कर्मचारी व कामगारांचे सहकार्य लाभले. समाजातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी आणि आर्थिक अडचणींमुळे कोणालाही उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, हा या आरोग्य शिबिरामागील मुख्य उद्देश होता.

आळंदीतील चार पुलांना संतश्रेष्ठांची नावे; संतपरंपरेचा गौरव करणाऱ्या नामकरणाचा लोकार्पण सोहळा संपन्न

आळंदी । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र आळंदी नगरीला जोडणाऱ्या चार पुलांना संतश्रेष्ठांची नावे देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, या नामकरणाचा लोकार्पण सोहळा आज, सोमवार, दि. २ नोव्हेंबर २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाला.



श्रीक्षेत्र आळंदीच्या समृद्ध संतपरंपरेचा गौरव आणि संतांच्या सामाजिक व आध्यात्मिक योगदानाचे स्मरण कायम राहावे, या उद्देशाने पुढील पुलांना संतश्रेष्ठांची नावे देण्यात आली आहेत. १. श्री संत निवृत्तिनाथ महाराज पूल, २. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पूल, ३. श्री संत सोपानदेव महाराज पूल, ४. श्री संत मुक्ताबाई पूल, संतपरंपरेचा वारसा जपणाऱ्या या नामकरणामुळे आळंदीच्या आध्यात्मिक व सांस्कृतिक वैभवात भर पडणार आहे. संतश्रेष्ठांच्या कार्याची आणि विचारांची आठवण नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

या प्रसंगी आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर, मा. नगराध्यक्ष प्रशांतजी कुऱ्हाडे, विरोधी पक्षनेते आदित्यजी घुंडरे पाटील, नगरसेवक सोमनाथजी कुऱ्हाडे पाटील, नगरसेवक संतोषजी रासकर, नगरसेवक सुरेशजी झोंबाडे, अर्चना भिसे कार्यालय अधीक्षक तसेच आळंदी नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी आणि तीर्थक्षेत्र आळंदीतील सन्माननीय नागरिक उपस्थित होते. संतश्रेष्ठांच्या नावाने ओळखले जाणारे हे पूल आळंदीच्या संतपरंपरेचे प्रतीक ठरतील आणि भाविकांसह नागरिकांना संतविचारांची प्रेरणा देत राहतील.

दापोडी येथील एस.एस. पाटील विधी महाविद्यालय विद्यार्थ्यांनी शैक्षणिक व अनुभव आधारित अध्ययन उपक्रमांतर्गत चतु:श्रृंगी पोलीस ठाण्याला भेट

पिंपरी । प्रतिनिधी

कायद्याचे ज्ञान, पोलीस यंत्रणेची कार्यपद्धती, तपास प्रक्रिया आणि न्यायव्यवस्थेतील विविध घटकांच्या भूमिका व जबाबदाऱ्या यांची प्रत्यक्ष माहिती विद्यार्थ्यांना मिळावी, हा या भेटीमागील प्रमुख उद्देश होता. या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम भजनावळे, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी विष्णू दगडे आणि पोलीस हवालदार विजय अमरनाथ बडगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



पोलीस ठाण्याचे प्रत्यक्ष कामकाज समजावून सांगताना त्यांनी एफआयआर व एनसी नोंदणी, गुन्ह्यांचा तपास, सायबर क्राईमबाबत, महिलांना सामना करावा लागत असलेले सायबर गुन्हे, दोषारोपपत्र तयार करणे, मुद्देमालाची नोंद, पोलीस कोठडी आणि न्यायालयीन कोठडी यांतील फरक स्पष्ट केला. कायद्याची पुस्तकी माहिती आणि त्याचा प्रत्यक्ष वापर यांतील सांगड घालण्यावर, तसेच पोलीस आणि वकील यांच्या समन्वयातून न्यायव्यवस्थेला हातभार लावण्याची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी कायद्याला धरून वागावे, असा सल्लाही त्यांनी दिला. नवीन कायदेशीर तरतुदी, बदलत्या कायद्यांचा अभ्यास, तसेच महिला व मानवी हक्कांविषयी जागरूकता ठेवून चिकित्सक विचारशक्ती विकसित करण्याचे आवाहन करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्या डॉ. सोनल देशमुख यांनी पोलीस अधिकाऱ्यांचा सन्मान केला. या शैक्षणिक भेटीचे नियोजन व आयोजन सहा. प्रा. सोनाली गरुड व सहा. प्रा. कृष्णकुमार अघाव यांनी केले. महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी सहकार्य केले. एलएल.बी. प्रथम वर्षातील सर्व विद्यार्थी या भेटीत सहभागी झाले होते.

जादूच्या प्रयोगांतून अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश; वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचा प्रयत्न

देहूगावात जादूगार शिवम यांचा मनोरंजनासह प्रबोधनात्मक कार्यक्रम; महिला व मुलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

देहूगाव । प्रतिनिधी

मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे, जादूच्या प्रयोगांमागील विज्ञान समजावून सांगणे तसेच संमोहनशास्त्राची ओळख करून देत समाजातील अंधश्रद्धा दूर करण्याच्या उद्देशाने नगरसेविका पूनम काळोखे यांच्या पुढाकारातून देहूगाव येथे जादूगार शिवम यांच्या विनोदी जादूचे प्रयोग व संमोहनशास्त्रावर आधारित मनोरंजनात्मक प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी (ता. १) जगद्गुरू इंग्लिश मीडियम स्कूलच्या पटांगणात झालेल्या या कार्यक्रमाला महिला व मुलांचा मोठा प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे उद्घाटन मावळचे आमदार सुनील शेळके यांच्या पत्नी सारिका शेळके, नगराध्यक्षा स्मिता चव्हाण, नगरसेविका पूनम काळोखे, मोरे, वैशाली टिळेकर, नगरसेवक मयूर टिळेकर, बंडा काळोखे, विशाल काळोखे, राष्ट्रवादी काँग्रेसचे देहूरोड शहराध्यक्ष विवेक काळोखे, शैलेश चव्हाण, शिवव्याख्याते प्रदीप कदम आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी संमोहनतज्ज्ञ मास्टर सूर्यकांत चव्हाण यांनी शेतकऱ्यांच्या सद्यःस्थितीवर भाष्य करत नागरिकांना शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. देशाचा पोशिंदा असलेला शेतकरी आज विविध संकटांचा सामना करीत आहे. शेतकऱ्यांच्या कष्टातूनच आपल्या ताटात अन्न येते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव देण्याबरोबरच आपल्या संसाराचा खर्च भागवून शक्य तेवढी मदत शेतकऱ्यांना करावी. शेतकरी जगला तरच आपण जगू, असे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रात अंधश्रद्धेचे प्रमाण वाढत असून, विशेषतः महिलांमध्ये त्याबाबत जागृती होण्याची गरज आहे. मुलांना जादूचे आकर्षण असते; मात्र जादूमागील नेमके तंत्र आणि विज्ञान त्यांना समजले पाहिजे. जादू म्हणजे चमत्कार नसून त्यामागे वैज्ञानिक कारणे असतात, हा दृष्टिकोन मुलांमध्ये रुजविणे आवश्यक आहे. महिलांनीही अंधश्रद्धेपासून दूर राहून वैज्ञानिक विचार स्वीकारावा, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे नगरसेविका पूनम काळोखे यांनी सांगितले.

समाजप्रबोधनकार व प्रसिद्ध जादूगार शिवम म्हणाले, की गेल्या २७ वर्षांपासून महाराष्ट्र अंधश्रद्धामुक्त करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. जादूच्या प्रयोगांतून मनोरंजनाबरोबरच जादू, अंधश्रद्धा आणि विज्ञान यांमधील फरक नागरिकांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला जातो. नगरसेविका पूनम काळोखे यांनीही हाच सामाजिक प्रबोधनाचा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून हा कार्यक्रम आयोजित केल्याचे त्यांनी नमूद केले. जादूगार शिवम यांच्या विविध विनोदी जादूच्या प्रयोगांनी उपस्थितांचे मनोरंजन केले. त्याचबरोबर संमोहनशास्त्राची माहिती आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमासाठी महिला व बालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सूत्रसंचालन अमित घेनंद यांनी केले.

चिंचवडच्या कुणाल मार्केटमधील आगीनंतर रहिवासी अंधारात; चार दिवसांपासून वीज-पाणी बंद

पिंपरी । प्रतिनिधी

चिंचवड गावातील कुणाल मार्केट येथील इमारतीच्या पार्किंगमध्ये लागलेल्या भीषण आगीच्या घटनेला चार दिवस उलटले, तरी रहिवाशांचा वीज व पाणी पुरवठा बंद असल्याने दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. त्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. घटनेप्रसंगी शेजाऱ्यांच्या मदतीने, तसेच अग्निशामक दलाचे जवान आणि स्थानिक तरुणांनी मदत केल्याचेही येथील रहिवासी सांगत आहेत. ऐन दिवाळी सणाच्या तोंडावर ही घटना घडली असून, इतर गोष्टींना प्रसिद्ध देण्याऐवजी आधी रहिवाशांच्या मूलभूत सुविधा पूर्ववत करण्याकडे संबंधित प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी आर्त मागणी येथील रहिवाशांनी केली आहे.



गुरुवार (दि.२९) ऑक्टोबर रोजी मध्यरात्री दीडच्या सुमारास कुणाल मार्केटच्या पार्किंगमध्ये आग लागली. या आगीत १८ दुचाकी आणि दोन चारचाकी वाहने जळून खाक झाली. आगीने रौद्ररूप धारण केल्यानंतर इमारतीतील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अग्निशामक दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत आग नियंत्रणात आणली. तसेच इमारतीच्या टेरेसवर अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. या घटनेनंतर अनेक लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, संघटना आणि कार्यकर्त्यांनी घटनास्थळी भेट देऊन मदतीचे आश्वासन दिले. मात्र, चार दिवसांनंतरही रहिवाशांचा वीज व पाणी पुरवठा बंदच आहे.

'आम्ही स्थानिक तरुणांच्या मदतीने सुरक्षित ठिकाणी पोहचलो'

आगीच्या घटनेनंतर एका तरुणीने नागरिकांचे प्राण वाचविल्याची चर्चा सुरू झाली असून, तिचा सत्कार अनेकजण करत आहेत. परंतु जे जिवंत आहेत त्यांना काही दुखापत झाली का, चार दिवस झाले आम्ही अंधारात आहोत याकडे दुर्लक्ष केले जात आहे. कुणाल मार्केटमधील काही रहिवाशांनी याबाबत वेगळीच भूमिका मांडली आहे. 'आम्ही स्वतःच्या हिमतीवर, शेजारी आणि मित्रमंडळींच्या मदतीने सुरक्षित ठिकाणी पोहोचलो. अग्निशामक दलाचे जवान आणि स्थानिक तरुणांनीही आम्हाला मदत केली,' असे रहिवाशांचे म्हणणे आहे. काही रहिवाशांनी घटनेप्रसंगीचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असल्याचाही दावा केला आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये जड वाहनांचा बिनधास्त वावर; वाहतूक निर्बंध कागदावरच?

पिंपरी । प्रतिनिधी

शहरातील वाहतूक कोंडी आणि अपघातांचा धोका कमी करण्यासाठी जड वाहनांच्या वाहतुकीवर वेळेचे निर्बंध घालण्यात आले आहेत. मात्र, हे निर्बंध केवळ कागदावरच असल्याचे चित्र शहरातील रस्त्यांवर दिसत आहे. भर दिवसा, शाळा भरण्याच्या आणि सुटण्याच्या गर्दीच्या वेळेतही लॉरी, क्रेन, काँक्रीट मिक्सर आणि अन्य अवजड वाहने शहरातील प्रमुख रस्त्यांवरून बिनधास्त धावत आहेत. वाहतूक विभागाकडून जड वाहनांवर कारवाई केली जात असल्याचे वारंवार सांगितले जाते; मात्र प्रत्यक्ष रस्त्यावरील परिस्थिती पाहता या दाव्यांची अंमलबजावणी कुठे होत आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही जड वाहनांच्या बेकायदा वाहतुकीचा प्रश्न ऐरणीवर आला होता. मात्र दुर्घटना होऊनही परिस्थितीत अपेक्षित बदल झालेला नाही. त्यामुळे वाहतूक पोलिसांच्या कारवाईचा धाक नेमका कोणाला आहे, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. शहरातील



रस्त्यांवर दुचाकी, चारचाकी, शालेय विद्यार्थी आणि पादचाऱ्यांची मोठी वर्दळ असताना अशा अवजड वाहनांना प्रवेश कसा मिळतो? वेळेचे निर्बंध असताना भरदिवसा ही वाहने शहरात येतातच कशी? त्यांना अडविण्याची जबाबदारी नेमकी कोणाची? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार झपाट्याने होत असून, बांधकाम प्रकल्प, औद्योगिक क्षेत्र आणि विविध विकासकामांमुळे अवजड वाहनांची संख्या वाढली आहे. मात्र, विकासकामांच्या नावाखाली वाहतूक नियमांना हरताळ फासला जात असेल, तर त्याचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना का सहन करावा, असा सवाल उपस्थित होत आहे. विशेषतः शाळा परिसर, मुख्य चौक, अरुंद रस्ते आणि वर्दळीच्या मार्गांवरून मोठ्या आकाराची वाहने जाताना वाहतुकीचा वेग मंदावतो. त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण होतो.

कारवाईच्या घोषणा; प्रत्यक्षात मात्र वाहनांचा धुमाकूळ!

वाहतूक विभागाकडून वेळोवेळी जड वाहनांवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले जाते. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केली जाईल, असेही सांगितले जाते. मात्र, प्रत्यक्षात भरदिवसा अवजड वाहने शहरात फिरताना दिसत असल्याने कारवाईचा प्रभाव जाणवत नाही. एखादी मोहीम राबवून काही वाहनांवर कारवाई करण्यापेक्षा नियमित तपासणी आणि सातत्यपूर्ण अंमलबजावणी आवश्यक आहे. केवळ कारवाईच्या घोषणा करून हा प्रश्न सुटणार नाही. जड वाहनांना शहरात प्रवेश देणाऱ्या मार्गांवर नियंत्रण, वेळेचे काटेकोर पालन आणि नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली, तरच या समस्येला आळा बसू शकतो.

शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर सकाळी शाळा भरण्याच्या आणि दुपारी शाळा सुटण्याच्या वेळेत रस्त्यांवर विद्यार्थ्यांची मोठी गर्दी असते. अशा वेळी मोठ्या आकाराच्या लॉरी, क्रेन आणि मिक्सरमधून होणारी वाहतूक धोकादायक ठरू शकते. अवजड वाहनांच्या चालकांना आजूबाजूच्या लहान वाहनांचा आणि पादचाऱ्यांचा अंदाज घेणेही अनेकदा कठीण जाते. अशा परिस्थितीत एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शहरातील नागरिकांनी वारंवार हा प्रश्न मांडूनही ठोस उपाययोजना होत नसल्याने नाराजी वाढत आहे. वाहतूक विभागाने केवळ दंडात्मक कारवाईचे आकडे जाहीर न करता प्रत्यक्ष रस्त्यांवर जड वाहनांची वाहतूक नियंत्रित करण्यासाठी काय उपाय केले, याची माहितीही नागरिकांसमोर मांडण्याची गरज आहे.